किस्त्रीम बुक क्लब

पूर्वांचलाची मुशाफिरी



श्रीपाद जोशी

र्वांचलाची मुशाफरी

प्रवासाची दैनंदिनी

श्रीपाद जोशी

किर्लोस्कर प्रेस प्रकाशन

□ मुद्रक व प्रकाशक :
मु. शं. किर्लोस्कर,
किर्लोस्कर प्रेस,
वीर सावरकर नगर,
पुणे ९.

□ पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९६९

□ **किंमत ४ रुपये.**

डॉ. अमलेन्दु गुह

आणि

प्रा. वाणीप्रसन्न मिश्र

यांना स्नेहपूर्वक

पूर्वांचलाची मुशाफरी

प्रवासाची दैनंदिनी

मुंबई
२१–१–६८

असम, नगाभूमी, मणिपूर व त्रिपुरा या चार राज्यांच्या प्रदीर्घ दौऱ्यावर निघताना अेका बाजूने कडाक्याची थंडी, प्रवासातील गैरसोयी, अपरिचित प्रदेश व लोक आणि महाराष्ट्रापासूनचे दूरत्व वगैरे गोष्टींमुळे मन कसे आशंकित झाले आहे, तर दुसऱ्या बाजूने भारत-भ्रमणाच्या पूर्ततेचा क्षण जवळ आल्यामुळे अेक प्रकारची कृतार्थताही वाटत आहे. १९४० साली पंडित वियोगी हरींचे आशीर्वाद व ओळखपत्रे घेअून दिल्लीहून कानपूर, प्रयाग, काशी वगैरे भागात गेलो होतो. ५–१० रुपयेच गाठीशी होते, आणि सरतेशेवटी दिल्लीच्या स्टेशनवर अुतरल्यावर जवळ अेक आणाही शिल्लक नसल्यामुळे सब्जीमंडीपासून सामान डोकीवर घेअून चालत किंग्ज्वेच्या हरिजन निवासात जावे लागले होते, त्याची आठवण येते. त्या वेळी सुरू झालेले भारत-भ्रमण गेली २८वर्षे अखंड चालू आहे. काही राज्यांतून (अुदाहरणार्थ केरळ, मद्रास, कर्नाटक, ओरिसा, बिहार) दोन-दोनदा, तीन-तीनदा जाअून आलो. त्या त्या वेळी लिखाणही केले. परंतु असमच्या प्रवासाची संधी मात्र काही ना काही कारणाने हुकत होती. त्यामुळे डॉ. अमलेंदू गुह यांनी असम साहित्य-सभेच्या ३५ व्या अधिवेशनाच्या निमित्ताने तेजपूरला येण्याचे (अर्थात स्वखर्चाने) निमंत्रण देताच कितीही अडचणी आल्या तरी हा योग दवडावयाचा नाही असे ठरविले. स्वतःच्या पदरचे पाच-सहाशे रुपये खर्च करण्याची तयारी ठेवली आहे. २८ वर्षांपूर्वीच्या व आजच्या प्रवासातील हा फरक पाहिला, की जीवनात आपण थोडेफार कमावले, निदान काही गमावले नाही, याचे समाधान वाटते.

लिखाणाच्या दृष्टीने माहिती मिळविण्यासाठी प्रवास करावयाचा म्हणजे दोन पथ्ये पाळली पाहिजेत. शक्यतर सारा प्रवास तिसऱ्या वर्गाने केला पाहिजे. आगगाडीच्या तिसऱ्या वर्गात खऱ्या जनतेचे जे दर्शन घडते ते पहिल्या वर्गात घडणे शक्य नाही. दुसरे पथ्य म्हणजे हॉटेलात न अुतरता शक्यतर त्या प्रदेशातील लोकांच्या घरीच अुतरावयाचे. त्यायोगे स्थानिक लोकजीवनाचे जवळून दर्शन घडते. त्या प्रदेशातील लोकांच्या मनात आपल्याविषयी स्नेह निर्माण होतो. ते आपल्याशी

मोकळेपणाने बोलतात. डॉ. अमलेंदू गुह व श्री वाणीप्रसन्न मिश्र यांच्या सहकार्या-मुळे अशी सोय होऊ शकेल अशी आशा वाटते.

खूप प्रयत्न करूनही झोपण्याच्या डब्यात जागा मिळू शकली नाही. याचा अर्थ प्रवासाच्या अडचणींना पहिल्या दिवसापासूनच सुरुवात झाली. पूर्वीचा जोम आता उरलेला नाही. ती जिद्दही राहिलेली नाही. त्यामुळे स्लीपरचे रिझर्व्हेशन मिळत नाही, असे कळल्यानंतर क्षणभर हताश होऊन प्रवासाचा बेत रद्द करावा, असा विचार मनात येऊन गेला. परंतु अशी संधी पुन्हा कदाचित मिळणार नाही, म्हणून पडतील ते कष्ट सहन करून हा शेवटचा प्रांत पुरा करावयाचाच असे ठरविले आहे. जीवना-मध्ये पेचप्रसंग निर्माण व्हावयाचे व शेवटच्या क्षणी त्यातून काहीतरी मार्ग निघा-वयाचा असे नेहमीच घडत आले आहे. त्याप्रमाणे अद्या काहीतरी मार्ग निघेल अशी आशा वाटते.

गाडीत (अलाहाबादकडे)
२२–१–६८

योगायोग

असमला जाण्याचा सर्वांत सोयीचा मार्ग म्हणजे कलकत्त्याहून विमानाने गुवा-हाटीला जावयाचे. पण तो श्रीमंतांसाठी. गरिबांनी मीटरगेज गाडीतून रखडतच गेले पाहिजे. पूर्वी कलकत्त्याच्या बाजूने जात असत. आता अलाहाबादवरून जाणे सोयीचे मानले जाते. अलाहाबाद मार्गे जाणाऱ्या कलकत्ता मेलने गेल्यास पूर्वी अलाहा-बादला असम मेल मिळत असे. परंतु उतारूंची ही सोय रेल्वेखात्याला पाहवली नाही. त्याने कलकत्ता मेल अलाहाबादला पोचण्याच्या वीस मिनिटे आधीच असम मेल तेथून निघून जाईल अशी व्यवस्था केली. म्हणजे त्या गाडीने जाणाऱ्यांची चोवीस तास रखडपट्टी. वाराणसी अेक्सप्रेसने जाणाऱ्याला फक्त बारा तासच रखडावे लागते. म्हणून मी वाराणसीने जाण्याचे ठरविले. स्लीपरमध्ये रिझर्व्हेशन न मिळाल्यामुळे भल्या पहाटे अुठून बोरीबंदरला गेलो. गाडी लागलेलीच होती. परंतु योगायोगाने अेक वरचा बाक मोकळा मिळाला. घाअीघाअीने बेडिंग पसरून दिले, आणि सुटकेचा निःश्वास टाकला. शेवटच्या क्षणी काहीतरी मार्ग निघतो तो असा.

डब्यात पुरभैयेच होते. त्यांच्यापैकी अेकजण दुसऱ्याला सांगत होता, " शिव-सेनेची मागणी बरोबर आहे. मद्रासी लोक येअून स्थानिक लोकांना बाजूला सारतात. मद्रासकडे १५० लोक गेले होते. त्यातल्या फक्त मद्राशांना नोकऱ्या मिळाल्या. अितरांना परत यावे लागले. तेव्हा मराठ्यांची काय चूक आहे ? त्यांचे (महाराष्ट्राचे) मंत्री खंबीर आहेत. ते काहीतरी मार्ग काढतीलच."

मी काही बोललो नाही.

ब्रह्माणपूरला अेक वयस्क मुसलमान गाडीत चढला. तो म्हणत होता, "कोअी अंग्रेजीको मिटाना चाहता है, कोअी हिंदीको, कोअी अुर्दूको। हर कोअी मिटानेपर तुला हुआ है। मैं पूछता हूँ, अरे भाअी पिछले बीस सालमें तुम, सब मिटानेकी ही बातें करते रहे हो; कोअी कुछ बनानेकी भी बात करता है ?"

गाडीत (अलाहाबाद)
२३–१–६८

सकाळी १०–३० अैवजी ११–१५ ला पोचलो. गावात अेक फेरफटका मारला. त्रिवेणीस्नान यापूर्वी अनेकदा झालेले असल्यामुळे या कडाक्याच्या थंडीत संगमावर जाअून स्नान करण्याची कल्पनाही मनाला शिवली नाही. सारे कसे थंड, निर्जीव वाटले. अलाहाबाद अितके गतिहीन कधी वाटले नव्हते.

रात्री दिल्लीहून असम मेल आली; आणि कंडक्टरला दोन रुपये लाच दिल्यानंतर स्लीपर रिकामा असल्याची सुवार्ता त्याने दिली. त्याच्यानंतर आलेला कंडक्टर लखनौचा कायस्थ होता. त्याच्याकडून समजले, की लाच घेअून गेलेला कंडक्टर मियाँ भाअी होता. सुदैव, कायस्थाने लाच मागितली नाही.

कोकराझार स्टेशन प्रतीक्षालय
२४–१–६८

लष्कराचा जुलूम

सकाळी ५–३० ला बरौनीला पोचलो. ७–२० ला असम मेल निघते. हिचे नाव जरी असम मेलच असले, तरी ती मीटरगेज आहे. त्यामुळे वस्तुतः नाव अेक असले तरी गाडी वेगळी आहे. ती ६–३० पर्यंत लागलीच नाही. तासभर गाडीची प्रतीक्षा केली. गाडी फलाटाला लागताच मेंढराप्रमाणे माणसे भरली. बहुतेक सारे बिहारी मजूर– चहाच्या मळ्यांत काम करण्यासाठी चाललेले. पांढरपेशा व त्यातही असमीया माणूस क्वचितच दिसतो. हमालाला २ रु. देअून मीही अेका डब्यात घुसलो. स्थिरस्थावर होअून गाडी सुटायची वेळ झाली. अितक्यात मिलिटरीचे लोक आले. "चलो, यह डिब्बा खाली करो." त्यांनी फर्मावले. मी म्हणालो, "मित्रांनो, हा काही तुमचा खास डबा नव्हे. याच्यावर तसं काही लिहिलेलं नाही." त्याबरोबर त्यांच्या म्होरक्याचा पारा चढला. तो ओरडला, "अरे देखो तो वह क्या बकता है ? अुसकी गर्दन पकड़कर अुसे अुठाकर बाहर फेंक दो !" मी यावर काही अुत्तर देणार अितक्यात माझ्या शेजारचा अेक पांढरपेशा गृहस्थ म्हणाला, "भाअीसाहेब, कशाला त्या जनावरांच्या तोंडी लागता ? ते खरोखरीच तुम्हांला गाडीतून बाहेर फेकून देतील. साऱ्या

असमला या लोकांनी 'त्राहि भगवान्' करून सोडलंय. बेटे चिन्यांकडून मार खाऊन पळून आले. अन् गरीब प्रवाशांवर रुबाब दाखवताहेत. ही नुसती पहिली सलामी झाली. तुमच्या असमच्या प्रवासात जागजागी तुम्हांला हा अनुभव येईल. या लोकांसाठी खास डबे जोडलेले असतात. पण ते यांना अैसपैस झोपायला पुरत नाहीत ना! पाच लोकांसाठी हे साऱ्या अुतारूंना अैन गाडी सुटण्याच्या वेळी डब्यातून हुसकून लावतात. यांना कोण विचारणार? हे आमचे रक्षक ना! रक्षक की भक्षक? गोऱ्या सैनिकांच्या जुलमाविरुद्ध तुम्ही खादीवाल्यांनी त्या वेळी फार ओरडा केला होता. आता का तुमची दातखिळी बसलीय?"

असममध्ये भारतीय लष्कराविषयी अेक प्रकारची चीड, तिटकारा असल्याचे अैकले-वाचले होते. त्याचे कारणही कळले व प्रत्यक्ष अनुभवही आला. त्या अेकूण प्रकाराची मला लाज वाटली. शिसारी आली. मी निमूटपणे खाली अुतरलो. सैनिकांखेरीज अितर लोकांचे सारे डबे ठासून भरलेले होते. मुंगीलाही आत शिरायला वाव नव्हता. सैनिकांचे डबे मात्र मोकळे होते. मी घाअीघाअीने दुसऱ्या वर्गात शिरलो. कंडक्टरकडे तिकीट मागितले. तो म्हणाला, "कोकराझारचं अंतर पाहायला मला वेळ नाही. हवं असेल तर गुवाहाटीचं तिकीट घ्या नाहीतर खाली अुतरा." झक मारीत त्याने दिले ते तिकीट घ्यावे लागले. २०० किलोमीटरच्या भाड्याचा भुर्दंड केवळ कंडक्टरच्या लहरीखातर भरावा लागला.

असमच्या परिसरात शिरल्यानंतर आगगाडीची व वेळापत्रकाची बहुधा फारकत होत असावी. तरीपण गाडी फक्त अेक तासच लेट झाली. कोकराझारला रात्री १२च्या अैवजी १ वाजता पोचलो. सगळीकडे सामसूम. हमाल नाही, रिक्शा नाही. अंधार मी म्हणत होता. सामान डोकीवर घेअून, रूळ ओलांडून ठेचकळत, धडपडत वेटिंगरूममध्ये पोचलो. भूटानी लोकांनी साऱ्या जागा अडविल्या होत्या. येथून भूटानची सरहद्द फार जवळ आहे. कशीबशी कोपऱ्यातली जागा पकडून जमिनीवरच अंथरूण पसरले; आणि प्रवासाने आंबून गेलेले शरीर झोकून दिले. असमने पहिल्या दिवशीच आपला अिंगा दाखविला!

कोकराझार

२५-१-६८

टुमदार, स्वच्छ गाव

सकाळी अुठून रिक्शाने डॉ. अमलेंदू गुहांचे साडू श्री. गोपालदास (वकील), यांच्या घरी आलो. त्यांनी व त्यांच्या पत्नींनी आपलेपणान स्वागत केले. तेवढ्यानेच शीण अुतरला. श्री. गोपालदास यांनी मोटारीतून हिंडवून आणले. गाव टुमदार, स्वच्छ वाटले. ग्वालपाडा (किंवा गोवालपाडा) जिल्ह्यातील तीन सब-डिव्हिजन्सपैकी

कोकराझार ही अेक सब-डिव्हिजन. आपल्याकडील तालुक्यापेक्षा हा मोठा घटक आहे. याचे क्षेत्रफळ १८२७ चौरस मैल असून लोकसंख्या ४,६९,८५० आहे. यावरून याच्या आकाराची कल्पना येअील. याच्या खालचा घटक म्हणजे थाना. हा आपल्याकडील तालुक्यापेक्षा थोडा लहान, महालाअेवढा असतो. ग्वालपाडा जिल्ह्यात १३ थाने आहेत. खुद्द कोकराझारची लोकसंख्या ९,४८९. त्यात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या दोन हजारांनी कमी. ५७०२ पुरुष व ३७८७ स्त्रिया. अेकूण असममध्येच पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी (अनुक्रमे ६३,२८,१२९ व ५५,४४,६४३) आहे. याला अपवाद फक्त ख्रिस्ती बहुसंख्या असलेला मिझो जिल्हा. तेथे बायकांची संख्या पुरुषा-पेक्षा जास्त (दर हजारी १००९) आहे. स्त्रियांची सर्वांत कमी संख्या असलेला जिल्हा लखीमपूर (दर हजारी ८३१). स्त्रियांची संख्या कमी असल्यामुळेच असमच्या समाजव्यवस्थेत स्त्रीचे प्राबल्य असेल काय ?

जिकडेतिकडे हिरवेगार दिसते. केळी आणि पोफळी यांची बनेच्या बने दिसतात. शेतांच्या कडेलाही केळीच. बांबू हा तर असमचा जीवनाधार. त्याचीच घरे, त्याचीच भांडी, त्याचेच फर्निचर. गोव्यासारखे दृश्य दिसते. पण नारळीची बने नसल्यामुळे मात्र चुकल्याचुकल्यासारखे वाटते. असमला समुद्र नाही. म्हणूनच बहुधा नारळी होत नसाव्यात. लोकांच्या खाण्यातही नारळ नाही.

घरे मुख्यत: लाकडी खांबावर अुभारलेली. भिंती बांबूच्या कामटयांच्या किंवा 'अीकरा' नावाच्या कारवीसारख्या अेका वेतवर्गीय वनस्पतीच्या. दारे-खिडक्याही बांबूच्या. वरती गवताचे छप्पर. भिंतीवर मातीचा किंवा सीमेंटचा सफाअीदार गिलावा. त्यावरून चुन्याचा हात दिला,की त्या खरोखरीच मातीच्या किंवा सीमेंटच्या आहेत असे वाटते. खालची जमीनही फळयांची. हा भूकंपाचा प्रदेश. त्याच्यापासून प्राणरक्षण व्हावे म्हणून ही व्यवस्था. भूकंप झाला तरी ही घरे कोसळत नाहीत. फार तर वेडीवाकडी होतात. जोराच्या धक्क्याने कोसळली तरी दगड-विटा व कौले वगैरेंच्या खाली दबून मरण्याची भीती नाही. पाअूस खूप, सापही खूप. अशा ठिकाणी खांबा-वरची घरे अधिक सुरक्षित. पाणी खालून वाहून जाते. साप घरात येत नाहीत.

बहुतेक घरांच्या परसात धान्याचे लाकडी कोठार असते. चार खांबांवर अुभार-लेले. वर, खाली सगळीकडे फळया मारलेल्या असतात. अेखाद्या पोलिस-चौकीसारखे दिसते. श्री. गोपालदास यांच्या कोठारात १५० मण भात मावते. वर्षाचा साठा करून ठेवलेला असतो. मासळी परसातल्या पुखुरीतून मिळते. खरे स्वावलंबन ते हे. (पुखुरी म्हणजे परसातले तळे)

अर्थात आधुनिक पद्धतीची, सीमेंटकाँक्रीटचीही घरे आता बांधू लागले आहेत. गोपालबाबूंचे घर असेच आहे. वर पत्रे किंवा मंगलोरी कौले वापरतात. परंतु जुन्या प्रकारची पर्णकुटीवजा घरेही शहरात आढळतात.

बडो लोकांची समस्या

कोकराझारला अुतरण्याचा माझा मुख्य हेतू येथील बडो (Boro) लोकांची समस्या समजावून घेणे हा होता. तो बऱ्याच अंशी सफल झाला. बडो हे अेका मैदानी जनजातीचे (Tribe) नाव. या जमातीला स्वातंत्र्य हवे आहे. हे स्वातंत्र्य मिळाले, तर कोकराझार ही त्यांची राजधानी होईल. असमच्या मैदानी जनजातींची परिषद किंवा संघ (The Plains Tribals' Council of Assam) या संस्थेची मध्यवर्ती कचेरी कोकराझारला आहे. श्री. बिरुचन दोलै हे या संघाचे अध्यक्ष असून श्री. समर ब्रह्म चौधुरी हे अुपाध्यक्ष, प्रा. चरण नारझारी हे महासचिव आणि श्री. प्रतुलकुमार भाबरा व श्री. अजितकुमार बसुमतारी हे सहसचिव आहेत. बडो लोकांचे फार मोठे पुढारी श्री. रूपनाथ ब्रह्म हे परवा वारले. त्यांच्या निधनानिमित्त आज गावात जाहीर शोकसभा होती. तिला बराच मोठा जमाव अुपस्थित होता. श्री. ब्रह्म हे असमच्या मंत्रिमंडळात पूर्वी मंत्री होते. मृत्यूपूर्वी ते काँग्रेसपक्षीय संसद सदस्य होते. वर दिलेल्या नावावरून कल्पना येअील की बडो लोक मुख्यतः हिंदू आहेत. मैदानी जनजातींचे मुख्यतः ९ विभाग असून त्यांची अेकूण लोकसंख्या ९,५६,८५८ आहे. यांपैकी बडो गटात बडो काछारी, बर्मन, राभा, लालुंग वग़ैरे आठ अुपविभाग आहेत. मंगोलियन वंशाचे हे लोक डोंगरी जनजातींच्या लोकांप्रमाणे अितर असमीयांहून ठळकपणे अुठून दिसत नाहीत. बाहेरच्या माणसालाच नव्हे, तर स्थानिक लोकांनासुद्धा अमुक मनुष्य बडो आहे, असे हमखास सांगता येत नाही. बडो माणसाचे छायाचित्र घेण्याची मी अिच्छा दर्शविली तेव्हा गोपालबाबूंनी बाजार करून परतणाऱ्या दोन गृहस्थांना विचारले, "तुम्ही बडोच ना ?" त्यांनी "होय" म्हणून सांगितल्यावर त्यांचे छायाचित्र मी घेतले. अेक भिकारीही पेट्रोलपंपाजवळ दिसला. त्यालाही मी कॅमेऱ्यात भरले. परंतु त्यांच्या चेहऱ्यांवरून सर्वसामान्य असमीयां-पेक्षा त्यांचा वेगळेपणा मनावर ठसत नाही. त्यांची संख्याही दोन-तीन लाखांहून अधिक नसावी. ग्वालपाडा, कामरूप, दरंग व लखिमपूर या चार जिल्ह्यांतच मुख्यतः मैदानी जनजाती राहतात. नौगाँव व शिवसागर या अुरलेल्या दोन जिल्ह्यांत प्रत्येकी सुमारे अेक लाख जनजातीचे लोक आहेत. असमच्या अेकूण लोकसंख्येत मैदानी जन-जातींचे लोक अेकदशांशपेक्षाही थोडे कमी आहेत. त्यांच्यातही अनेक वेगवेगळ्या जमाती. अशा लोकांचे स्वतंत्र, स्वायत्त राज्य कसे बनेल ? यावर बडो लोकांचे अुत्तर असे,की काही भागात– यांना ट्रायबल बेल्ट्स व ट्रायबल ब्लॉक्स असे म्हणतात– आम्ही ५० टक्क्यांहून जास्त आहोत. असे सलग भाग अेकत्र करून आमचे अेक वेगळे राज्य बनविण्यात यावे.

जनजाती संघाची गाऱ्हाणी

आपण असममधील सर्वात जुने आदिवासी आहोत, असे बडो लोकांचे म्हणणे. बडो भाषेतील अनेक शब्द असमीयामध्ये आहेत. पाणीवाचक 'डि' (दि) 'टि' (ति)

हे शब्द असममधील नद्यांना लावलेले आढळतात. अुदाहरणार्थ दिहंग नदी, दिफू (फू म्हणजे घाणेरडा- घाण पाण्याची नदी) वगैरे. असम हे प्रदेशवाचक नावही बडो भाषेतील आहे, असा त्यांचा दावा. आहोम लोक या देशात अग्ले तेव्हा बडो लोक येथे राज्य करीत होते. आहोमांनी त्यांना जिंकल्यावर बडोंनी त्यांच्या साम्राज्याला नाव दिले 'हा-शाम' (शाम म्हणजे सयामी किंवा थाय लोकांची भूमी). आहोम राजांचे प्रजाजन ते 'हा-शामसा' (हा-शामची लेकरे). अुत्तर काछार जिल्ह्यातील डिमाछा लोक आजही असमच्या लोकांना हा-शामसा या नावाने संबोधतात.

मैदानी जनजातींच्या आपापल्या वेगवेगळ्या भाषा (बोली-भाषा) आहेत. त्यांपैकी बडो ही अेक. तिचे स्वरूप समजावे म्हणून बाजारात जाअून 'बडो भाषा शिक्षा' (असमीयार परा बडो भाषालै भाङनि) हे पुस्तक व 'मखजेन्नाय प्रायमर' विकत घेतले. बडो व असमीया यांच्यांत काहीच संबंध नाही, हे त्यावरून आढळून आले. मअि हओं (मी आहे) या वाक्याचे बडो भाषांतर 'आँ दँगौ' असे आहे. 'लोराटोरे गाखीर खाअिछिल' (मुले दूध पीत होती) या वाक्याचे बडो भाषांतर 'गथवा गाअिखेर लँ दँमन्' असे होते. त्यामुळे असमीयाशी या भाषेचे दूरचेही नाते नाही हे लक्षात येते. ग्रामीण बडो लोकांना व विशेषतः स्त्रियांना असमीया भाषा मुळीच कळत नाही.

बडो लोकांची मुख्य तक्रार अशी, की राज्यघटनेच्या पाचव्या किंवा सहाव्या अनुसूचीत देण्यात आलेले संरक्षण आपल्याला मिळत नाही. मैदानी जनजाती मुख्यतः शेतकरी पेशाच्या आहेत. परंतु त्यांच्या जमिनींवर बिगर जनजातींच्या लोकांचे आक्रमण होत आहे. श्रीमंत असमीया लोक तर त्यांच्या जाती बळकावितातच; पण पूर्व पाकिस्तानातून आलेल्या निर्वासित हिंदूंनाही फार मोठ्या संख्येने या भागातील सरकारी जमिनींवर वसविण्यात येत आहे. त्यामुळे जनजातींमधील भूमिहीनांची संख्या वाढत आहे. नुसत्या बिजनी ट्रायबल ब्लॉकमधूनच अशा प्रकारे १,६६,७८७ बिघे जमीन सरकारने अुपऱ्या लोकांना दिली असल्याची तक्रार जनजाती संघाच्या आवेदनात करण्यात आलेली आहे. असम सरकारकडून या बाबतीत संरक्षण मिळण्या-अैवजी आपल्यावर जुलूमच होत आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

आपल्या भाषेला योग्य प्रोत्साहन दिले जात नाही, अशी बडो लोकांची दुसरी मोठी तक्रार आहे. मोठ्या मिनतवारीने व जिवाचा आटापिटा केल्यानंतर १९६३ साली, प्राथमिक शाळेत बडो भाषेला शिक्षणाचे माध्यम म्हणून स्थान मिळाले. ते माध्यमिक व अुच्च शिक्षणाचे माध्यम बनत नाही, हे त्यांचे दुःख आहे. फक्त प्राथमिक शाळेतच बडो हे माध्यम असल्यामुळे पुढे शिकू पाहणाऱ्या मुलांचे फार नुकसान होते. कारण त्यानंतर असमीया हे माध्यम सुरू होते. (माध्यमिक शिक्षणाचे माध्यम म्हणून बडो भाषेला मान्यता मिळावी, यासाठी कोकराझार सब-डिव्हिजनमधील शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांनी ता. २८-२-६८ पासून बेमुदत संप पुकारला होता.

ता. ७–३–६८ रोजी कोकराझारमध्ये या संपाला सहानुभूती म्हणून कडकडीत हरताळ पाळला गेला होता, आणि ता. ८–३–६८ रोजी पहाटे तेथील मुलींच्या हायस्कूलमधील अेक अिमारत जळून खाक झाली होती. यावरून या असंतोषाच्या अुग्रतेची कल्पना यावी.) अर्थात बडोखेरीज अितर कोणत्याही मैदानी जनजातींच्या भाषेला प्राथमिक शिक्षणातही स्थान किंवा मान्यता मिळालेली नाही. यावरून असम मैदानी जनजाती संघाने राष्ट्रपतींना सादर केलेल्या निवेदनात असा निष्कर्ष काढला आहे, की बहुसंख्य असणाऱ्या असमीया लोकांचे धोरण वस्तुतः अितर भाषिक अल्पसंख्य गटांचे असमीयाकरण करणे आणि त्यांना आपले राजकीय आश्रित बनविणे हेच आहे. (In fact, the policy of the Assamese speaking majority is to Assamise other linguistic minority groups and make them their political beggaries.)

असमच्या राजभाषा विधेयकासंबंधी आपले विचार व्यक्त करणाऱ्या ठरावात बडो साहित्य-सभेने असे आवर्जून सांगितले आहे, की ५४ टक्के लोकांची मातृभाषा असणारी असमीया भाषा ६६ टक्के लोकांवर लादण्याअैवजी असमची राजभाषा म्हणून हिंदीचाच स्वीकार करण्यात यावा. म्हणजे राज्यातील सर्वच भाषिक गटांना भाषा शिकण्यासाठी सारखेच श्रम करावे लागतील. असममध्ये बडो भाषा बोलणारा समाज हा सर्वांत मोठा जनजाती गट असल्यामुळे त्याला आपले वेगळे व्यक्तित्व टिकवून धरून झपाट्याने आपली प्रगती करिता यावी यासाठी बडो मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी, अशीही मागणी बडो साहित्य-सभेने केलेली आहे.

असमच्या जनतेत फुटीरपणाची भावना कशी वाढत आहे याची कल्पना या विवेचनावरून येअील.

तेजपूर कोठे आहे ?

अुद्या सायंकाळपासून तेजपूर येथे असम साहित्य-सभेचे वार्षिक अधिवेशन सुरू होत आहे. येथून तेजपूरला जाण्याचा सोयीचा मार्ग कोणता याची चौकशी केली. श्री. गोपालदास म्हणाले, "मी अजून तेजपूर पाहिलेले नाही, त्यामुळे मला काहीच कल्पना नाही." आणखी दोघातिघांना विचारले. प्रत्येकाने दिलेली माहिती वेगवेगळी होती. येथून रेल्वेने सरळ गुवाहाटीला (१२५ मैल) जायचे आणि तेथून बसने तेजपूरला जावयाचे. पण गुवाहाटी ते तेजपूर हे अंतर (९६ मैल) किती आहे व ते अंतर कापण्यास किती तास लागतात, दुपारनंतर बसेस मिळतात की नाही याविषयी कोणीच नक्की असे सांगू शकले नाही. म्हणून आज रात्रीच्या धुबरी पॅसेंजरने रंगियाला (८५ मैल) जाअून तेथे गाडी बदलून तेजपूरला (९५ मैल) जावयाचे असे ठरविले. या मार्गाने ४० मैल वाचत असले, तरी वेळ जवळजवळ तेवढाच म्हणजे १८

तास लागतील. १८० मैलांना १८ तास म्हणजे असमच्या अेकूण दळणवळणाच्या सोयी लक्षात घेता फार वेळ म्हणता येणार नाही, असे मला सांगण्यात आले.

धुबरी पॅसेंजर १० अैवजी रात्री १ वाजता आली. गाडीला दुसऱ्या वर्गाचा डबा नसल्यामुळे टूटायर स्लीपरकोचमध्ये बसावे (झोपावे) लागले. सुदैवाने डबा रिकामाच होता. परंतु अेक-दोन स्टेशनांनंतर तो 'फुल्ल' झाला.

तेजपूर
२६–१–६८

सूर्याला काळोखाचा वेध

रंगापाराला गाडी पुन्हा बदलावी लागली– फक्त १५ मैलांसाठी ! अेवढे अंतर कापायला गाडीला दीड तास लागतो. मध्ये फक्त ४ स्टेशने. गाडी १० मिनिटे आधीच पोचली. पुण्याहून निघाल्यापासून वेळेवर पोचलेली ही पहिलीच गाडी. परंतु पावणेचार वाजले असताना सायंकाळचे पावणेसात वाजल्याचा भास होत होता. वस्तुतः सूर्य अजून चांगला दोन कासरे वर होता; परंतु क्षणोक्षणी वाटत होते, की आता अंधार पडणार. अितका तो निस्तेज होता. आभाळात सूर्य असताना अंधार पडण्याची कल्पना विचित्र होती, परंतु असे अितिहासात घडताना आढळते, नाही ? सूर्याला जणू काळोखाचा वेध लागला होता. ढगाआड गेला, की वातावरण जास्तच काळवंडे. भारताची ही पूर्वसीमा. मुंबअी-पुण्यापेक्षा अिकडे सूर्योदय-सूर्यास्त नेहमीच लवकर होतो. या दिवसात हा लौकरपणा विशेष जाणवतो अेवढेच.

बदाम कसे असतात ?

आज प्रजासत्ताक दिन. परंतु वाटेत लागलेल्या गावातील घरांवर राष्ट्रध्वज फारच तुरळक आढळला. जेथे तो दिसला त्या बहुधा सरकारी अिमारती असाव्यात. रंगापारामध्ये मात्र गुढ्यांप्रमाणे घरोघरी झेंडे दिसले. याचा अर्थ शहरात जागृती आहे.

गाडीत अेक पोरगा भाजलेल्या शेंगा (भुअीमुगाच्या) विकत होता. 'भजा-बादाम' (भाजलेले बदाम) म्हणून तो ओरडत होता. मला वाटले, अिथे बदाम भाजून विकतात की काय ? प्रत्यक्ष शेंगा पाहिल्यावर माझ्या बरोबर असलेल्या श्री. धनेश्वर कलिता या तरुण कथालेखकाला मी विचारले, "या शेंगांना जर तुम्ही बदाम म्हणता तर मग खऱ्या बदामांना काय म्हणता ?" तो आश्चर्याने म्हणाला, "दुसरे कसले बदाम ? हेच बदाम !" मी त्याला बदामाचे वर्णन करून सांगितले. तो म्हणाला, "तुम्ही सांगताय तसले बदाम मी अजून तरी पाहिले नाहीत." कॉलेजात शिकणाऱ्या व शहरात राहणाऱ्या तरुणाची ती स्थिती पाहून माझ्या मनात विचार

आला, बदामाचे सध्याचे भाव पाहता कदाचित पुण्या-मुंबअीकडील आमच्या तरुणांना कालांतराने धनेश्वराप्रमाणेच बदाम म्हणजे काय हे चित्र काढून सांगावे लगेल. आमच्या लहानपणी खेडोपाडी सत्यनारायणाच्या पूजेत पाच विडच्यांवर पाच बदाम ठेवण्याचा रिवाज होता. आता काय करतात देव जाणे! या भागात सत्य-नारायणाची पूजा अगदी आपल्यासारखीच केली जाते, असे कलिताकडून समजले.

चहाच्या मळयांचे प्रथमदर्शन

वाटेत चहाचे मळे लागले. कमरेअितक्या अुंचीची ती डेरेदार झुडपे अेका रांगेत अुभी होती. नुकतीच त्यांची कापणी संपलेली होती. थंडीमुळे पाने गळून पडलेली होती. नुसते खराटे दिसत होते. काही झाडांवर जून जरबट पाने होती, परंतु चहाच्या दृष्टीने ती निरुपयोगी असल्याचे समजले. काही मळ्यांमध्ये औषधे फवारण्याचे काम चालू होते. अेप्रिलपर्यंत हे खराटे कोवळ्या लुसलुशीत पानांनी भरून जातील. त्यांना कळ्या येतील. मग त्या दोन पानांमधील कोवळ्या कळ्या खुडल्या जातील. ती कोवळी पाने म्हणजे अुत्कृष्ट चहा. अशी पालवी भरपूर मिळावी म्हणून झाडांची छाटणी केली जाते. शेंडे छाटले, की खोडापासून अधिक फांद्या फुटतात. झाडांना सावली मिळावी म्हणून अधूनमधून अुंच जंगली झाडेही लावलेली दिसतात. चहाच्या मळ्यांनी प्रथमदर्शनीच अेक भ्रमनिरास केला. चहाच्याबागा डोंगरांच्या अुतरणीवर असतात, असे लहानपणी भूगोलात वाचले होते. परंतु येथे मैलोनमैल, क्षितिजापर्यंत भूसपाटीवर पसरलेले मळे दिसत होते. माती शाडूसारखी पिवळट. झाडांच्या मुळांशी पाणी साचणार नाही अशी खबरदारी घेतलेली दिसते. अधूनमधून खड्डे खणून भातखाचरे तयार केलेली आहेत. त्यामुळे चायबागांमधले पाणी आपोआप त्या खाचरांत वाहून येते. अेकीकडे पाण्याचा निचरा होतो तर दुसरीकडे भात पिकाची सोय होते.

दरंग कॉलेजचे प्रा. के. के. राव यांच्याकडे मला अुतरावयाचे होते; म्हणून रिक्शा करून गावाबाहेर दरंग कॉलेजजवळच्या पी. डब्ल्यू. डी. कॉलनीत गेलो. प्रा. राव यांनी प्रेमाने स्वागत केले. स्नान वगैरे अुरकून त्यांच्याबरोबर गावात आलो. हेमबरुआ सभाभवनात असम साहित्यसभेच्या विषयनियामक समितीची बैठक चालू होती. शंभरसव्वाशे प्रतिनिधी हजर होते. अितके प्रतिनिधी पाहून मला आश्चर्य वाटले. नंतर समजले की संमेलनाचे खरे काम येथेच होते. जाहीर सभामंडपात फक्त शोभेची कामे.

प्रतिनिधि–निवासात

असमीया साहित्यिकांशी परिचय करून घेण्याच्या दृष्टीने गावाबाहेर राहण्या-अैवजी मी प्रतिनिधि-निवासात राहावे, असे प्रा. राव यांनी सुचविले. मला ती सूचना योग्य वाटली; आणि मी कर मेमोरियल प्रायमरी स्कूलमधील प्रतिनिधि-निवासात राहायला आलो. परंतु येथे आल्यानंतर चांगलाच भ्रमरास झाला. प्रतिनिधि-निवासात अेकही महत्त्वाचा साहित्यिक नाही. बहुतेक सर्व अुत्साही साहित्यप्रेमी आहेत. टॅला

(मंगलदअीचे) चे श्री. अिब्राहीम अली व दुसरे अेक सबअिन्स्पेक्टर ऑफ अेज्युकेशन माझ्या खोलीत आहेत. त्यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. परंतु त्यांच्याशी चर्चा करून असमीया साहित्याच्या परिस्थितीची नीट कल्पना येअू शकली नाही. भारतीय विभाजन रद्द होअून भारत-पाक अेक झाल्याखेरीज असममधील मुसलमानांचा प्रश्न सुटणार नाही, असे श्री. अिब्राहीम अली यांचे मत आहे.

गुवाहाटीच्या दंगलीची बातमी

गुवाहाटीला भयंकर दंगल झाल्याची बातमी येथे आली आहे. दंगलीचा रोख मुख्यत: मारवाड्यांविरुद्ध व सामान्यत: बिगर असमीया लोकांविरुद्ध असल्याचे समजते. त्यामुळे येथील मारवाडी समाजात बरीच घबराट अुडालेली दिसते. येथे साहित्य संमेलन चालू असल्यामुळे असमीया तरुण गप्प आहेत, हे संमेलन संपताच ते येथे धुमाकूळ घालणार, अशी कुजबूज अैकू येत आहे. संमेलनासाठी आलेला अेक मारवाडी प्रतिनिधी म्हणाला, "संमेलन आटोपताच मला गावी परत गेले पाहिजे. तिथे देखील आमच्याविरुद्ध दंगल होअील अशी भीती वाटते." अेकूण सारेच वातावरण अस्वस्थ झाल्याचा अनुभव येत आहे.

आहाराची समस्या

माझा आहार ही अेक समस्या बनलेली आहे. जवळजवळ दोन हजार लोक येथील भटारखान्यात जेवतात. त्यांपैकी शुद्ध शाकाहारी असा मी अेकटाच. मी मांस-मासळी खात नाही, हे समजल्यानंतर येथील मंडळींचा चांगलाच विरस झाला. तरीपण मोठ्या प्रेमाने भटारखान्याच्या भांडारात अेका बाजूला नेअून त्यांनी मला भात-भाजी खाअू घातली. अेखाद्या विधवेप्रमाणे कोपऱ्यात बसून केलेले जेवण, हा अेक वेगळाच अनुभव होता. स्वयंपाकघरात पडलेला मोठमोठ्या माशांचा तो ढीग आणि मांसाचे प्रचंड तुकडे पाहून मात्र माझे मन शहारले. माझ्याअैवजी दुसरा कोणी कच्च्या दिलाचा असता, तर त्याला जेवणच गेले नसते.तरीपण मला वाटले, हे काही खरे नव्हे. माझ्या अेकट्यासाठी यांना वेगळी व्यवस्था करावी लागावी, तीही मना-प्रमाणे करिता येत नाही म्हणून दिलगिरी प्रदर्शित करण्याची पाळी यावी आणि अितके करून आपल्यालाही मनाजोगते जेवण मिळाल्याचा आनंद लाभू नये, हे काही बरे नाही. यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे.

या लोकांचा स्वयंपाक मात्र सोपा आणि सुटसुटीत आहे. पोळ्या-पुऱ्या नसल्या-मुळे आटा व पोळपाट यांचा आटापिटा करायला नको.चर खणून त्यांत लाकडे पेटवून, त्यावर मोठमोठ्या कढया ठेवल्या की झाले. भाताची पद्धतही फार सोपी. कढअीत पाणी अुकळू लागले, की त्यात तांदूळ टाकावयाचे आणि थोड्याच वेळात ती कढअी भल्या मोठ्या हाऱ्यात अुपडी करावयाची. पाणी निथळून जाते आणि झक्क फडफडीत भात तयार होतो. दही नाही, दूध नाही, ताक नाही की कढी नाही. पोटभरेपर्यंत भात, भाजी, रस्सा अुदरस्थ करावयाचा.

तांबूल-भक्षणाची सोय

जेवणाच्या बाबतीत असमच्या लोकांना मी संतुष्ट करू शकलो नाही, तरी दुसऱ्या अेका बाबतीत मात्र ते माझ्यावर बेहद्द खुश आहेत.ती म्हणजे तांबूल भक्षणाची. घरी आलेल्या अतिथीला तांबूल (असमीया-तामोल) देअून त्याचे स्वागत करण्याची अस्सल भारतीय परंपरा येथे अजून सार्वत्रिक आहे. या तांबुलाचा स्वीकार कोणी केला नाही तर त्यांना राग येतो, आपला अपमान झाल्यासारखे वाटते. कोणी म्हणेल, तांबुलात स्वीकार न करण्यासारखे काय असणार ? परंतु येथला तांबूल किंवा विडा वाटेल त्याने अुचलावा असा सामान्य नसतो. हा काही जुन्या काळच्या रावबहादुरांना कचेरीत जाताना त्यांच्या सौभाग्यवती देत असत तो गोविंदविडा नव्हे किंवा गुलकंद घालून बनविलेली, पोरासोरांनी खावयाची मसालेदार पानपट्टी नव्हे. येथला विडा भलताच जहाल– येथल्या लोकांच्या स्वभावाशी मेळ न खाणारा ! काळेभोर अर्धे पान, त्यावर चुन्याचा अेक लहानसा डोंगर आणि अर्धी ओली सुपारी. बस्स, झाला तांबूल. ही सुपारी जमिनीत पुरून आंबविलेली असते. नवख्या माणसाने तिचा अेक तुकडा तोंडात टाकण्याचा अवकाश.त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटलाच पाहिजे, आणि डोके गरगरायला लागलेच पाहिजे. पण सराअीत माणसाला मात्र त्यातून नशेचा ब्रह्मानंद अनुभवायला मिळतो. काताशिवाय विडा रंगत नाही, अशी आपली कल्पना येथे खोटी ठरते. चुना, सुपारी व पान यांच्या मिश्रणाने तोंड छान रंगते. मी पट्टीचा (बाजारी पानपट्टीचा नव्हे) पानशौकीन. ओली सुपारी नेहमी खाणारा– मुद्दाम सासुरवाडीहून (गोव्याहून) मागवून घेणारा– आणि त्याच्या जोडीला पंचमाचा बार भरणारा. (गवअी बनण्याच्या धडपडीत अेवढीच कमाअी झाली आहे !) त्यामुळे असमीया तांबूल मी सहज पचवितो; किंबहुना त्यांच्याप्रमाणे त्यातली नशाही अनुभवितो. त्यामुळे मी चहा नाकारला, तरी त्यांना राग येत नाही. अुलट भारताच्या दुसऱ्या टोकाकडून आलेला हा पुस्तकी माणूस आपल्यासारखाच तांबूल खातो, हे पाहून त्यांना बरे वाटते. जनसंपर्काचे हे चांगले साधन आपल्याजवळ आहे, याचे समाधान येथे आल्यानंतर प्रत्ययास आले. हा तांबूल ज्या धूपदाणीसारख्या तबकातून 'पेश' केला जातो त्याला सराअी (होराय) किंवा सरिया (होरिया) असे म्हणतात. या सरियावरील नक्षीकाम मात्र प्रेक्षणीय असते.

सांस्कृतिक कार्यक्रम

रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात खासी, गारो, नगा वगैरे लोकांची आदिवासी नृत्ये फार सुंदर झाली. त्यांच्या द्वारे असमच्या डोंगरी जमातींची थोडक्यात ओळख झाली. नेपथ्य, सजावट सर्व काही पहिल्या दर्जाचे होते. प्रत्येक जमातीचे रंगरूप, चेहरेमोहरे, कपडेलत्ते यात किती विविधता आहे, याची कल्पना आली. स्त्रियांच्या हालचालीतील सफाअी व मोकळेपणा विशेष लक्षणीय वाटला.नृत्य हे या जमातींच्या जीवनाचे अभिन्न अंग असले पाहिजे, हे सहज पटले.

२७–१–६८

सकाळी असम साहित्यसभेच्या ध्वजाचे वंदन झाले. सभेचा झेंडा निळ्या रंगाचा.त्यावर 'चिर चेनेही मोर भाषा जननी' (चिर प्रिय माझी भाषा जननी) हे शब्द आहेत. असम साहित्यसभेचे मावळते अध्यक्ष, गुवाहाटी विद्यापीठातील असमीया विभागाचे प्रमुख डॉ. महेश्वर नियोग यांनी झेंडा वंदनानंतर चांगले भाषण केले. मध्ये थोडा अवकाश होता म्हणून श्री. अिब्राहीम अलींबरोबर असमीयाचे विख्यात लेखक, अेके काळचे कम्युनिस्ट आमदार पण सध्याचे अपक्ष आमदार श्री. बिष्णु राभा यांच्या घरी गेलो. त्यांना पाहताच मला श्री. ग. दि. माडगूळकरांची आठवण आली. आकार-प्रकार, मुक्तहास्य वगैरे तेच. फक्त रंग थोडा अुजळ आणि डोळे चिन्यांसारखे मिचमिचे, अेवढाच फरक. त्यांच्या साहित्यासंबंधीच मुख्यत: गप्पा झाल्या.

संमेलनाचे अधिवेशन

संमेलनाच्या सकाळच्या अधिवेशनात अुच्च शिक्षणाच्या माध्यमावर परिसंवाद झाला. बहुतेक सर्वच जण मातृभाषेच्या बाजूने बोलले. माध्यम म्हणून हिंदीचा स्वीकार करण्याची कल्पना कोणालाच पसंत नाही. दुपारी अध्यक्षांची मिरवणूक. पिवळ्याजर्द गेंदेदार झेंडूच्या माळा गळ्यात घालून जीपमध्ये अुभे असलेले गोरेपान, ठेंगणे ठुसके, वृद्ध साहित्यिक श्री. ज्ञाननाथ बरा छान दिसत होते. झेंडूला येथे 'गंधमालती' म्हणतात. कुठे मराठी रुक्ष झेंडू (नाव काढताच झेंडू फुटावा असा) आणि कुठे काव्यमय, नाजूक गंधमालती ! मनात संगती जमत नव्हती खरी !

दुपारी खुले अधिवेशन सुरू झाले. मंचावर संमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष, प्रथितयश लेखक व श्री. कामारण्या प्रसाद त्रिपाठी यांच्यासारखे राज्याचे मंत्री व राजकीय पुढारी बसलेले होते. त्या सर्वांची श्रोत्यांना ओळख करून देण्यात आली. त्यांमध्ये अेकही महिला नव्हती. असमसारख्या स्त्री-स्वातंत्र्याची परंपरा असलेल्या राज्यात ही गोष्ट खटकल्याशिवाय राहिली नाही. अर्थात यामध्ये असमीया स्त्रीची स्वाभाविक शालीनता असण्याचीही शक्यता आहे. यानंतर स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांनी आपली छापील भाषणे अथपासून अितिपर्यंत वाचून दाखविली. स्वागताध्यक्षांनी तर 'जय असमीया भाषा साहित्यर जय। अिति। विनयावनत, श्री. कमला प्रसाद आगरवाला, पँयत्रिश तम असम साहित्य सभार तेजपुर अधिवेशनर अभ्यर्थना समितिर सभापति'– असे (स्वत:च्या नावापूर्वी श्री लावून) संपूर्ण भाषण सुनाविले. आगरवाला घराणे हे मूळचे मारवाडी. पण आता संपूर्ण असमीया बनले आहे. त्यांच्याविषयी असमीया लोकांना विशेष आत्मीयता का वाटते त्याचा अुलगडा त्यांच्या भाषणातील असमीया प्रेमावरून व्हावा.

मारवाड्याच्या गोदामात

आज स्नानाची गोळी घ्यावी लागली. पुण्यासारख्या ठिकाणी अुन्हाळ्यातही गरम पाण्याने आंघोळ करणारा मी. येथे तर अंगातील जाडजूड लोकरीचा कोट

काढणेही जिवावर येते. अितकी भयंकर कडाक्याची थंडी. तेव्हा गरम पाण्याशिवाय आंघोळ कशी होणार? पण येथील सर्वांनी– ज्यांच्याविषयी आपल्याकडे 'जुम्मेके जुम्मे' असे म्हणण्याची प्रथा आहे त्या अिब्राहीम अलींनीही– नळाच्या पाण्याने आंघोळी अुरकल्या. त्या कल्पनेनेच माझ्या अंगावर काटा आला. असममध्ये गरम पाण्याची प्रथा जवळजवळ नाहीच. त्यामुळे आपल्यासारखे हांडे, बंब वगैरे अिकडे दिसत नाहीत. काल सायंकाळी प्रा. रावांच्या घरीही अेका छोट्याशा पातेलीतूनच मला दोन तांबे कोमट पाणी मिळाले होते. तरीपण तेवढेही मिळण्याची येथे सोय नाही. शिवाय जेवणाचे हाल (माझे व वाढणाऱ्यांचेही) आहेतच. म्हणून मी गावात अेखाद्या शाकाहारी कुटुंबात जाण्याची अिच्छा व्यक्त केली. येथे शाकाहारी म्हणजे फक्त मारवाडी. तेव्हा संमेलनाच्या कामात अुत्साहाने भाग घेणाऱ्या अेका शेठजींच्या हवाली मला करण्यात आले. मला वाटले ते मला आपल्या घरी नेतील. पण त्यांनी मला नेअून आपल्या गोडाअूनमध्ये टाकले. (माझ्या रंगामुळे मी काळाबाजार करायला अुपयुक्त ठरेन, असे त्यांना वाटले की काय नकळे !) त्यांचे नोकरचाकर या गोडाअून-मध्ये राहतात. आपला भयंकर अपमान झाला आहे, हे मला कळले. परंतु तेथील चौक्यात (चौका– स्वयंपाकघरातील चुलीभोवतालची जेवण्याची जागा) बसून शुद्ध तूप चोपडलेले फुलके व कढीभात खाल्ल्यानंतर आपण तो अपमानही पोटात घालू शकतो, असे मला वाटले. शेठजींचे सारे नोकर राजस्थानी. असमीया लोकां-बद्दलची तुच्छताबुद्धी त्यांच्या रोमरोमी खिळलेली. त्यात पुन्हा कालच्या गुवाहाटीच्या दंगलीमुळे त्यांचे पित्त खवळलेले. असमीया लोकांबद्दल त्यांनी काढलेले अनुदार अुद्गार अैकल्यानंतर असमीया लोक मारवाड्यांचा जो द्वेष करतात तो अस्थानी नाही, हे पुरेपूर पटले.

असमीया नाटक

रात्री श्री. प्रफुल्ल बोरा या तरुण नाटककाराचे 'कथा ओ काहिनी' हे नाटक सांस्कृतिक कार्यक्रमात पाहिले. दुबळ्या नवऱ्याची जहांबाज बायको, चैनीचे आयुष्य जगता यावे म्हणून पैसा मिळविण्याचे वाअीट मार्ग स्वीकारण्यास आपल्या मुलांना (अेक मुलगा व अेक मुलगी यांना) कशी भाग पाडते, याचे सुंदर चित्रण नाटकात आहे. अभिनय, रंगभूषा, वातावरणनिर्मिती वगैरे बाबतींत असमीया नाटक मराठी नाटकाच्या तोडीचे आहे, निदान मागे तरी खास नाही, असा ग्रह झाला.

रात्री भूकंपाचा धक्का बसला म्हणे! मला तरी तो कळला नाही. येथे अधूनमधून भूकंपाचे सौम्य धक्के जाणवत असतात. पण लोकांना त्याचे काही वाटत नाही. लाकडी घरे असल्यामुळे तसा फारसा धोकाही नसतो. कोयनेच्या भूकंपापासून मला पुण्यात सारखे धक्के जाणवत होते. रस्त्यावरून ट्रक गेला, तरी हादरल्यासारखे वाटायचे. आमच्या घरात मला अेकट्यालाच भूकंप जाणवे. त्या जाणिवेने मी अगदी वैतागून गेलो होतो. आता प्रत्यक्ष भूकंप झाला तरी त्याचा धक्का जाणवत नाही. हा या प्रवासाचा अप्रत्यक्ष फायदाच झाला म्हणावयाचा !

२८-१-६८

येथेही काळी निशाणे

सकाळी असमीयाचे विख्यात कथाकार सैयद अब्दुल मालिक यांची दोन-अडीच तासपर्यंत मुलाखत घेतली. चांगले मोकळेपणाने बोलले. या वेळी संमेलनामध्ये 'बुरंजी' (अितिहास) विषयाचे शाखा संमेलन होते. परंतु त्या विषयाची आधारभूत माहिती मला नसल्यामुळे मी तेथे थांबलो नाही. रविवार असूनही श्रोत्यांची अुपस्थिती मात्र रोडावलेली होती. दुपारच्या खुल्या अधिवेशनाला मात्र 'हाअूस फुल्ल' गर्दी होती. याचे अेक कारण असे, की संमेलनाचा गाभा असा हाच होता. दुसरे कारण म्हणजे असमचे राज्यपाल श्री. विष्णुसहाय यांचे शुभेच्छाप्रदर्शक भाषण व्हावयाचे होते. श्री. विष्णुसहाय अिंग्रजीत बोलले. वस्तुतः असममध्ये बंगालप्रमाणे हिंदीला प्रखर विरोध नाही. परंतु सुशिक्षितांमध्ये तो विरोध आहे. त्यामुळेच बहुधा त्यांनी (त्यांची मातृभाषा हिंदी असूनही) अिंग्रजीचा आश्रय घेणे पसंत केले असावे. अर्थात डॉ. नियोग यांनी त्यांचा भाषणाचा सारांश असमीयामध्ये सांगितला. ठरल्याप्रमाणे ते आपले भाषण संपवून (झेंडूच्या फुलांची माळ गळ्यात तशीच ठेवून) निघून गेले. ते मंडपातून बाहेर पडण्यापूर्वीच काही लोकांनी त्यांना काळी निशाणे दाखवून संकल्पित असम पुनर्रचना योजनेला निषेध नोंदविला. थोडा वेळ गोंधळ माजला. कोणीतरी म्हणाले, "काळी निशाणे दाखविणारे लाचित (लासित) सेनेचे लोक होते." मी म्हणालो, "मग त्यांना पकडले का नाही ?" या लाचित सेनेचा पुढारी कोण, त्याचे अनुयायी कोण वगैरे बाबतीत आपल्याला काहीच माहिती नाही, असे सरकार म्हणते. यांना पकडले असते, तर काहीतरी सुगावा लागला असता. परंतु ते खरे नसावे. लाचित सेनेसारख्या गुप्त दहशतवादी संघटनेचे लोक असे अुघडपणे निदर्शने करतील हे मला शक्य वाटत नाही. अर्थात त्यांच्या प्रेरणेने वागणारी ही शाळा-कॉलेजातील मुले असण्याची शक्यता आहे.

संमेलनाच्या आवारात निमंत्रित अतिथींना काळी निशाणे दाखवून त्यांचा जो अपमान करण्यात आला,त्यातील अनौचित्य, किंबहुना असभ्यपणा काही श्रोत्यांना खटकला. त्यांनी आपला निषेध नोंदविण्याचा प्रयत्न केला. थोडा वेळ सभेचे काम खोळंबले. परंतु त्यांच्या निषेधाचा विचार करण्याच्या मनःस्थितीत बहुसंख्य सभासद नसावेत. काम पुढे चालू झाले. असमची 'संहति' (अखंडता) टिकून राहावी म्हणून संघराज्य योजनेला विरोध, गुवाहाटीच्या दंगलीचा निषेध, असमीयाला खरीखुरी राजभाषा बनविण्याचा आग्रह आणि अुच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून असमीयाचा स्वीकार केला जाण्याची मागणी हे चार ठराव झटपट पसार झाले. त्यांच्यावर चर्चा, अुपसूचना वगैरे काही नसल्यामुळे ठराव मांडायचा, त्याला कोणीतरी अेका वाक्यात अनुमोदन द्यावयाचे व तो मते न घेताच पसार झाल्याचे घोषित करावयाचे;

असा क्रम होता. यानंतर चक्रीव्याख्यानमाला झाली. काही व्याख्याने (अुदाहरणार्थ, श्री. नीलमणी फुकन, श्री. अतुलचंद्र हाजरिका यांची भाषणे) वक्तृत्वकलेचा अुत्कृष्ट नमुना होती. काही रटाळही होती.

समारोपाच्या वेळी मी हिंदीतून संमेलनाच्या संचालकांचे आभार मानले. हेतू हा की कोणीतरी पुढे येअून आपली ओळख करून घ्यावी. परंतु येथेही बहुधा असमीया माणसाचा थंडपणा आड आला. अितक्या लांबून त्यांच्या साहित्य संमेलनाला मी हजर राहिलो याचे जणू त्याला काही कौतुकच वाटले नाही. माझा विरस झाला. परंतु असमीया माणूस अुपेक्षित का राहिला आहे त्याचे कारणही अुमगले.

रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात असमचे भारूड पाहिले. त्याला येथे 'भावना' (भाओना) म्हणतात. नृत्य, संगीत व नाट्य यांचा मजेदार मिलाफ त्यात असतो. वैष्णव परंपरेची धार्मिक पार्श्वभूमी त्याला असते. परंतु ते फार संथपणे चालते. रात्रभर चालते. त्यामुळे कंटाळवाणे होते.

असमीया कुटुंबात

आज संमेलन संपले. अुद्या येथे गुवाहाटीसारखीच दंगल व जाळपोळ होणार,असे सर्वजण गृहीत धरून चालले आहेत. अर्थात असमीयांना अस्वस्थ होण्याचे कारण नाही. ते शांत आहेत. परंतु बिगर असमीया व विशेषतः मारवाडी घाबरून गेले आहेत. संमेलनामुळे मला तेजपूर शहर पाहता आले नाही. ते अुद्या पाहावे असे ठरविले आहे. परंतु ज्यांच्या गोदामात मी जाअून पडलो होतो त्या शेठजींचे सारे नोकरचाकर पार घाबरून गेले होते. त्यांच्या विवंचनेत माझी भर नको म्हणून गावाबाहेरच्या लंबोदर बरा रोडवरील श्री दुर्गा तालुकदार या तरुणाच्या घरी राहावयास आलो. दुर्गा हे दुर्गादत्त किंवा दुर्गादास याचे संक्षिप्त रूप. परंतु तेच प्रचारात आहे. दुर्गा अर्थशास्त्र घेअून अेम्. अे. झाला आहे. नोकरी शोधतो आहे. घर त्याचे स्वतःचे आहे. चांगले प्रशस्त आहे. शहरात असूनही शहरीपण त्याच्यावर नाही. घरच्या विहिरीचेच पाणी. भात साठविण्याचे कोठार आहे, परसात गोठा आहे. गायी आहेत. बदके आहेत कोंबडीची अंडी व कोंबड्या असममध्ये हिंदूंच्या दृष्टीने निषिद्ध समजल्या जातात. ते मुसलमानांचे खाद्य. हिंदूंनी बदकाचीच अंडी खाल्ली पाहिजेत. तालुकदार हे कायस्थ. शेतीवाडी आहे. व्यापारधंदाही आहे.

२९–१–६८

दिवसभर भटकून तेजपूर पाहिले. मोठे रमणीय स्थान आहे.

असमीया पद्धतीचे शाकाहारी जेवण, शेणाने स्वच्छ सारविलेल्या स्वयंपाकघरात, पाटावर बसून घेतले. भात, वरण व भाज्या. फोडणीला मोहरीचे तेल. मला अेव्हाना त्याची सवय झाली होती. घरचे दूध. पाण्याचा अेक थेंबही जे सहन करू शकणार नाही

अितके पाणचट. मुख्यत: चहासाठीच त्याचा अुपयोग. मी माझ्याबरोबर नेस्कॅफेचा डबा घेतलेला आहे. त्याची कॉफी या दुधात चांगली होते. स्वयंपाकघरात सामानसुमान फार थोडे. भांडीकुंडीही अगदीच मोजकी. बहुतेक सगळी काशाची. लख्ख, चकचकीत. चहापाण्याची चूल वेगळी आणि स्वयंपाकाची वेगळी. स्नान करून धूतवस्त्र नेसल्याखेरीज स्वयंपाकघरात प्रवेश नाही. बायका अत्यंत शालीन व अबोल. बोलतील तेव्हाही शांत स्वरात. कचाकचा वचावचा बडबडायच्या नाहीत. संसाराचा सारा गाडा त्याच चालवितात.पण त्याचा अहंकार नाही.किंबहुना आपण किती मोठे काम करतो आहोत, याची जाणीवही नाही. बहुधा यामुळेच असममध्ये स्त्रीचे स्थान समाजजीवनात फार अुच्च आहे. तिचा अपमान केला जात नाही. वेश्याव्यवसायात चुकूनही न आढळणारी अेकमात्र भारतीय स्त्री म्हणजे असमीया.

दुर्गाच्या कॉलेजात शिकणाऱ्या बहिणीने घरच्या मागावर विणलेला टॉवेल (गामोछा) मला भेट म्हणून देण्यात आला. प्रत्येक घरात माग असतोच. दुपारच्या वेळी घरच्या स्त्रिया त्यावर कापड विणतात. टॉवेल, चादरी, परकर (मेखेला) यांच्या विणकामात नक्षीही असते. मुगा, अेंडी वगैरे जातींच्या रेशमांचेही विणकाम चालते. मुलगी श्रीमंत असो, गरीब असो, शिकलेली असो की अशिक्षित असो, तिला मागावर बसून विणता हे आलेच पाहिजे. त्यामुळे येथील स्त्री कधीच परावलंबी राहिली नाही. या स्वावलंबनामुळेच तिला हे मुक्त व मानाचे स्थान मिळाले असले पाहिजे, हे अुघड आहे.

असमीया पुरुष थंड, सुस्त प्रकृतीचा. स्त्रीवर अधिकार गाजवावा, जुलूमजबरदस्ती करावी,अशी अिच्छाच त्याच्या मनात निर्माण होत नाही.बाहेरख्यालीपणाही नाही. भात-मासळीचे जेवण करावे; आणि नशा आणणारा तांबूल भक्षण करून गुंगीत पडावे. घरची विवंचना नको की दगदग नको. महत्त्वाकांक्षा नाही, धकाधकीच्या मामल्यात अुतरण्याची अिच्छा नाही, गावाबाहेर, जिल्ह्याबाहेर, प्रांताबाहेर जाअून वेगळे जग पाहण्याची अुत्सुकता नाही. बाहेरच्या लोकांनी येअून त्याची आर्थिक कोंडी केली नसती,तर कदाचित त्याची ही सुस्ती जगाच्या अंतापर्यंत कायम राहिली असती.

शिवसागर
३०–१–६८

ब्रह्मपुत्राचे प्रथमदर्शन

सकाळी ८ ला बसने निघून अर्ध्या तासात ब्रह्मपुत्राच्या घाटावर आलो. घाटाचे नाव भोमोरागुरी किंवा भुमरागुरी. ब्रह्मपुत्राचे हे प्रथम दर्शन. ही काही ब्रह्मपुत्रा नदी नव्हे. हा आहे महाबाहू ब्रह्मपुत्र. त्याचा अफाट विस्तार पाहून छाती दडपूनच जाते. या नदावर पूल का बनू शकत नाही याची कल्पना आली. पात्र सारखे

बदलत असते. यामुळे घाटही दरसाल बदलतो. अर्थात घाट म्हणजे अुतार. दगडी घाट नव्हे. दगडी घाट बांधणेच शक्य नाही. दगड तरी कुठून आणणार ?

या ठिकाणी पात्राची रुंदी अडीच मैल आहे. अेंजिनवाल्या फेरीबोटीतून नद पार करावा लागतो. बोट सरळ रेषेत आडवी जात नाही, कारण मध्ये अेक बेट आहे. त्याला वळसा घालून जावे लागते. पात्र ओलांडायला पाअूण तास लागला. काठावरील झाडीदार टेकडीचे दृश्य मोहवून टाकते. डोळे खिळून राहतात. पात्र खूप खोल आहे. सुसरी मगरीही खूप आहेत म्हणे. बर्फाचे थंडगार पाणी. तरीही काही षौकीन त्यात पोहतात. अर्थात् कडेला.

महाराष्ट्र सरकारच्या मोटारीत

बोटीवर काही मोटारी चढविण्यात आल्या होत्या. त्यात महाराष्ट्र सरकारच्या अेस्. आर्. पी. (स्टेट रिझर्व्ह पोलिस) ची अेक व्हॅन होती. सहज कुतूहल म्हणून चौकशी केली. गाडीबरोबर पुण्याचे अेक हवालदार श्री. पवार होते. मी महाराष्ट्रातून आणि त्यात पुन्हा पुण्याहून आलो आहे,हे कळताच त्यांना फार आनंद झाला. थोड्याच वेळात आमची गट्टी जमली. पुण्याचा माणूसही प्रांताबाहेर गेल्यानंतर किती माणसाळतो याचे सुखद प्रत्यंतर आले. त्यांची गाडी डिब्रुगडला चालली होती. मी शिवसागरला जाणार असल्याचे कळताच पवार मला म्हणाले, "तुम्ही आमच्या गाडीतूनच का येत नाही ? तुम्ही आमच्याबरोबर आलात, तर आम्हांला आमचा सन्मान झाल्यासारखे वाटेल." पुण्याचा माणूसही अेखाद्या खानदानी अुर्दू भाषिकासारखे भाव व्यक्त करू शकतो हा अनुभव नवा होता.

पलीकडील घाटाचे नाव शिलघाट. मला शिवसागरच्या गाडीत बसवून देण्यासाठी बरोबर दुर्गा आला होता. परंतु आता त्याला थांबण्याची जरूर नव्हती. म्हणून तो परत गेला. सबंध दिवसात बोट फक्त दोनच फेऱ्या करते. रहदारीच कमी. आपल्याकडे अशा शहराजवळच्या बोटीला निदान दहा तरी फेऱ्या कराव्या लागल्या असत्या.

अेस्. आर्. पी.चे कमांडंट श्री. पद्मनाभन् (अमरावतीचे माजी डी. अेस्. पी.) यांच्याशी पवारांनी माझी ओळख करून दिली. ते आपल्या जीपमधून चालले होते. मोठे अुत्साही व अुमदे गृहस्थ वाटले. शिपायांबरोबर मिळूनमिसळून वागतात असे पवारांनी सांगितले. ते अिंग्रजीत मला म्हणाले, "तुम्ही अिथे आला आहात ते मला समजले होते. परंतु मी तुम्हांला तेजपुरात भेटू शकलो नाही, याबद्दल दिलगीर आहे." बहुधा संमेलनातील माझ्या व्याख्यानामुळे माझी अुपस्थिती त्यांना समजली असावी. तेजपुरात मराठी मंडळीही बरीच असल्याचे समजले. त्यांच्यापैकीही कोणी माझी चौकशी केली नाही. हे लक्षात आल्यानंतर असमीया लोकांनी चौकशी न केल्याबद्दल आलेला राग आपोआपच ओसरला.

अेस्. आर्. पी. ची कामगिरी

तेजपूरला दंगल का झाली नाही याचे कारणही येथे समजले. सर्व शहरभर महाराष्ट्र सरकारचे पोलिस जय्यत तयारीत होते. त्यामुळे दंगलखोरांना हिंमत

झाली नाही. महाराष्ट्र सरकारचे अेस्. आर्. पी. या ठिकाणी अेक फार महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत. सुमारे ६०० जवान आहेत. नेफा भागातील सर्वसामान्य जनतेला गनिमी काव्याचे शिक्षण ते देत आहेत. अेरव्हीच्या जीवनात हे लोक सामान्य शेतकऱ्यांप्रमाणेच राहतील; परंतु प्रसंग पडताच बंदुका सरसावून दुष्मनाशी मुकाबला करतील. मैदानी असमीयांपेक्षा हे डोंगरी लोक अधिक दणकट व निर्भय आहेत. शाळा-कॉलेजातील मुला-मुलींनाही नेमबाजीचे शिक्षण देण्याचे काम अेस्. आर्. पी. चे लोक करतात. मराठी जवान संयमाने, समजूतदारपणाने वागतात. त्यामुळे त्यांच्याबद्दल सर्वसामान्य जनतेत आत्मीयता, आदर व विश्वास आहे. अर्थात काही सुशिक्षितांना मात्र असे वाटते, की या लोकांवर आपले सरकार निष्कारणच पैसे खर्च करीत आहे. वस्तुतः हा पैसा केंद्र सरकारचा आहे. आणि केवळ देशरक्षणाच्या भावनेनेच मराठी जवान महाराष्ट्रापासून अितक्या दूर परमुलखात, घरादारांपासून, मुलाबाळांपासून दूर, अितकी वर्षे राहात आहेत. खरे म्हणजे असम सरकारनेच आपल्या प्रजाजनांमधील हा गैरसमज दूर केला पाहिजे. पण पर्वा कुणाला ?

येथील मुलांपेक्षा मुली अधिक अुत्साहाने व लक्ष लावून नेमबाजीचे शिक्षण घेतात; आणि त्यात प्रावीण्य मिळवितात असा अनुभव आहे. येथील काही खानदानी असमीया मुलींनी मराठी जवानांशी लग्नेही केली असल्याचे समजले. मला आठवले, मेजर कँडेथ (गोव्याचे माजी अुपराज्यपाल) अेकदा खासगी संभाषणात म्हणाले होते, "माझ्या हातात अधिकार असते, तर मी माझ्या साऱ्या अविवाहित जवानांना नगा मुलींशी लग्न करायला सांगितले असते. तसे झाले तर हा प्रश्न चुटकीसरशी सुटेल." यातील विनोद बाजूला ठेवला, तरी भारतामध्ये अेकात्मता निर्माण करण्याच्या बाबतीत आंतरप्रादेशिक विवाह चांगला हातभार लावतील, असा विचार मनात आल्याशिवाय राहात नाही. आमचे डॉ. अमलेंदू गुह बंगाली आहेत, तर त्यांच्या पत्नी असमीया आहेत. प्रा. राव आंध्रचे आहेत, तर त्यांच्या पत्नी बंगाली आहेत; आणि त्यांचे वैवाहिक जीवन फार छान चालले आहे. असममधील बिगर असमीया लोकांनी येथे बेटीव्यवहार वाढविले, तर त्यांच्याविषयीची कटता खात्रीने कमी होअील.

ब्रह्मपुत्राचा लहरीपणा

ब्रह्मपुत्राचे पात्र बदलले म्हणजे काय घडते ते येथे पाहावयास मिळाले. पात्र बदलले, की घाट बदलतो आणि मग घाटाकडे नेणारा रस्ताही बाद होतो. त्यामुळे जवळपास ५–६ मैलपर्यंत पक्का रस्ता बांधता येत नाही. नुकताच ३ मैल रस्ता पाण्याखाली गेला आहे. तो मार्ग बदलून वरच्या बाजूने नवा रस्ता काढला आहे. असममध्ये सर्वत्र कच्चे, लाकडी पूल आढळतात. जेव्हा फारशी रहदारी नव्हती तेव्हा ते ठीक होते. आता लष्करी हालचालींमुळे वाहतूक वाढली आहे. तिच्यापुढे हे पूल टिकाव धरणार नाहीत. म्हणून नवे काँक्रीटचे पूल तयार केले जात आहेत. कच्चा पूल येण्यापूर्वी अेक पाटी लागते; 'लाहे लाहे गाडी चलाओक' (धीरे गाडी हाक रे !) असमचे सारे जीवनच 'लाहे लाहे' चाललेले असते. अगदी संथपणे ! लोकांनी कच्च्या

पुलांवरून गाडी जोरात चालवू नये म्हणून पुलाच्या अलीकडे-पलीकडे रस्त्याला अुथळ गटारासारख्या खाचा पाडलेल्या आहेत. त्यामुळे नाअिलाजाने गाडीचा वेग कमी करावाच लागतो. आमच्या गाडीचे ड्रायव्हर तारगाव (सातारा) चे श्री. भोअिटे मोठे कुशल चालक होते. ते या भागात खूप हिंडले आहेत. त्यांच्याकडून, पवारांकडून व सोलापूरचे साठे यांच्याकडून पुष्कळ गोष्टी अैकायला मिळाल्या.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मैलन् मैल पसरलेले चहाचे मळे होते. पूर्वी चहाच्या मळ्यातील मजुरांना– हे मुख्यतः बिहार, ओरिसा व आंध्र या प्रांतातील आहेत– किलोला ८ पैसे मजुरी मिळत होती. ती आता १६ पैसे झाली आहे. मळेवाले मालक मजुरांना अेस्. आर्. पी.कडून शिक्षण घेण्यास परवानगी द्यायला तयार नव्हते, पण सरकारकडून दडपण आणून त्यांना परवानगी देणे भाग पाडण्यात आले. मजुरांनी शिकून शहाणे व्हावे हे अर्थात मळेवाल्यांना पसंत नाही. त्यामुळे मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची नीट सोय केली जात नाही.

जोरहाटला विश्रांती

तेजपूर (शिलघाट) हून दिब्रुगड १६४ मैल. त्याच्या मध्यावर जोरहाट लागले. दुपारच्या जेवणासाठी गाडी थांबविण्यात आली. गाडीत डिब्रुगडहून विशिष्ट प्रशिक्षणासाठी तेजपूरला नेण्यात आलेल्या डोंगरी तरुणांची अेक तुकडी होती. तेजपूरला शिक्षणक्रम पूर्ण करून हे तरुण आपापल्या गावी परत चालले होते. त्यांना जरा पाय मोकळे करावयाचे होते. पवारांबरोबर मीही गावातून थोडा फेरफटका मारून आलो. गावाची आखणी मोठी प्रशस्त वाटली. विशेषतः बाजारभाग सगळा नवा असून तेथील अैसपैस रस्ते चांगले आहेत. अितके रुंद रस्ते असमात अन्यत्र नाहीत असे समजले. जोरहाटला विमानदलाचे मोठे केंद्र आहे. तेथील फ्लाअिंग ऑफिसर जयंत जोशी यांच्यासाठी त्यांच्या बहिणीने पत्र दिले होते. परंतु जोरहाटमध्ये मला थांबावयाचे नव्हते. त्यामुळे ते पत्र कसे पोचवावे याचा विचार करू लागलो. अितक्यात महाराष्ट्र सरकारची गाडी पाहून श्री. शरद आरवीकर हे तेथे आले. त्यांना वाटेत असलेल्या आपल्या बिऱ्हाडापर्यंत जाण्यासाठी 'लिफ्ट' हवी होती. त्यांच्याकडे जोशींचे पत्र दिले. पत्ता पाहून ते म्हणाले, "तुम्ही त्यांना फोन का करीत नाही ?" आणि ते अेका मारवाड्याच्या दुकानात मला घेअून गेले. फोन केल्यावर समजले, की जोशी रजा घेअून पुण्याला गेले आहेत. म्हणजे पत्राची गरजच अुरली नव्हती.

शिवसागरला ४ वाजता पोचलो. अंधार पडू लागला होता. डॉ. गुहांनी दिलेले पत्र घेअून स्थानिक महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. चालिहा यांच्या घरी गेलो. ते परगावी गेल्याचे समजले. त्यांच्या घरच्या तरुणांनी डॉ. गुहांचे पत्र वाचून पाहिले, आणि अेका शब्दानेही चौकशी न करिता मख्खपणे परत देत म्हटले, "ते अिथं नाहीत." या नाही, बसा नाही, पाणी नाही, पान नाही ! अितक्या लांबून परमुलखातून आलेला हा

गृहस्थ अशा अवेळी कुठे जाओील याची चिंता नाही. असमीया आतिथ्यशीलतेचा हा अेक अजब अनुभव होता.

डॉ. गुहांनी येथील कयुनिस्ट आमदार श्री. प्रमोद गोगोअी यांच्यासाठीही अेक पत्र दिले होते. पण जेमतेम १५ हजार लोकवस्ती असलेल्या या गावी आपल्या प्रतिनिधीचा नीट पत्ता सांगणारी व्यक्ती मला भेटली नाही. काँग्रेस कचेरीत किंवा खादी भांडारात जाअून कम्युनिस्टाची चौकशी करणे म्हणजे देवळात जाअून सैतानाची चौकशी करण्यासारखे होते. परंतु अनेकदा सैतानाचा पत्ता पुजाऱ्यालाच जास्त नक्की माहीत असतो, म्हणून तेथे जाअून विचारले. कामगारांसारख्या दिसणाऱ्या लोकांकडे चौकशी केली. परंतु प्रत्येकजण अुलटसुलट सांगत होता. पार्टीच्या कचेरीचाही पत्ता मिळाला नाही. यातून मी असा निष्कर्ष काढला, की असमीया माणूस अितरांच्याच बाबतीत नव्हे, तर आपल्या लोकांच्याही बाबतीत पूर्ण बेफिकीर असावा.

हॉटेलातील अेक रात्र

अखेर 'कमला हॉटेल' या बाहेरून स्वच्छ व आकर्षक वाटणाऱ्या हॉटेलात येअून अुतरलो. परंतु खोलीचे रूपरंग पाहून हादरलोच. येथे हवा नाही की प्रकाश नाही. खाली ओल आहे. जवळून वाहणारे अुघडे गटार, कुजलेल्या अन्नाची व पाटीच्या संडासाची दुर्गंधी आणि डासांची झुंबड. अितक्या गलिच्छ जागेत राहण्याचा आयुष्यातील बहुधा हा पहिलाच प्रसंग असावा. हॉटेलच्या पोऱ्याने कॉफी म्हणून जो पदार्थ आणून दिला तो घशाखाली अुतरविण्यापूर्वीच मळमळू लागले. आपण निष्कारण शिवसागरला अुतरलो. त्याअैवजी सरळ डिब्रुगडला गेलो असतो तर बरे झाले असते, असा पश्चात्ताप होअू लागला. परंतु येथील जुनी देवळे पाहण्याची अनिवार अिच्छा या पश्चात्तापाला दडपून टाकीत होती.

गुवाहाटी विद्यापीठातील अेम्. अे. च्या दुसऱ्या वर्षाचा अेक विद्यार्थी अुमेशचंद्र दोलै माझ्या खोलीतील दुसऱ्या खाटेवर आला. मी त्याला म्हणालो, "बाबारे, अितक्या घाणेरड्या हॉटेलात कशाला आलास?" तो अुत्तरला, "साहेब, या गावातले हेच सर्वोत्कृष्ट हॉटेल. मला येता-जाता नेहमीच अिथे मुक्काम करावा लागतो." मी कपाळावर हात मारून म्हटले, "हे जर चांगले हॉटेल असेल, तर मग वाअीट हॉटेल कसे असेल?" दोलै हा मैदानी जमातीचा. त्याच्याकडून गुवाहाटीच्या दंगलीची अधिक हकीकत समजली. तो स्वतः असमच्या पुनर्रचनेच्या विरुद्ध आहे.

रात्री जेवणाची चौकशी केली तेव्हा येथे चपाती मिळू शकते असे समजले. मी चपाती व भाजी करायला सांगितले. अर्थात हा झाला 'स्पेशल मेनू.' चार आण्याची चपाती अन् रुपयाची भाजी!

याच हॉटेलात काही नगा विद्यार्थी आले आहेत. गोरेपान, तरतरीत, अपटुडेट पाश्चात्त्य पोषाखातील हे तरुण सर्वसामान्य गबाळचा असमीयांहून प्रथमदर्शनीच वेगळे वाटले. त्यांनी जेव्हा रात्री सामुदायिक गायनाचा कार्यक्रम सुरू केला तेव्हा

गोव्यातील ख्रिश्चनांच्या सामुदायिक गायनाचे मला स्मरण झाले. त्यांची काही गाणी त्यांच्या लोकभाषेत– नगामीमध्ये, तर काही चक्क अिंग्रजीत होती. गोव्यातील गाण्यांवर पोर्तुगीज संगीताची छाप आहे, तर यांच्या गाण्यावर अमेरिकन संगीताची. यांचे पाश्चात्यीकरण किती मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेले आहे, हे पाहून आश्चर्य वाटले नाही; परंतु ते होअू देणाऱ्या आमच्या राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाबद्दल विषाद मात्र अवश्य वाटला.

आहोम राज्याची मागणी

आज येथील आहोम लोकांनी आपल्यासाठी स्वतंत्र राज्याची मागणी करण्याकरिता मिरवणूक काढली होती. बिगर आहोम असमीया लोकांनीही या भागातून चालते व्हावे, असे त्यांचे म्हणणे. अेकदा फुटीर वृत्ती सुरू झाली, की ती कुठवर घेअून जाते याचे हे अुत्कृष्ट अुदाहरण आहे. आहोम हे काही लोकांच्या मते चीनच्या युनान प्रांतातून आलेले मंगोलियन, तर काहींच्या मते ब्रह्मदेशच्या मार्गाने आलेले थाय लोक. मोठे पराक्रमी. त्यांनी आपली मोठमोठी राज्ये येथे स्थापन केली. असमच्या संस्कृतीत त्यांनी फार मोलाची भर घातली आहे. फुकन, सत्य (चेतिया) फुकन, चलिहा, बरगोहाँओी, बुरा (बडा) गोहाँओी, बुरापन गोहाँओी वगैरे आडनावे असलेले लोक आहोम आहेत. ते मुख्यतः लखीमपूर व शिवसागर या दोन जिल्ह्यांतच आहेत. शिवसागर ही त्यांच्या भावी राज्याची राजधानी. परंतु हे दोन्ही जिल्हेही त्यांना संपूर्ण मिळण्याची शक्यता कमी आहे. तिनसुकिया व डिगबअि या तालुक्यांत मटक जमातीचे लोक मोठ्या संख्येने आहेत. जोरहाट व शिवसागरचा काही भाग नगा लोक मागत आहेत. तर नॉर्थ लखीमपूरच्या काही भागावर नेफातील अबोर लोक हक्क सांगत आहेत.

डिब्रुगड
३१–१–६८

डिब्रुगडमध्ये प्रवेश

सकाळी अुठून जवळच असलेला शिवसागर तलाव आणि त्याच्या काठावरची मंदिरे पाहिली. जुन्या अवशेषांपैकी रंगघर काल शिवसागरला येतानाच पाहिले होते. त्यामुळे अधिक दूर असलेले भग्नावशेष पाहावयास गेलो नाही. देवळाच्या आवारात अेक गमतीदार दृश्य दिसले. बैराग्यासारख्या अेका भिकाऱ्याने आपल्या अंथरुणाभोवती मच्छरदाणी लावलेली होती. अंथरूण गलिच्छ चिंध्यांचेच होते परंतु मच्छरदाणीत झोपणारे भिकारी बहुधा असममध्येच असावेत. अर्थात असममध्ये असमीया भिकारी नाही. सगळे भिकारीही अुपरेच. अेखाद्या समाजात भिकारी व वेश्या नसणे ही वस्तुतः किती गौरवास्पद गोष्ट आहे! असममध्ये मूर्तिपूजा नाही, अस्पृश्यता नाही आणि परवापरवापर्यंत जातीय (हिंदू-मुसलमानातील) वैमनस्यही

नव्हते. हा परंपरेचा वारसा खरे म्हणजे असमने साऱ्या भारताला द्यायला हवा होता. पण त्यासाठी लागणारे कष्ट कोणी करावयाचे ? आपले गाव सोडून बाहेर कुणी पडावयाचे ? समृद्ध संस्कृतीही कर्तबगारीच्या अभावी कशी कोमेजून जाते, डबक्यातल्या पाण्यासारखी सडू लागते, त्याचे प्रत्यक्ष अुदाहरण म्हणजे असमीया संस्कृती व असमचे लोक.

शिवसागरहून डिब्रुगड ५० मैल.रस्ता छान. बसने दोन तासांत आणून पोचविले. बसस्टँड येण्यापूर्वी डिब्रुगड विद्यापीठाच्या वसतिगृहाच्या अिमारती लागतात. लहानलहान झोपडयांसारख्या. असममधील हे दुसरे विद्यापीठ नुकतेच स्थापन झाले आहे. मुख्यतः अुत्तर असमच्या लोकांसाठी. या विद्यापीठासाठी अेका राजस्थानी धनिकाने विपुल द्रव्य दिले असल्याचे समजले. बसस्टँड गावापासून मैलभर दूर आहे. स्टँडवर गाडी पोचते न पोचते तोच जोराची सर आली. भर दुपारी अेक वाजता संध्याकाळ झाल्याचा भास होअू लागला. येथे पावसाळा कसा जात असेल, याची झलक पाहायला मिळाली. स्टँडवर सुटाबुटातले अेक गृहस्थ भेटले. वस्तुतः ते गाडीत माझ्या शेजारीच होते. परंतु नवख्या माणसाशी बोलायला असमीया माणूस फार बुजतो. मी त्यांना बोलते करण्याचा खूप प्रयत्न केला होता, परंतु ते आपल्या मौनव्रतापासून विचलित झाले नव्हते. अखेर मीच त्यांना माझ्याजवळचा पत्ता दाखविला. ते म्हणाले, "मी डॉ. चक्रेश्वर दासांना ओळखतो." पण जेव्हा मी त्यांना म्हटले की, "त्यांच्याकडे जाण्याच्या बाबतीत तुम्ही मला काही मदत करू शकाल काय ?" त्याबरोबर स्वारी अंग झटकून मोकळी झाली. "मी अिथला नाही, मला अिथलं काही माहीत नाही. तुम्हीच जाअून चौकशी करा. . ." वगैरे. या माणूसघाणेपणामुळे असमीया लोकांना मित्र मिळत नसतील, तर नवल नाही. बंगाली माणसात लाख दोष असतील; पण मधुर भाषण करून माणसे जोडण्यात तो पटाअीत असतो, आणि बहुधा म्हणूनच तो जिथे जातो तेथे पाय रोवू शकतो.

डॉ. चक्रेश्वर दास मेडिकल कॉलेजच्या पोस्टऑफिस शेजारीच राहतात. गल्लीत जाअून चौकशी केली. परंतु 'आम्हांला माहीत नाही,' हे ठराविक अुत्तर मिळाले. पुणेकरांनाच नावे ठेवायला नकोत. अखेर पोस्टऑफिसातच चौकशी केली. त्याला लागूनच डॉ. दासांचा बंगला होता.

डॉ. दास हे डॉ. गुहांचे साडू. आज त्यांचा ऑपरेशन्सचा वार असल्यामुळे ते घरी नव्हते. परंतु सौ. दास यांनी आस्थेने स्वागत केले. असमीया कुटुंब आहे. परंतु अुच्च शिक्षण व प्रांताबाहेरचा (डॉ. दास तर परदेशालाही जाअून आले आहेत) प्रवास यांमुळे वागण्यात अेक प्रकारचा मोकळेपणा आला आहे. नाक-कान-घशाचे स्पेशालिस्ट. परंतु पेशंटचे नाक दाबून पैसा काढणारे नव्हेत. घरीही पेशंट येतच होते. त्यातून सवड काढून माझ्याशी गप्पा मारीत होते. गुवाहाटीची दंगल पाकिस्तानी मुसलमानांनी किंवा डाव्या कम्युनिस्टांनी घडवून आणली असावी, असे त्यांना वाटते. असमीया नोकर अंगमोडून मेहनत करीत नाहीत म्हणून नेपाळी, बिहारी वगैरे

लोकांना असममध्ये नोकऱ्या मिळतात, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या घरचे नोकरही बिगर असमीयाच आहेत.

मारवाडयांची बाजू

पावसामुळे थंडीचे प्रमाण भलतेच वाढले आहे. त्यात पुन्हा करवतीप्रमाणे कापणारे वारे. घरातून बाहेर पडावे असे वाटत नव्हते. पाऊस थांबला नव्हता. तरीपण डॉक्टरांनी गाडी काढली, आणि मला घेऊन गावातील आपल्या मित्रांकडे गेले. श्री. सीताराम बुकरेडिया, श्री. महावीर तुलस्यॉंग, श्री. शंकर जयपुरिया वगैरे मुख्यत: मारवाडी मंडळीच त्यात होती. त्यांच्याकडून मारवाडी समाजाची बाजू अैकायला मिळाली. तिचा सारांश असा– "आम्ही अनेक पिढ्यांपूर्वी आपला प्रांत सोडून अिकडे आलो. आता राजस्थानात आमची घरे-दारे, नातेवाअीक वगैरे कोणी नाहीत. तिकडे आम्ही परदेशी बनलो आहोत. आता अिथले लोक आम्हांला परदेशी ठरवू पाहात आहेत. तेव्हा आम्ही काय करावे? कुठे जावे? अगदी खेड्यापाड्यात जाअून, हालअपेष्टा सहन करून राहिलो; आणि पोटाला चिमटा घेअून पैसा जमा केला. हा पैसा येथेच खर्च होतो. नोकरदारांप्रमाणे तो प्रांताबाहेर जात नाही. अशा स्थितीत आम्ही येथून गेल्याने असमचा काय फायदा होअील? स्वत: असमीया लोक अुद्योग-धंदा करणार नाहीत. आम्ही निघून गेलो, तर आमची जागा पंजाबी, सिंधी, बिहारी घेतील. असमचे तरुण खेड्यात राहून शेती करायला तयार नाहीत. शहरी जीवनाची चटक त्यांना लागली आहे. येथे फक्त १०० रु. पगार मिळाला तरी हरकत नाही. घरी म्हातारे आअीबाप शेती करतात. त्यांच्याकडून तांदूळ आणावा आणि मिळणारा पैसा कपड्यांच्या छानछोकीत व दारू-मांस-मच्छर खाण्यात अुडवावा, अेवढीच त्यांची महत्त्वाकांक्षा. काम न करिता पैसा मिळावा, ही वृत्ती. जे लोक असमच्या बाहेर शिक्षणाच्या किंवा नोकरीच्या निमित्ताने जातात ते पुन्हा असमात परत येअू अिच्छित नाहीत; कारण त्यांची दृष्टी विशाल-व्यापक बनते. त्यांना येथले कोंदट वातावरण आवडेनासे होते. . ." वगैरे.

मारवाडयांचे दोष

श्री. सीतारामजी हे देशभर हिंडलेले आहेत. ते डॉ. लोहियांचे मित्र व नातेवाअीक. त्यामुळे मारवाड्यांचे दोषही त्यांना चांगले माहीत आहेत. ते म्हणाले, "मारवाडी लोक येथल्या लोकांची भाषा शिकून त्यांच्याशी समरस होत नाहीत. त्यामुळे त्यांच्याबद्दल येथील लोकांना प्रेम वाटत नाही. दुसरा दोष म्हणजे जरा पैसा साठला की लग्न-समारंभ वगैरे अितक्या थाटामाटात करतात, की ते येथल्या लोकांच्या डोळ्यांवर येते, आर्थिक विषमतेची जाणीव त्यांना तीव्रतेने होते. मी या लोकांना अनेकदा सांगतो की बाबांनो, जरा जपून समारंभ करा. अन्नाची व साखरेची टंचाअी असताना पंचपक्वान्नांच्या जेवणावळी घालू नका. पण लक्षात कोण घेतो?"

दोन मंत्र्यांची तुलना

श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. गुलजारीलाल नंदा या दोन आजी व माजी गृहमंत्र्यांची मजेदार तुलना येथे अैकावयास मिळाली. लोकांचे म्हणणे असे की, "यशवंतराव वरून जरी शौर्याचा मोठा आव आणीत असले, तरी आतून ते फार भित्रे आहेत. याच्या अुलट नंदा वरून मवाळ वाटले, तरी मनाने चांगले खंबीर होते. त्यांनी पुनर्रचनेच्या नावाखाली असमची फाळणी करण्यास साफ नकार दिला होता. यशवंतरावांनी मात्र ख्रिस्ती डोंगरी नेते आणि सरकारातील अस्मिताशून्य, आपली गादी टिकवू पाहणारे, स्वार्थी मंत्री यांच्या दडपणाला बळी पडून असमसाठी संघीय पद्धतीच्या पुनर्रचनेची घोषणा केली. तेव्हापासून ते असममध्ये अत्यंत अप्रिय झाले आहेत." हे विधान कितपत खरे आहे कोण जाणे. परंतु आज असममध्ये यशवंतराव व अिंदिराजी या दोघांविषयी अत्यंत कटू अुद्‌गार अैकावयास मिळतात हे मात्र खरे.

डिगबअि (डिग्बोय)
१–२–६८

चिनी मालाची चोरटी आयात

सकाळी डिब्रुगडचे मुख्य आकर्षण ब्रह्मपुत्र पाहिला. दुपारचे जेवण श्री. जयपुरिया यांच्या घरी राजस्थानी पद्धतीचे झाले. नेपाळ व पाकिस्तानमार्गे असममध्ये चिनी माल– मुख्यतः फाअुंटनपेन्स, घड्याळे, ट्रॅन्झिस्टर्स वगैरे चैनीच्या वस्तू किती मोठ्या प्रमाणावर येतात त्याची हकीकत समजली. ही चोरटी निर्यात करून त्यातून मिळणारा पैसा भारतातील आपल्या हस्तकांना पुरवावयाचा असा चीनचा डाव असतो. 'वाँग-माँग', 'यूथ' वगैरे चिनी फाअुंटनपेन्स पार्करच्या तोडीची आहेत, आणि तरीही त्यांची किंमत मात्र अगदी कमी. फक्त १०–१२ रुपये. भारतापेक्षा आज पाकिस्तानात अधिक स्वस्ताअी व समृद्धी का दिसते याचीही कल्पना या चोरट्या आयातीवरून येते. परंतु अंतर्गत यादवीने ग्रासलेला चीन अितक्या अुत्कृष्ट दर्जाचा चैनीचा माल तयार करू शकतो आणि शांततेत वावरणारा भारत अजूनही या मालासाठी चोरट्या आयातीवरच अवलंबून आहे, तसला माल त्याला तयार करिता येत नाही, हेही लक्षणीय म्हटले पाहिजे.

रमणीय बंगला नं. १६

डिब्रुगडहून सायंकाळी ३–३० ला बसने निघून तिनसुकिया (तिनिचुकीया) मार्गे ६–३० ला येथे पोचलो. डिब्रुगडहून तिनसुकिया ३० मैल. २८४६८ लोकसंख्या असलेले हे शहर व्यापारी दृष्ट्या फार महत्त्वाचे आहे. अर्थात सारा व्यापार मारवाड्यांच्या हातात आहे. येथून डिगबअि २० मैल. सौ. शोभनाताअी रानडे यांच्या

रमणीय बंगल्यात अुतरलो आहे. सौ. शोभनाताअी असमच्या फार थोर सामाजिक कार्यकर्त्या आहेत. असमच्या लोकजीवनाशी त्या अितक्या अेकरूप झाल्या आहेत, की गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांना असममधून लोकसभेवर निवडून पाठविण्याचा विचार चालू होता, परंतु प्रांतीय भावनेचा जोर वाढल्यामुळे ते शक्य झाले नाही, असे मला डिब्रुगडलाच समजले होते. त्यांचे अेंजिनियर यजमान श्री. बाळासाहेब रानडे असम ऑअिल कंपनीत फार मोठ्या हुद्यावर आहेत. कंपनीतील गोऱ्यांची मक्तेदारी संपुष्टात आणण्याचे धैर्य भारत सरकारने दाखविले,तर बाळासाहेब आपल्या विभागाचे प्रमुख होतील. मोठे रसिक व अुत्साही गृहस्थ आहेत. माझी त्यांची प्रथमच ओळख होत आहे. परंतु मला ते खूप आवडले. त्यांच्या अुदार दृष्टिकोनामुळेच सौ. शोभनाताअींना संसार सांभाळून अितके समाजकार्य करिता आले असले पाहिजे. अुत्तर लखीमपूरचा विनोबांनी स्थापिलेला ‘ मैत्री आश्रम ’ हे सौ. शोभनाताअींच्या निःस्वार्थ धडपडीचे अगदी अलीकडील दृश्य प्रतीक. आता घरात नातवंडे खेळू लागल्यानंतर त्या अेम्. अे. ला बसताहेत. त्यामुळे सध्या समाजकार्याचा वेग थोडा मंदावला असला, तरी मुलांना दूधवाटप वगैरे कामे चालूच आहेत. ‘ दूध वाटणाऱ्या बाअी ’ म्हणूनच त्या या भागात प्रसिद्ध आहेत. बंगल्याच्या पायथ्याशी आल्यावर रिक्शावाला म्हणाला, “ बाबूजी, हा तर दूध वाटणाऱ्या बाअींचा बंगला. तुम्ही मला आधीच सांगितले असते,तर बंगल्याचा नंबर शोधण्यात वेळ घालवावा लागला नसता ! ” लहानशा टेकडीवर असलेला हा बंगला खास युरोपियन पद्धतीचा आहे. सर्व सुख-सोयींनी युक्त. येथून सभोवारचे दृश्य मोठे मनोहर दिसते. सगळीकडे पसरलेली हिरवीगार झाडी डोळ्यांना सुखविते. फळाफुलांनी डवरलेली व भाजीपाल्याने टवटवलेली बाग मन प्रसन्न करते. या सर्वांवर रानडे दांपत्याची आस्था व आत्मीयता ‘ चार चाँद ’ लावून जाते. पुणे सोडल्यापासून चविष्ट जेवण आणि मस्त कॉफी प्रथमच येथे मिळाली. अर्थात हे काही या विस्ताराचे कारण नव्हे ! परप्रांतांमध्ये लोकांनी कसे राहिले पाहिजे याचा अेक आदर्श म्हणून मी या दांपत्याकडे पाहतो. म्हणून अेवढा प्रपंच केला.

डिगबअि की डिगबॉय ?

या गावाचे नाव काय ? डिगबअि की डिगबॉय ? जाणकार म्हणतात की, ‘ डिग ’ (लाल) व ‘ बअि ’ (नदी) या स्थानिक बोलीतील शब्दांपासून हे नाव बनले आहे. येथील नदीत रॉकेल मिसळून पाणी लाल झाले. त्यावरून लाल नदी या अर्थाने डिगबअि शब्द बनला,आणि त्या नदीकाठच्या गावालाही डिगबअि नामाभिधान प्राप्त झाले. अुलट काही मंडळी, बहुधा गमतीने, अिंग्रजी ‘ डिग ’ (Dig) व ‘ बॉय ’ (Boy) या दोन शब्दांमध्ये याची व्युत्पत्ती शोधतात. अिंग्रज अधिकारी तेलखाणी खोदणाऱ्या मजुरांना अुत्तेजन देण्यासाठी ‘ डिग बॉय ’ ‘ डिग बॉय ’ (खोद रे पोरा खोद)

असे ठेक्यात ओरडत. त्यावरून या शहरालाच डिगबॉय असे नाव प्राप्त झाले. परंतु हे खरे नसावे. डिगबअि हे आदिवासी भाषेतील नावच बरोबर असले पाहिजे.

अेकूण डिगबअिच्या परिसराची लोकसंख्या ३५ हजारांवर असून डिगबअि गावाची सुमारे १८ हजार व डिगबअि तैलनगराची सुमारे १७ हजार आहे. अर्थात बहुतेक कामगार व वरिष्ठ अधिकारी परप्रांतीयच आहेत. असम ऑअिल कंपनी गोऱ्यांच्या मालकीची आहे. त्यामुळे सर्व वरचे अधिकारी बहुधा गोरेच असतात. त्यांच्या संस्कृतीची छाप तैलनगरात राहणाऱ्या लोकांच्या जीवनावरही दिसत असल्यास नवल नाही.

डिगबअि
२–२–६८

असम ऑअिल कंपनी

भारतात पहिली तेलविहीर खणणारी आणि पहिला तेलशुद्धीकरण कारखाना (रिफायनरी) काढणारी कंपनी या नात्याने असम ऑअिल कंपनीचे महत्त्व आहे. सकाळी सौ. शोभनाताअींबरोबर जाअून कंपनीच्या प्रसिद्धी विभागातून माहिती मिळविली. दुपारी रिफायनरी पाहिली. मातीच्या तेलापासून मेण तयार करण्याचे काम फक्त याच ठिकाणी चालते. रोज सुमारे १०० टन मेण तयार होते. संगमरवरी फरशीसारख्या मेणाच्या लाद्या मोठ्या छान दिसतात. वंगणासारख्या काळ्या मिट्ट तेलापासून हे बनले असेल, यावर विश्वास बसत नाही. लाद्या बनण्यापूर्वीचे प्रवाही मेण निर्मळ पाण्यासारखे दिसते. मेण हा परदेशी चलन मिळवून देणारा महत्त्वाचा पदार्थ. मेण म्हटले, की आपल्याला फक्त मेणबत्त्यांचे स्मरण होते. परंतु आजकाल मेणाचा वापर खूपच व्यापक क्षेत्रात व विस्तृत प्रमाणावर होत आहे. सौंदर्यप्रसाधने, कागद, बूट-पॉलिश, नेल-पॉलिश, आगकाड्या, औषधांच्या बाटल्यांचे पॅकिंग वगैरे-साठीच हा वापर मुख्यतः होतो. मेणबत्तीसाठी फक्त १० टक्के मेण वापरले जाते. त्यात तेलाचा अंश अधिक असतो. मुळीच तेल नसलेले मेण हे सर्वोत्कृष्ट. स्वादरहित, गंधरहित व धोकारहित असा हा पदार्थ सोन्याच्या मोलाचा ठरला आहे. असाच अेक दुसरा पदार्थ म्हणजे पेट्रोलियम कोक. या कोळशात गंधकाचे (सल्फरचे) प्रमाण अत्यल्प असल्यामुळे गुदमरवून टाकणारा धूर (दगडी कोळशासारखा) यातून निघत नाही. घरी जाळायला हा फार चांगला. तसा तो येथे वापरलाही जातो. अर्थात पेट्रोल, रॉकेल, गॅसोलिन, लुब्रिकंट ऑअिल वगैरे अितर पदार्थही येथे तयार होत असतातच.

जाड पत्र्यापासून तेल भरण्याची पिपे तयार करणारा विभाग कारखान्यात आहे. सगळे काम स्वयंचलित यंत्रांकडून होते. दर २ मिनिटाला १ पीप तयार होते. पूर्वी जेव्हा परदेशी पत्रा मिळत असे त्या वेळी १ मिनिटाला १ पीप तयार होअी. पीप रंगविण्याचे कामही या २ मिनिटांत होते.

७–८ मैलांवर असलेल्या दिहिंग नदीचे पाणी कारखान्यासाठी आणले आहे. ते महाग पडते. म्हणून अेकदा वापरलेले पाणी थंड करून पुन्हा वापरले जाते. स्थानिक

विहिरींच्या पाण्यात लौह (आयर्न) जास्त प्रमाणात असल्यामुळे (त्याचा वापर केल्यास कपडे पिवळे पडतात) ते वापरता येत नाही.

कारखान्याच्या आवारात धूम्रपानास मनाअी आहे. परंतु धूम्रपान ही तर आजच्या युगाची अनिवार्य गरज. म्हणून काही सुरक्षित धूम्रपानगृहे बनविण्यात आलेली आहेत. या धूम्रपानगृहाला गुमटी असे म्हणतात. पोलिसचौकीसारख्या या धूम्रपानगृहात अेकावेळी तीन-चार लोक अुभे राहून धूम्रपान करू शकतात.

या कंपनीत असमीया लोकांना फारसा वाव मिळत नाही, अशी तक्रार अैकली होती. ती खरी असावी असे वाटते. बंगाल्यांची संख्या बहुधा अधिक असावी. अर्थात गुणवत्तेचा निकष असल्यामुळे अितर प्रांतीय जास्त असणे स्वाभाविक आहे. परंतु महाराष्ट्रीय लोक मात्र फारच कमी आहेत. अितक्या दूरवर यायला मराठी तरुण तयार होत नाहीत, असे समजले. गोऱ्या लोकांची कंपनी असल्यामुळे सर्वोच्च जागांवर गोऱ्यांची मक्तेदारी चालू आहे. हे गोरे अजून स्वातंत्र्यपूर्व काळातच वावरतात. चित्रपटगृहात 'भारतीय समाचार' पाहात नाहीत. तो भाग संपल्यावर दारूचे पेले हातात घेअून आत प्रवेश करतात. गोऱ्यांच्या बाबतीतील भारत सरकारचे पडखाअू व न्यूनमनोगंडयुक्त धोरण यामुळेच हे चालू शकते हे अुघड आहे.

सायंकाळी रानडे दांपत्याबरोबर कंपनीच्या तेलक्षेत्रात (ऑअिल फील्डस) चक्कर मारून आलो. हा भाग संरक्षित आहे. तेथे जाण्यास परवानगी लागते. लहान-मोठ्या टेकड्यांनी व्यापलेल्या या प्रदेशात जागजागी अनेक विहिरी खोदलेल्या आहेत. अेक विहीर खोदावयाची म्हणजे १५—२० लाख रुपये खर्च येतो. तेल लागले नाही की अेवढा सारा पैसा पाण्यात (की मातीत ?) जातो. काही विहिरींतील तेल संपले आहे. परंतु अजून ३००—३५० विहिरींतून तेल निघत आहे.

मार्गारिटा व लिडो

तेथून परत येअून ७—८ मैलांवर असलेले मार्गारेटा (असमीयामध्ये मार्घेरिटा) हे गाव पाहिले. या गावाचे मूळचे नाव माकुम. येथील दिहिंग नदीवर अिटालियन अेंजिनियरांनी पूल बांधला त्या वेळी त्यांची राणी क्वीन मार्गारिटा ही गादीवर होती. म्हणून त्यांनी तिचे नाव या पुलाला दिले. पुढे तेच या गावालाही मिळाले. या पुलावरून आगगाडीही जाते व मोटारीही रुळावरूनच धावतात. पूल अरुंद असल्यामुळे वाहतूक अेकेरी आहे. बराच वेळ थांबावे लागते. असमच्या जीवनातील संथ-सुस्तपणाचा, 'लाहे लाहे'चा, अनुभव या प्रवासात पूर्णत्वाने येतो. रेल्वेफाटकापाशी तास न् तास खोळंबावे लागते, आणि मुख्य म्हणजे कोणाला याची चीड येत नाही; ही गैरसोय दूर करून घ्यावी असे वाटत नाही.

मार्गारिटाहून ५ मैलांवर लिडो (असमीया लिड्ु) हे स्टेशन आहे. यानंतरचे लेखापानी हे शेवटचे स्टेशन आहे. मार्गारिटा सोडले, की नेफाची टिराप डिव्हिजन सुरू होते. येथून वन्य जमातींचा संबंध येअू लागतो. या भागात तिबेटी शरणार्थी

येअून बसले आहेत. येथून सुमारे ४० मैलांवर भारताची सरहद्द संपून ब्रह्मदेशची सरहद्द सुरू होते. त्यामुळे यापुढील भागात मुख्यतः लष्करी छावण्याच आहेत. श्री. शंकरराव देव यांची पेकिंगला जाअू अिच्छिणारी शांतियात्रा किंवा मैत्रीयात्रा येथेच थांबली होती.

या भागात डोंगरांमध्ये दगडी कोळशाच्या विपुल खाणी आहेत. या कोळशाची वाहतूक ट्रॉलीने होते. लिडोचा कोळसा व विटा प्रसिद्ध आहेत. लाकडाचाही मोठा व्यापार चालतो.

साहित्यिकांशी चर्चा

सायंकाळी असम साहित्यसभेच्या स्थानिक शाखेत साहित्यिकांशी चर्चेचा कार्यक्रम ठेविला होता. श्री. प्रफुल्लचंद्र बरुआ, श्री. दास तालुकदार, श्री. मीराज हुसैन (सैयद अब्दुल मालिक यांचे बंधू) वगैरे मंडळी जमली होती. असमच्या भवितव्याचा जो खेळखंडोबा केंद्रीय नेत्यांनी चालविला आहे त्यामुळे चिडलेले श्री. बरुआ मला म्हणाले, " आजवर आमच्यावर अहोमांनी, मुसलमानांनी, अिंग्रजांनी, बंगाल्यांनी राज्य केले. आता नेफाच्या लोकांनी राज्य करावे, अशी आमच्या केंद्रीय पुढाऱ्यांची अिच्छा दिसते. त्यांना तुम्ही जाअून सांगा, म्हणावे, असमलाच नेफामध्ये सामील करून टाका." त्यांचा सात्त्विक संताप कोणाही सहृदय व्यक्तीला कळण्यासारखा होता. पण मला तो विषय वाढवावयाचा नव्हता. म्हणून मी त्यांच्याकडून असमच्या साहित्यविश्वाची माहिती मिळविली. त्यांना मराठी साहित्याची माहिती सांगितली. त्यांनी शिवसेनेबद्दल आपुलकीने चौकशी केली. शिवसेना व लाचित सेना यांतील फरक मी त्यांना समजावून सांगितला. असमीया जनतेच्या भवितव्याबद्दल त्यांनी माझे मत विचारले. मी त्यांना म्हणालो, " असम व असमीया यांच्या भवितव्याबद्दल मी पूर्ण आशावादी आहे. असमीया लोकांमधील अस्वस्थता ही त्यांच्या पुनर्जन्माची प्रसववेदना आहे. यातून अधिक समर्थ, तेजस्वी असमीया जन्माला येणार आहे, हे मला स्पष्ट दिसते. मी त्यांना आमच्याकडील देशस्थ ब्राह्मणांचे अुदाहरण समजावून सांगितले. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी देशस्थ ब्राह्मण हा महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनात जवळजवळ शेवटच्या पायरीवर होता. मराठ्यांच्या पातळीवर होता. याचे कारण तो आपले गाव, आपली जमीन, आपली वतनवाडी यात गुरफटलेला होता. त्याला कसली महत्त्वाकांक्षाच नव्हती. परंतु नव्या लोकशाहीने कूळकायदा करून त्याला जमिनीशी बांधून टाकणारा दोर कापून टाकला. (या ठिकाणी मी त्यांना सिंहगडावरील लढाअीत सूर्याजीने कापून टाकलेल्या दोराची गोष्ट सांगितली.) त्याबरोबर हा समाज खडबडून जागा झाला. संघर्षात भाग घेअू लागला; आणि आज तो साहित्य, कला, राजकारण वगैरे सर्व क्षेत्रांत आघाडीवर आला आहे. वस्तुतः त्याच्याजवळ बुद्धी, प्रतिभा वगैरे सर्व काही होते. परंतु त्यावर गंज चढला होता. तीच स्थिती असमीयांची आहे. हा गंज निघण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. ती जितक्यालौकर

तुम्ही पूर्ण कराल तितक्या लौकर तुमचा भविष्यकाळ अुज्ज्वल होईल. आज तुमची स्थिती डबक्यातल्या बेडकांसारखी आहे. त्यातून जरा बाहेर पडा की नवी आशादायक क्षितिजे तुम्हांला दिसू लागतील."

हे विवेचन अनेकांना पटले असावे, असे दिसले.

तिनसुकिया रेल्वे स्टशन.
३–२–६८
(रात्री १ वाजता)

गोऱ्यांची अंगमेहनत

सकाळी सौ. शोभनाताअींबरोबर जाअून चहाचा अेक मळा पाहिला. झाडांची कापणी, औषधे शिंपडणे वगैरे कामे चालू होती.ते पाहात असताना ख्यातनाम कादंवरीकार मुल्कराज आनंद यांच्या चहामळा कामगारांच्या जीवनावरील 'टू बड्स अँड अे लीफ' या कादंबरीचे स्मरण झाले. पत्तीवर प्रक्रिया करण्याचा कारखाना बंद होता. तो आता अेप्रिलमध्ये सुरू होईल. त्या वेळी हा परिसर गजबजून जाईल. आज मात्र सगळीकडे शांत होते. मळ्याचा मॅनेजर युरोपियन आहे. त्याची बायको मोठी नमुनेदार वाटली. भयंकर अुद्योगी. 'भयंकर' हा शब्द पुणेरी अर्थाने नव्हे, तर शब्दश: घ्यावयाचा. प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीतून पैसा मिळवायची तिची धडपड चालू असते. कोंबड्या ठेवते, बदके ठेवते, भाजीपाला व गुलाबाची फुले विकते, अंडी विकते. काटकसर अितकी, की तिला चिक्कूपणाच म्हणावे लागेल. अिंग्लंडात मोठी मुले आहेत. त्यामुळे दोन बिऱ्हाडे चालवावी लागतात. त्याकरिता हा जिवाचा अेवढा आटापिटा करावा लागतो असे तिचे म्हणणे. नवरा-बायको दोघेही सामान्य शेतकरी, अशिक्षितांच्या सदरात मोडतील अितके अल्पशिक्षित. जगाचे ज्ञान जवळजवळ शून्य. अहंकार मात्र अितका, की अिथल्या सुशिक्षित, सुसंस्कृत व्यक्तींनाही स्वत:पेक्षा अत्यंत तुच्छ लेखतील. त्याबाबतीत अजून अेकोणिसाव्या शतकातच वावरताहेत. परंतु त्यांची अंगमेहनत पाहिली, की 'हम तो मान गये, भाअी !'– असे अुद्गार तोंडून बाहेर पडावेत. त्यांच्या या अुद्योगीपणामुळे ते अजून आपले वर्चस्व ठेवून आहेत.

खास असमीया घरात

कोकराझार, तेजपूर व डिब्रुगड या तीन ठिकाणी मी असमीया कुटुंबांतच राहिलो होतो. परंतु ही तिन्ही घरे शहरी पद्धतीची होती. म्हणून आज अेक खास (टिपिकल) असमीया घर पाहायला गेलो. विनोबाजींच्या भूदानात काम करणारी अेक कळकळीची कार्यकर्त्री व मैत्री आश्रमाची सदस्या कुमारी लक्ष्मी फुकन हिच्या बहिणीच्या घरी सौ. शोभनाताअी घेअून गेल्या. नुकतेच बांधलेले घर होते. परंतु त्यात शहरीपणा नव्हता. अेक बैठकीची खोली, अेक झोपण्याची खोली, अेक स्वयंपाकघर व अेक देवघर.

कुडाच्या भिंती मातीने लिंपून सारविलेल्या.जमीन सीमेंटने सारवून गुळगुळीत केलेली. थंडीच्या कडाक्यामुळे अनवाणी पाय तिच्यावर ठेवण्याची हिम्मत होत नव्हती. सभोवती भरपूर मोकळे परडे. शेतातून आलेले भात वाळत पडले होते. कोकणपट्टीत असते तसेच दृश्य. पण नारळीची झाडे नसल्यामुळे थोडे वेगळेपण जाणवते. मातीही लालभडक नाही. किंचित पिवळसर आहे.

देव नसलेले देवघर

या घरातली वैशिष्टचपूर्ण गोष्ट म्हणजे देव नसलेले देवघर. आपल्याकडे ज्यांच्या घरात वेगळे देवघर असते त्यांच्या घरी निदान खंडीभर देव तरी असलेच पाहिजेत. (लहानपणी अशा खंडीभर देवांची पूजा अनिच्छेने करणे भाग पडल्यामुळेच बहुधा माझ्या मनात मूर्तिपूजेविषयी चीड आणि तिटकारा निर्माण झाला असावा !) परंतु येथील देवघरात देव नव्हता.स्वच्छ, निर्मळ, सारविलेले ते देवघर पाहूनच मनात भक्तिभाव निर्माण झाला. फक्त अेका लहानशा घडवंचीवर किंवा घोडीवर नामघोषा हा महापुरुष शंकरदेवांचा ग्रंथ ठेवलेला होता. त्याच्यावर गमछा (पंचा किंवा टॉवेल) पसरलेला होता. मुसलमानांमध्ये साधुसंतांच्या मजारावर चादर असते तसा. गमछावर नामघोषातील अेक दोहा विणलेला. समोर तबकात फुले ठेवलेली. ही फुलेही पोथीवर वाहायची नसतात. नुसती समोर ठेवायची. अुदबत्ती लावलेली. वातावरणाला अेक प्रकारचा भारदस्तपणा आलेला होता. शिखांच्या गुरुद्वारातील ग्रंथसाहेबाच्या पूजेचे स्मरण मला झाले. परंतु तेथे गोंगाट असतो. ग्रंथाचे वाचन करणारा भसाडचा आवाजाचा असला, तर विचारायलाच नको. त्यात पुन्हा बाजाच्या पेटीची साथ. (कधीकधी विचार येतो, रेडियोवर हार्मोनियमला जशी बंदी आहे तशी ती गुरुद्वाऱ्यातही असावी. तिच्याअैवजी सारंगीसारख अेखादे शांत, सौम्य वाद्य ठवावे.) येथे तसे काहीच नव्हते. भक्तिभावाची जोपासना करायला असले देवघर फार चांगले.

भिजलेल्या मांजरासारखा नवरा

घरात पतिपत्नी दोघेच होते. मोठी मुलगी कॉलेजात शिकते आहे. येथे घरच कर्ता पुरुष शालीन, घरंदाज सुनेसारखा दिसत होता. बहुधा कर्तृत्वाची जबाबदारी स्त्रीकडेच असावी. पण तीही अत्यंत शालीन, सौम्य. अुग्रता, अुद्धटपणा यांचे नावही नाही. आमच्याशी बोलण्याचे ,माहिती सांगण्याचे काम तीच करीत होती. नवरा बिचारा अेका कोपऱ्यात अुभा राहून बावरल्या नजरेने आमच्याकडे पाहात होता. त्याला काही विचारले तरच अेकदोन शब्दांत अुत्तर देअून (वधूपरीक्षेच्या वेळी मुलीने अुत्तरे द्यावीत तसे) मोकळा होअी. पण आमच्या आगमनाने त्यांना आनंद झालेला होता, हे त्यांच्या दोघांच्याही डोळ्यांतून स्पष्ट दिसत होते. त्याचे कारणही तसेच होते. सौ. शोभनाताअींचे घर लक्ष्मी फुकनचे विश्रांतिस्थान आहे, दुसरे माहेरच आहे.
त्यामुळे हा विशेष जिव्हाळा दिसत होता.

गमछाची भेट

वाअींच्या शालीनतेची मला गंमत वाटली. सौ. शोभनाताअींना अेका बाजूला नेअून त्या विचारू लागल्या, " मी स्वतः विणलेला गमछा तुमच्या पाहुण्यांना द्यावा, अशी माझी अिच्छा आहे. त्याचा स्वीकार ते करतील ना ? " सौ. शोभनाताअी म्हणाल्या, " अहो अगदी आनंदानें स्वीकार करतील. " त्याचबरोबर त्यांची कळी खुलली. ठेवणीतला अेक कारा गमछा आणून त्यांनी मला दिला. त्यांच्या त्या स्नेहाभिव्यक्तीने मला भारावल्यासारखे झाले.

खानदानी कुटुंब आहे. फुकन म्हणजे आहोम. अेके काळचे या प्रदेशाचे राज्यकर्ते. यापुयाकडे शरअि (होराणि) चे नाना प्रकार पाहिले. अगदी तळहाताअेवढ्या, तांबूल देण्यासाठी वापरावयाच्या शराअिपासून जेवण्यासाठी व लग्नप्रसंगी अहेर देण्यासाठी वापरावयाच्या शराअिपर्यंत नाना आकार-प्रकाराच्या णराया. सगळ्या काशाच्या. आज लहान शराअि विकत घ्यायला गेले तरी २०–२० रुपयांच्या खाली मिळत नाही. स्त्रियांच्या अंगावर सोने दिसत नाही. परंतु घरात ही संपत्ती भरपूर

अेक नामघर

डिगबअीतील अेक चांगले प्रशस्त नामघर पाहिले. तीन-चारशे लोक बसू शकतील असा मोठा दिवाणखाना व त्याला जोडून 'मणिकूट' किंवा 'पुथिघर.' हल्ली नामघराच्या अर्ध्या भागात बॅडमिंटन, पिंगपाँग वगैरे खेळण्यांची सोय आहे. अर्ध्या भागात नगारा, मृदंग, झांजा, टाळ वगैरे आहे. रात्री आसपासचे लोक अेकत्र येअून भजन करतात. 'मणिकूट 'मध्ये मूर्ती नाही. लहानशा ओट्यावर भागवत नामघोषा, वगैरे ग्रंथ गमछामध्ये गुंडाळून ठेविलेले आहेत. त्यांचे सामुदायिक वाचन होते. गावच्या लोकांना अेकत्र येण्यासाठी हे सार्वजनिक सभागृह आहे.

'पूर्वांचल' पाक्षिक

नामघराच्या आवारात राहणारा अेक अुत्साही तरुण भेटला. त्याचे नाव श्री. क्षेत्रधार शर्मा. 'पूर्वांचल' नावाचे अेक पाक्षिक त्याने काढले आहे. तेजपूरला त्याने मला पाहिले होते. आपल्या खोलीवर नेअून त्याने मला अंक दिला. त्यात माझ्या व्याख्यानाचाही अुल्लेख होता. ८ पानांच्या या पाक्षिकाच्या १ हजार प्रती त्याने काढल्या आहेत. १५३ रुपये खर्च आला. १५ पैसे किंमत. सर्व प्रती खपल्या त्यांचे पैसे हातात आले तर १५० रुपये पारिश्रमिक म्हणून अुरतील. परंतु अनुभवाचे भांडवल अेकूण कमीच दिसते. त्यामुळे बिचाऱ्याला कितपत यश मिळेल याविषयी मी मात्र साशंक आहे.

नाहोर कोटिया– दुलियाजान– झलोनी

आपण सामान्यतः ज्याला नहारकटिया असे म्हणतो, ते नवे तेलक्षेत्र पूर्वी झलोनी या नावाने प्रसिद्ध होते. अलीकडे त्याला दुलियाजान असे म्हणतात. 'नाहर' किंवा 'नाहोर' हे अेका जातीचे अुत्तम लाकूड. त्याचे संस्कृत नाव आहे नागेश्वर. ते कापून ही वसाहत स्थापन करण्यात आली म्हणून तिचे नाव 'नाहोर कोटिया' असे पडले. असमीया शब्द 'नाहर कटीया 'असा आहे. येथील श्री. बरजोरजी नावाच्या फारशी गृहस्थांनी आज आपल्या काही मित्रांना ब्रह्मी पद्धतीचे जेवण दिले. रानडे दांपत्याबरोबर मीही त्याला हजर राहिलो. परंतु जेवण मांसाहारी असल्यामुळे माझी व मुख्यतः यजमानांची थोडी कुचंबणा झाली. परंतु गप्पागोष्टी, विनोद वगैरेंमुळे वेळ छान गेला. जेवणानंतर नागपूरच्या श्री. शरद दीक्षित यांनी येथील 'क्रूड कंडिशनिंग'चा कारखाना फिरून दाखविला. येथून बरौनीपर्यंत ७०० मैल लांबीच्या नळातून तेल वाहते राहावे, यासाठी ही विशिष्ट प्रक्रिया करावी लागते. तेलाची खोदाअीही पाहिली. अर्थात आम्ही गेलो तेव्हा प्रत्यक्ष खोदाअी चाललेली नव्हती. खोदलेल्या विहिरीत नळ घालण्याचे काम चाललेले होते. १० हजार फूट ड्रिलिंग झालेले आहे. यंत्राच्या साह्याने पाअिप घालण्याचे काम चालले होते. पाअिप आत सोडणे व त्यांचे पेच आवळणे ही कामे यंत्राकडून केली जातात. अर्थात हे काही कायमचे नळ नव्हेत. तेल लागल्यानंतर दुसरे मजबूत पोलादी नळ बसवितात. तेल-अुद्योगाचे यांत्रिकीकरण किती झपाट्याने चालू आहे, त्याची कल्पना आली.

लष्करी अधिकाऱ्यांच्या मेळाव्यात

दुलियाजानहून रात्री ८ ला निघून ९ ला तिनसुकियाला आलो. येथून ५–६ मैलांवर जंगलात असलेल्या डिनजान येथील लष्करी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण शिबिरात अेक पार्टी होती. रानडे दांपत्याबरोबर मीही तेथे गेलो. गाड्याबरोबर नळ्याला यात्रा ! अर्थात त्याबद्दल पश्चात्ताप मात्र झाला नाही. अेक नवे विश्व पाहायला मिळाले. बँडच्या तालावर नृत्य चालू होते. त्यातील अभिजात पद्धतीचे नृत्य सौम्य, शालीन वाटले. ट्विस्ट पाहून मात्र किळस आली. हिजडे नाचल्याचा भास होत होता. मद्यपान मला वर्ज्य असल्यामुळे आपले कसे होअील अशी भीती वाटली होती. परंतु काही मोठे लष्करी अधिकारीही माझ्यासारखेच मद्यमांसाला न शिवणारे सोवळे असल्याचे आढळून आले. त्यांच्याबरोबर मद्याअैवजी संत्र्याचा रस मी घेतला. अर्थात तो जरी रस असला तरी घटाघटा पिअून टाकायचा नसतो. दारूप्रमाणे त्याचाही सावकाश अेक-अेक घोट घेत दोन-तीन तास काढावयाचे असतात, हे ज्ञानही तेथे झाले.

महाराष्ट्रातील व बृहन्महाराष्ट्रातील (अिंदूर, ग्वाल्हेर वगैरे भागातील) अनेक मराठी अधिकारी भेटले. त्यांच्याशी मनमोकळेपणाने गप्पा झाल्या. असमच लोक आळशी असल्याबद्दल त्या सर्वांचे अेकमत दिसले. देशात पूर, धरणे किंवा धरणी-

कंप यांसारख्या कारणांमुळे विस्थापित होणाऱ्या कष्टाळू शेतकऱ्यांना असमध्य आणून वसविले, तर त्यांच्या संसर्गाने येथील लोक अुद्योगी बनतील व पूर्व पाकिस्तानातून मुसलमान शेतकरी आणण्याची जरूर त्यांना भासणार नाही. असे काही लोकांनी सांगितले. नेफात काम करणारे अेक अधिकारी म्हणाले, "येथील आदिवासींमध्ये पाकिस्तानी मुसलमान कसा प्रचार करतात तिकडे अजून आपले लक्ष गेलेले नाही. ते त्यांना सांगतात, "तुम्ही मूर्तिपूजा करींत नाही. आम्हीही मूर्तिपूजा पाप समजतो; तुम्ही गोमांस खाता, आम्हीही खातो; तुम्हांला अनेक बायका कराव्या लागतात, आमच्याही धर्मात त्याची सोय आहे; हिंदू तुम्हांला अस्पृश्य समजतात, आम्ही तुम्हांला पंगतीलाच नव्हे तर अेका ताटात घअून जेवतो; म्हणून तुम्ही-आम्ही भाअी-भाअी; तुमचा आणि हिंदूंचा काय संबंध ?" आपले धर्मनिरपेक्ष सरकार या प्रचाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष करते. कदाचित आमच्या धर्मनिरपेक्षतेला तसे करणे अपरिहार्य वाटत असेल. असमची अेकूण परिस्थिती पाहात असता, मला वारंवार अेका जुन्या घटनेचे स्मरण होत होते. भारताची राज्यघटना तयार होत असता धर्मांतराला कायद्याने कायमची बंदी घालावी, अशी कल्पना काही पुरोगामी विचारवंतांनी पुढे मांडली होती. परंतु हिंदुत्वनिष्ठांनीच तिला विरोध केला. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण लाखो ख्रिश्चनांना व मुसलमानांना हिंदू करून घेअू, अशी आशा त्यांना वाटत होती. त्या लोभाला ते बळी पडले. त्यांना हिंदू धर्माच्या मूळ प्रकृतीचेच विस्मरण झाले. हा धर्म प्रसरणशील नाही, तो आकुंचनवादी आहे, ही अप्रिय वस्तुस्थिती त्यांनी डोळचांआड केली. त्यामुळे धर्माला संख्येच्या राजकारणातून बाहेर काढण्याची अेक नामी संधी भारताने हातची घालविली. मुसलमानांना या परिस्थितीचा फायदा फारसा घेता आला नाही. परंतु ख्रिश्चनांनी तो पुरेपूर घेतला. अर्थात ख्रिश्चनांजवळ आर्थिक सामर्थ्य फार मोठे आहे. ख्रिस्ती होणाऱ्यांसाठी ते वाटेल तेवढी प्रलोभने दाखवू शकतात. त्यांच्या मुलांना विलायतेला पाठवून 'साहेब' बनवू शकतात. हे सामर्थ्य मुसलमानांजवळ नाही. ख्रिश्चनांसारखा सेवाभावही नाही. आजपर्यंत तलवार हेच त्यांचे धर्मप्रसाराचे प्रमुख साधन होते. आता धाकदपटशा चालत नाही, असे पाहून फाटाफुटीचा अुपाय योजण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत, असे दिसते.

संघ कार्यालय,
गुवाहाटी
४–२–६८

कर्फ्यूचा फटका

सबंध रात्र व सबंध दिवस आगगाडीत काढून सायंकाळी (म्हणजे रात्री) ६–३०ला गुवाहाटी स्टेशनवर पोचलो. कर्फ्यूचा अंमल सुरू झालेला होता. पासाशिवाय गावात जाणे शक्य नव्हते. सगळीकडे भयाण शांतता होती. स्टेशन नव्यानेच बांधलेले आहे.

चांगले प्रशस्त आहे. रात्र येथेच काढावी असे ठरविले. परंतु रिटायरिंग रूम मोकळी नव्हती. तिसऱ्या वर्गाचे तिकीट असल्यामुळे बंदिस्त वेटिंगरूममध्ये प्रवेश मिळण्याची शक्यता नव्हती. तिसऱ्या वर्गाचे प्रतीक्षालय अुघडयावर. गारठा मी म्हणत होता. दिवसभरात अन्न मिळाले नसल्यामुळे पोटात कावळे ओरडत होते.स्टेशनवर शाकाहारी जेवणाची सोय नव्हती. अखेर श्री. चुनीभाअी वैद यांचा फोननंबर मिळवून त्यांना फोन केला. परंतु अशा अवेळी पास मिळविणे शक्य नसल्यामुळे त्यांनी आजची रात्र स्टेशनवर काढण्याचाच सल्ला दिला. त्यांच्यासारख्या गांधीवाद्याला शोभेल असाच तो सल्ला होता. परंतु तो शिरोधार्य मानून अुघड्यावर रात्र काढायला माझे मन कचरत होते. प्रवासाने शरीर अगदी आंबून गेले होते. अितक्यात बाळ वझे यांच्या पत्राची आठवण झाली. अुघडून पाहिले, तर त्यात फोननंबर मिळाला. सुदैवाने प्रांतसंचालक ठाकूर रामसिंह फोनवर मिळाले. त्यांना सगळी हकीकत सांगितली. नवाच परिचय. तोही फोनवरून. परंतु त्यांनी लगेच आश्वासन दिले, "तुम्ही थोडा वेळ तेथेच थांबा. मी कुणातरी स्वयंसेवकाला पाठवितो. त्याच्याबरोबर या." त्या आश्वासनाने जीव भांड्यात पडला.

(गुवाहाटीचा माझा पहिला मुक्काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात झाला, हे अैकून अनेकांना आश्चर्य वाटेल. —अेखाद्या मुसलमान कसायाने देवळाचा आश्रय घ्यावा तसे! माझ्या अुर्दू-मुस्लिम-प्रेमामुळे मी मुसलमानधार्जिणा समजला जातो. आमच्या टेकडीमंडळाच्या लोकांनी माझे नावच मुळी श्रीपादअल्ली ठेवून टाकले आहे. मौलाना जोशी म्हणणारेही अनेक मित्र आहेत. तेव्हा मी संघकार्यालयात कसा गेलो याचा खुलासा करणे अुचित होअील. कोवळ्या वयात मी संघात होतो. वैदिकाश्रमातील पहिल्या ओ. टी. सी. कँपचा शिक्षणक्रम मी पुरा केला होता. त्या वेळी डॉ. हेडगेवार त्या शिबिराला हजर होते. त्यांचा माझ्यावर खूप लोभ होता. ते मला 'कॉंग्रेस जोशी' म्हणायचे. पुढे विचारात परिपक्वता येत गेली, असे मी समजतो. आणि संघाशी संबंध सुटला. परंतु संघातील मित्रांच्या मैत्रीत अंतराय निर्माण झाला नाही. माणसे जोडण्याचा हव्यास काही सुटत नाही. त्यामुळे मतभेद झाले, तरी जोडलेली माणसे सहसा तुटत नाहीत. म्हणूनच माझे बंधू डॉ. गोपाळराव जोशी यांनी पुण्याचे संघकार्यकर्ते श्री. बाळाराव वझे यांच्याकडून ठाकूर रामसिंह यांच्यासाठी पाठविलेले पत्र फाडून न टाकता जवळ ठेविले होते.)

संघीयांच्या पंक्तीचा लाभ

ठरल्याप्रमाणे माणिक दास हा तरुण असमीया स्वयंसेवक मला न्यायला आला. शिक्षक आहे. परंतु मोठा स्मार्ट व हुशार दिसतो. वाहनाची सोय होण्याची शक्यता नसल्यामुळे बरोबरचे सामान क्लोकरूममध्ये ठेवावे लागले. येथे बेडिंगला देखील

कुलूप लावावे लागते. माणिकने कुलूप विकत आणून दिले. आणखी अेक दिव्य करावे लागले. क्लोकरूममध्ये सामान ठेवण्यापूर्वी पोलिसांकडून सुरक्षिततेसंबंधीचा अेक पास घ्यावा लागतो. मध्यंतरी येथील क्लोकरूममध्ये अेक बाँबस्फोट झाला होता. तेव्हापासून खबरदारीचा अुपाय म्हणून हा नियम करण्यात आला आहे. अर्थात पास मिळायला विशेष त्रास पडला नाही. बहुधा माणूस पाहून पास दिला जात असावा.

"हा तुमचा पास. तुमचं नाव ठाकूर रामसिंह !" माणिक दासने हसून सूचना दिली.

माझ्यातील गांधीवादी कळवळला. पण अिलाज नव्हता. अुझान बाजारातील धीरेश्वर कुटीरमध्ये संघकार्यालय आहे. स्टेशनपासून फार दूर नाही. बोलतबोलत चालत आलो.मध्ये अेक-दोन ठिकाणी लष्करी पहारेकऱ्यांनी पास पाहिला; परंतु काही विचारले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष खोटे बोलावे लागले नाही. सगळीकडे सामसूम होते.

कार्यालय छान आहे. भरपूर खोल्या आहेत. भात व भाजीचे जेवण झाले. सडकून भूक लागलेली असल्यामुळे दुधा-तुपाचा अभाव लक्षातही आला नाही. अर्थात असममध्ये प्रवेश केल्यापासून दूध-तूप क्वचितच दृष्टीस पडत आहे. पंक्तीला चारपाच स्वयंसेवक कार्यकर्ते होते. त्यात अेक डॉक्टरही होते. संचारबंदीमुळे दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळणेही कसे अवघड झाले आहे, ते प्रत्यक्षच अनुभवावयास मिळाले. मच्छरदाणीपासून रजअीपर्यंत अंथरूण-पांघरुणाची चांगली व्यवस्था झाली.

संघीय दृष्टिकोन

ठाकूर रामसिंह यांच्याशी गुवाहाटीच्या दंगलीसंबंधी चर्चा झाली. पाकिस्तान-धार्जिण्या मुसलमानांनीच ही दंगल घडवून आणली आहे, याबद्दल त्यांना मुळीच शंका वाटत नाही. लाचित सेना संघटित संस्था नसल्यामुळे तिच्याजवळ फारसे सामर्थ्य आहे, असे ते मानीत नाहीत. शिवसेनेसंबंधी त्यांनी मला विस्ताराने विचारले. मी स्वतः शिवसेनेचा समर्थक नसलो,तरी ज्या कारणांतून शिवसेनेचा अुदय झालेला आहे त्यांची मला चांगली कल्पना आहे. निदान ती राष्ट्रद्रोही नाही, याविषयी तरी माझी खात्री आहे. म्हणून शिवसेनेची बाजू मी चांगल्याप्रकारे मांडली. ठाकूरसाहेबांचे अनेक गैरसमज दूर झाले. (तेजपूर, डिब्रुगड व डिगबअीलाही मला शिवसेनेची वकिली करावी लागली होतीच !) ते मला म्हणाले, "तुम्ही हे सारे मला लिहून द्या. मी ते असमीया भाषेत छापून वाटतो." त्याप्रमाणे मी लिहून दिले. (त्याचे पुढे काय झाले ते मात्र मला कळले नाही !) लाचित सेनेने काढलेली धमकीची पत्रके येथे पाहावयास मिळाली.

शरणीया आश्रम,
गुवाहाटी.
५-२-६९

दंगलग्रस्त भागाचा फेरफटका

सकाळी ठरल्याप्रमाणे चुनीभाअी आले. गांधीवादी कार्यकर्त्याने संघकार्यालयात पाअूल टाकण्याची ही पहिलीच (आणि कदाचित शेवटचीही) वेळ. परंतु चुनीभाअी व ठाकूर रामसिंह यांच्यात मनमोकळ्या गप्पा झाल्या. भिन्नभाषी लोकांना अेकत्र

आणण्याचे काम मी आजवर नेहमीच करीत आलो आहे. आज भिन्नपंथीय कार्यकर्त्यांना माझ्यामुळे योगायोगाने अेकत्र यावे लागले. अशा प्रकारे अेकत्र आल्यानंतर दोघांनाही वाटते, अरे, आपण समजत होतो तितके काही या पंथाचे लोक अडमुठे, राष्ट्रघातकी, संकुचित दिसत नाहीत बरं का! अशा प्रकारे मनाची निरगाठ थोडीशी सैल झाली तर 'हेही नसे थोडके!'

चुनीभाअींबरोबर पायीच निघालो. पानबाजारातील जाळपोळ, लुटालूट, मोडतोड करण्यात आलेला भाग पाहिला. फाँसी बाजारात मुख्य दंगल झाली. तो भाग नंतर पाहिला. दंगलीमागील धागेदोरे चुनीभाअींकडून समजावून घेतले. सरकार, राजकीय पक्ष व सामान्य जनता या सर्वांशीच त्यांचे घनिष्ठ संबंध असल्यामुळे या घटनेमागील विविध शक्तींची कल्पना आली. दंगलीमागे परकीय हस्तक नसावेत, खुद्द असमीयांनीच लुटालूट व जाळपोळ केली असावी, असे दिसते. अर्थात सरकारचा ढिलेपणा व पोलिसांतील असंतोषामुळे त्यांची दंगलखोरांना मिळालेली फूस व मदत यांचा वाटा सिंहाचा!

'होरुबाअी देअू'

श्रीमती अमलप्रभा दास यांच्या घरी येअून स्नान वगैरे केले. त्यांना आज सायंकाळी अुत्तर लखीमपूरकडे पदयात्रेसाठी जावयाचे असल्यामुळे त्यांच्याशी असमच्या परिस्थितीसंबंधी चर्चा केली. अमलप्रभाबाअी म्हणजे असमच्या विधायक कार्याचा प्राण. ओरिसात जशा रमादेवी चौधरी तशा असमात अमलप्रभादेवी. सर्वांनाच त्यांच्याविषयी प्रेम, आदर व विश्वास वाटतो. लक्षाधीश व ख्यातनाम पित्याची पदवीधर (तीही विज्ञानाची पदवीधर) मुलगी. पण रूढ संसारात पडण्याअैवजी 'अवघाचि संसार' सुखाचा करावा म्हणून तिने लोकसेवेला वाहून घेतले. शांत, सौम्य स्वभावामुळे अनेक माणसे जोडली व विधायक कार्याचे जाळे असमभर पसरविले. साऱ्या असमीयांच्या त्या 'ताअी' बनल्या. सगळेजण त्यांना 'होरुबाअी देअू' (सरुबाअी देअू – आदरणीय धाकट्या ताअीसाहेब) असे म्हणतात. गुवाहाटीच्या दंगलीनंतर स्थापन झालेल्या शांततासमितीच्या त्या आधारस्तंभ आहेत. घरोघरी जाअून दंगलग्रस्तांचे सांत्वन करणे, त्यांच्या मनातील भीती दूर करण, असमीया लोकांना भेटून अशा प्रकारच्या दंगलींचे दुष्परिणाम समजावून सांगणे वगैरे कामे त्या आपल्या सहकाऱ्यांसह करीत आहेत. चुनीभाअी हे त्यांचेच सहकारी. गुजराती असून असमच्या जीवनात अेकरूप होअून गेलेले. असमीया अुत्तम बोलतात. सर्वोदय साहित्याच्या असमीया भाषेतील प्रकाशनाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. समाजातील सर्व थरांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे असमच्या परिस्थितीविषयीच्या त्यांच्या मताला वजन आहे.

कामाख्याच्या टेकडीवरून

होरुबाअी देअूंचे नातेवाअीक व 'असम बातरि' (असम समाचार) या द्विसाप्ताहिकाचे अेक मालक श्री. देवेंद्रकुमार दास यांच्याकडे जेवण करून त्यांच्या

गाडीतून 'असम बातरि'च्या कचेरीत गेलो. तेथे संपादक श्री. महंत यांच्याशी चर्चा केली. नंतर श्री. दास मला कामाख्याचे मंदिर पाहावयास घेऊन गेले. अुंच टेकडीवर असलेल्या देवळापर्यंत आता डांबरी रस्ता झाला आहे. त्यामुळे पायऱ्या चढण्याचे श्रम व वेळ दोन्ही वाचली. वरून गुवाहाटी शहराचा व विशेषतः ब्रह्मपुत्राचा देखावा फारच सुंदर दिसतो. तेथून खाली अुतरून ब्रह्मपुत्रावरील नवा प्रचंड पूल पाहिला. वरून मोटारी व खालून आगगाडी जाते. या पुलामुळे आता फेरीबोटीतून नदी ओलांडावी लागत नाही. तेथून गुवाहाटी विद्यापीठाच्या आवारात चक्कर मारून आलो.

निसर्गरम्य शरणीया

सायंकाळी ५ ला संचारबंदी सुरू झाली. परंतु श्री. दास यांच्याकडे गाडीचा (व गाडीतील लोकांचा) पास असल्यामुळे कोणी अडविले नाही. अंधार पडल्यावर त्यांनी मला शरणीया आश्रमात आणून सोडले. वस्तुतः मला श्री. चुनीभाअींच्या गांधीआश्रमात राहावयाचे होते. परंतु तेथे गैरसोयी असल्यामुळे त्यांनी माझ्या राहण्याची सोय येथे केली. हा आश्रम स्त्रियांचा. सर्व स्त्रीराज्य. तरीपण त्यांच्या वागण्यात अितका निर्भयपणा व मोकळेपणा आहे, की माझ्यासारख्या नवख्यालाही संकोच वाटत नाही. स्थान मात्र मोठे रमणीय आहे. गावाच्या मध्यभागीच अेका टेकडीवर हा आश्रम आहे. सभोवतालचे दृश्य मोठे छान दिसते. शरणीया म्हणजे आश्रय घेणे, हिंदू धर्म स्वीकारणे. येथील वातावरणात अेक प्रकारचा आध्यात्मिक सुगंध दरवळतो. त्याने प्रसन्न वाटते.

अेका कार्यकर्त्या तरुणीला विचारले, "तुम्ही अजून लग्न का केले नाही ?" ती मोकळेपणाने हसून म्हणाली, "तशी प्रेरणाच झाली नाही. अिथे आले आणि अिथल्या कामात रमून गेले. आता आपला वेगळा, संकुचित संसार अुभारवा, असे वाटतच नाही." असा विचार करणाऱ्या स्त्रिया असममध्ये जागजागी भेटतात. त्यांच्यावर लग्नासाठी घरच्या लोकांचे अनुचित दडपण येत नाही, हे विशेष. अविवाहित राहून समाजसेवेला वाहून घेण्यात काही चूक आहे, अनैसर्गिकपणा आहे, असे समाजही मानीत नाही. असमीया स्त्रीच्या खऱ्या स्वातंत्र्याचा हा पुरावा. अशा स्त्रिया समाजात निर्भयपणे वावरतात. त्यांना कोणी त्रास देत नाही. स्त्रीच्या विकासाला व अुन्नतीला आवश्यक असणारे हे वातावरण सबंध देशभर पसरविण्याचे कार्य असमीया महिला करू शकतील. पण त्यासाठी त्यांनी असम सोडून बाहेर पडले पाहिजे.

गेंड्याचे बिल्ले

असममध्ये फिरताना तरुणांच्या कोटावर अेक विशिष्ट प्रकारचा सोनेरी बिल्ला हटकून दिसतो. ते गेंड्याचे चित्र असते. गेंडा हा असमचा राज्यपशू. अेकशिंगी गेंडा हा भारतात फक्त असमच्या काझीरंगा जंगलातच आढळतो. त्याचे शिंग औषधी असल्याची समजूत असल्यामुळे त्याला २–३ हजार रुपये सहज किंमत येते. ते शिंग

मिळविण्यासाठी गडा हा संरक्षित प्राणी असूनही (असममध्ये सध्या फक्त ३५० गड आहेत. अुत्तर बंगालमध्येही ५० गेंडे आहेत असे म्हणतात.) त्याची चोरून मारून शिकार केली जाते. अेकूण जगातच गेंडा हा दुर्मिळ प्राणी झाला असल्यामुळे अेकेका गेंडयाची जवळजवळ अेक लाख रुपये किंमत येते. अशा या दुर्मिळ व वैशिष्टय-पूर्ण प्राण्याची वस्ती फक्त आपल्याच प्रांतात आहे, याचा असमीयांना अभिमान वाटत असल्यास काय नवल ? अर्थात गेंडा हा अत्यंत सामर्थ्यवान प्राणी आहे. त्याच्या मुसंडीपुढे मी-मी म्हणणाऱ्या वन्यपशूंचा टिकाव लागत नाही. तेव्हा प्रचंड सामर्थ्याचे प्रतीक म्हणून असमीया लोकांनी व असम सरकारने गेंडयाला आपले मानचिन्ह बनविले असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

६–२–६८

गाठीभेटी

श्री. चुनीभाअींबरोबर काही मंडळींना जाअून भेटलो: कॉटन कॉलेजमधील अिंग्रजीचे प्राध्यापक तारिणीकांत भट्टाचार्य हे माझे जुने मित्र. १९६३ साली हैदराबादला भरलेल्या अखिल भारतीय अनुवादक शिबिरात ते असमीयाचे प्रतिनिधी म्हणून आले होते. मी मराठीचा प्रतिनिधी होतो. २१ दिवस अेकत्र होतो.त्या वेळी आमची चांगली गट्टी जमली होती. त्यांच्याकडून असमच्या राजकीय व साहित्यिक प्रश्नां-संबंधी भरपूर माहिती मिळविली. स्वत:ची चौदा मुले व भावाची आणखी काही मुले अेवढा मोठा संसाररथ ते ओढताहेत. कुटुंबनियोजनावर विश्वास नसलेला असा बुद्धिजीवी आपल्याकडे क्वचितच आढळतो. गुवाहाटीच्या दंगलीमुळे असमीया-बंगाली वाद संपुष्टात येअील; आणि पाकिस्तान हाच आपला खरा शत्रू आहे, याची जाणीव असममधील सर्व समाजांना होअील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

नंतर श्री. बीरेंद्रकुमार भट्टाचार्य यांना भेटलो. त्यांच्या ' अियारुअिङम ' या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे. लेखनावर अुपजीविका करणारे असममधील ते बहुधा अेकमेव लेखक ' रामधेनु ' व ' युगशक्ति ' या नियत-कालिकांचे संपादन त्यांनी केले होते. परंतु आता ही पत्रे बंद पडली आहेत. थोडे परंतु अुत्कृष्ट लिहिणारे लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत. 'अंग्रेजी हटाओ' आंदोलनात यांनी पुढाकार घेतला होता. डॉ. लोहियांचे भक्त. महाराष्ट्रातील श्रीपाद केळकर, सौ. अिंदु-मती केळकर, सदाशिव बागाअीतकर वगैरे संसोपा कार्यकर्त्यांना ते ओळखतात.

रात्री श्री. खन्ना नावाचे पंजाबी व्यापारी आले होते. जाळपोळीतून सुटलेले. असमीयांविषयी मनात कटू भावना नसणारे. बिगर असमीयांनी येथील लोकजीवनाशी समरस झाल्याखेरीज ही समस्या सुटणार नाही, हे त्यांनी मोकळेपणाने मान्य केले.

न्याहारीला 'पिठा' नावाचे पक्वान्न केले होते. असमीया लोकांचे हे आवडते पक्वान्न. तांदुळाच्या पिठाच्या सुरळीत गूळ व काळे तीळ घालून तव्यावरच ती सुरळी भाजतात. याचे नाव पिठा. मला मात्र फारसा आवडला नाहीं हा पदार्थ.

आश्रमातील मुलींना 'मोसम कौन कुटिल खल कामी' हे सूरदासाचे भजन शिकविले. जवळजवळ २८ वर्षांनंतर भजन शिकविण्याचा कार्यक्रम झाला. १९४० साली दिल्लीच्या हरिजन निवासात तेथील विद्यार्थ्यांना भजन शिकवीत असे. त्या काळातील मधुर स्मृती जाग्या झाल्या. अेक मुलगी चुनीभाअींना म्हणाली, "या काकांचा गळा अितका गोड आहे की वाटतं, तो कापावा अन् आपल्या धडाला चिकटवून घ्यावा." मी हसून म्हणालो, "शौर्याचे प्रदर्शन म्हणून नररुंडमाळा गळचात घालणाऱ्या नगांची शेजारीण शोभतेस खरी. असली भयंकर कल्पना आमच्याकडच्या-मुलींच्या मनातही यायची नाही." त्यावरोबर तीही खदखदून हसली.

शिलाँग

७–२–६८

निसर्गसुंदर मार्ग

सकाळी ७–३० ला सरकारी बसने निघून येथे १०–३० ला पोचलो. ३ तासांत ६३ मैल म्हणजे चांगलाच वेग म्हटला पाहिजे. शिवाय डोंगर-घाटातील रस्ता. पूर्वी हा रस्ता अेकेरी होता. नगपा (Nangpowh असमीया 'नंगेपो') या मध्यवर्ती ठिकाणी दोन्ही बाजूंच्या मोटारी अेकत्र होत आणि आपापल्या वाटेने चालू लागत. त्यामुळे वेळा सांभाळाव्या लागत. आता रस्ता रुंद केला आहे. अेका वेळी दोन गाडचा सहज जाअू शकतात. समुद्रसपाटीपासून ४९०८ फूट अुंचावर असलेल्या या ७६ हजार लोकवस्तीच्या शहरात पोचेपर्यंत अेकामागून अेक डोंगर चढावे लागतात. त्या वेळी मागून येणाऱ्या मोटारी खेळातल्या गाडचांसारख्या चिमुकल्या दिसतात. दोन्ही बाजूंना संत्र्यांच्या व अननसाच्या बागा डोळचांना सुखवितात. डोंगरी झऱ्यांचे पाणी वेळूच्या नळातून खेळविले आहे. ते पाहिले, की खासी लोकांच्या कष्टाळूपणाचे कौतुक वाटते. पावसाळचात या मार्गावरील हिरवेगार दृश्य फारच सुंदर दिसत असले पाहिजे. पाठीवर बांबूची टोपली अडकवून जळणाची लाकडे व अितर सामान वाहणारे खासी स्त्री-पुरुष आपल्या काटकपणाची साक्ष देत असतात.

मनोहर 'बडा पानी'

शिलाँगच्या अलीकडे १२ मैलांवर अेक सुंदर सरोवर लागते. त्याचे नाव 'बडा पानी.' राधानगरीच्या तलावासारखा हा तलाव डोंगरदऱ्यांतून अनेक मैल पसरलेला आहे. काठाकाठाने रस्ता जातो. प्रत्येक वळणानंतर त्याचे वेगळेच रूप व आगळेच सौंदर्य नजरेसमोर येते. अधूनमधून बेटेही आहेत. जलविहाराची अुत्तम सोय असलेल्या या तलावाच्या पाण्यावर आता वीजही निर्माण केली जात आहे.

शिलाँग नव्हे, शिवलिंग !

शिलाँग हे 'खिलं'चे अिंग्रजीकरण आणि श्विलं हे शिवलिंगचे भ्रष्टरूप. असमीया भाषेत मात्र 'चिलं' लिहितात आणि 'शिलं' असा अुच्चार करतात. कधीकाळी येथे शिवलिंगपूजक हिंदूंचे वर्चस्व असण्याची शक्यता आहे. सध्या मात्र सारे शहर ख्रिस्ती धर्म व ख्रिस्ती-अिंग्रजी संस्कृतीच्या प्रभावाखाली असल्याचे दिसते. येथील बहुतेक खासी लोकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे शेकडो लहानमोठी चर्चेस येथे पसरलेली आहेत. गोरेपान खासी स्त्री-पुरुष सर्वत्र मोकळे-पणाने हिंडतफिरत असतात. गरीब व अशिक्षित लोकांचे पोषाख थोडे वेगळे आहेत. परंतु सुशिक्षित, मध्यमवर्गीय पुरुष पूर्णपणे युरोपीय पोषाखात वावरतात. थंड हवा, 'सन्न वातावरण व पाश्चात्त्य संस्कृतीची दाट छाप यांमुळे शिलाँगला मिळालेले प्रपूर्वेचे स्कॉटलंड' हे नामाभिधान सार्थ वाटते.

अेक मजेदार जुगार

केंद्रीय गुप्तचर विभागाचे या भागाचे प्रमुख श्री. चौबळ यांच्याकडे अुतरलो. मोठे अुमदे आणि अुत्साही गृहस्थ आहेत. महाराष्ट्राबाहेर गेलेले महाराष्ट्रीय आपले काम फारच कळकळीने व जबाबदारीने पार पाडतात असा अनुभव आहे. त्यांना सवड नसल्यामुळे सौ. पद्मजाताअींबरोबर शिलाँगचा फेरफटका (त्यांच्या गाडीतून) मारला. अेका ठिकाणापासून दुसरे ठिकाण अितके दूर आहे, की मोटार नसल्यास हे शहर पाहायला सहज अेक आठवडा लागेल. प्रथमच अेक मजेदार जुगार पाहिला. त्याचे नाव 'तीरखेला.' अेका ओंडक्यावर ठराविक अंतरावरून बाण मारतात. प्रत्येक तिरंदाजाने ३५ बाण मारावयाचे. सर्वांची तिरंदाजी झाली की ओंडक्याला चिकटलेले बाण मोजावयाचे व त्यांची बेरीज करून शेकड्याच्या वरील आकडा बक्षीसपात्र असल्याचे जाहीर करावयाचे. अुदाहरणार्थ, बाणांची संख्या ६३२ झाली, तर ३२ या आकड्याला बक्षीस मिळावयाचे. हे आकडे घेणाऱ्यांची रेसकोर्सवर असतात तशी पद्धतशीर दुकाने तेथे होती. नेपाळी, खासी वगैरे लोक या जुगारात फार मोठ्या प्रमाणावर भाग घेतात. अितर सुशिक्षित लोकही मजेने आकडे लावतात. याखेरीज फाशांचे वगैरे अितरही अनेक प्रकारचे जुगार चालू होते. जुगार हा शिलाँगच्या लोकांचा अत्यंत आवडीचा विषय. हजारो रुपयांची अुलाढाल रोज चालू असते.

'बडा बाजारा'तून फेरफटका

येथील बडा बाजार हे प्रवाशांचे खास आकर्षण. कारण या बाजारात विक्रीचे काम स्त्रिया करीत असतात. तरतरीत, चलाख, हसतमुख बाया किती हुशारीने व्यापार करतात ते पाहिले, की कौतुक वाटते. पान-बाजार, भाजी-बाजारही पाहिला. पाने, फुले, फळे, भाजी यांची अगदी रेलचेल होती. येथेही दुकानदार स्त्रियाच होत्या आणि खरेदी करणाऱ्यांमध्येही मुख्यतः स्त्रियांचाच भरणा. पुरुष आपले कुठेतरी

पान चघळत किंवा बिड्या फुंकत बसलेले दिसतात. शिलाँगच्या पुरुषांचा हेवा वाटण्याचे मला तरी काही कारण नव्हते. कारण मी स्वत: कधी बाजारहाट करीतच नाही. परंतु ज्या पुरुषांना भारवाहक बनून संसाराचे ओझे वाहावे लागत असेल त्यांना येथील दृश्य पाहून येथील पुरुषांचा हेवा वाटल्याशिवाय राहणार नाही. अर्थात अशी परिस्थिती आपल्याकडेही आता हळूहळू निर्माण होत आहेच म्हणा !

प्रेक्षणीय शिलाँग

धबधबे हे शिलाँगच्या नैसर्गिक सौंदर्याचे अेक मोठे आकर्षण. प्रथम आम्ही गावाजवळचाच अेक धबधबा पाहिला. पण तो अितका कृश व गलिच्छ होता की केलेली पायपीट फुकट गेली असे वाटले. मी त्याला मराठी नाव दिले, 'सांडपाण्याचा धबधबा.' नंतर समजले, की हे धबधबे फक्त पावसाळ्यातच जागे असतात. अितर ऋतूंत ते बेडकांप्रमाणे झोपी जातात. म्हणून अितर धबधब्यांना भेट देण्याचा कार्यक्रम रद्द केला. 'पीक पॉअिंट' हे शिलाँगमधील सर्वोच्च ठिकाण. परंतु त्याच्या पायथ्याशी गेल्यावरच अितकी थंडी वाजू लागली की मी पार गारठून गेलो. वर चढण्याची हिंमतच झाली नाही. 'हॅपी व्हॅली' हे असेच आणखी अेक प्रेक्षणीय स्थान. अर्थात त्यासाठी मोटारीतून खाली अुतरण्याची जरूर नव्हती. म्हणून आम्ही तिकडे चक्कर मारून आलो. मसुरी, शिमला, माथेरान, महाबळेश्वर वगैरे थंड हवेच्या ठिकाणी दिसते तसेच दृश्य येथेही दिसले. वेगवेगळ्या टेकड्यांवर आणि दऱ्यांमध्ये वसलेले शिलाँग शहर छान दिसते यात मुळीच शंका नाही. परंतु कामाख्याच्या टेकडीवरून दिसणारे गुवाहाटीचे सौंदर्य काही औरच आहे. थंड हवे व्यतिरिक्त शिलाँगला अधिक काही आहे असे मला वाटले नाही. ब्रह्मपुत्राने गुवाहाटीच्या देखणेपणात जी अवर्णनीय भर टाकलेली आहे ती तर केवळ अद्वितीयच म्हटली पाहिजे. अिंग्रजांना ब्रह्मपुत्राचे मनोहारित्व आकलन झाले नसल्यास नवल नाही; पण आमच्या देशी साहेबांना व राज्यकर्त्यांना तरी गुवाहाटीचे श्रेष्ठत्व कळावयास हवे होते, आणि रेल्वेची सोय नसलेल्या व वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीच्या असणाऱ्या शिलाँगहून असमची राजधानी गुवाहाटीला हलवायला हवी होती, असा विचार मनात डोकावून गेला. कदाचित खासी लोकांना नाराज करू नये म्हणून स्वातंत्र्यानंतर राजधानीची हलवाहलव केली गेली नसेल. परंतु त्यामुळे सामान्य जनतेला किती गैरसोय सोसावी लागते, याचा विचार कोणीच कसे करीत नाही ?

खासी कुटुंबांमध्ये

खासी जमातीत मातृसत्ताक पद्धती अजून चालू आहे. त्यामुळे अेक-दोन खासी कुटुंबांत जाअून त्यांचे जीवन जवळून पाहावे, अशी माझी अिच्छा होती. श्री. चौबळ यांच्या सहकार्यामुळे ती पूर्ण झाली. त्यांच्या कचेरीतील अेक बंगाली कर्मचारी श्री. दे यांची काही खासी कुटुंबांशी ओळख आहे. ते मला दोन घरी घेअून गेले. पहिल्या

घरात घरचा कर्ता पुरुष भेटला नाही. तो 'गावबुडा' म्हणजे गावचा मुखिया आहे. त्याला थोडेफार हिंदीही कळते. तो भेटला असता तर विशेष चर्चा करिता आली असती त्याची बायको भेटली. परंतु तिला खासीखेरीज दुसरी भाषा येत नव्हती. तिच्याशी श्री. दे यांच्या मध्यस्थीने बोलावे लागले. अंगावर सोन्याचे भरपूर दागिने घालून नटलेली ती गौर, घरची मालकीण शोभत होती. ते घर तिच्या आजीचे. तिचा नवरा तिच्या घरी नांदत होता. तिची मोठी मुलगी आता त्या घराची मालकीण होईल. ती दहावीत शिकते आहे. रोमन लिपीतील तिची खासी पुस्तके पाहिली. तिला बऱ्यापैकी अिंग्रजी येत होते. दिवाणखान्याच्या भिंती जुन्या पद्धतीच्या तसबिरींनी मढविलेल्या होत्या. पण सारे फोटो पंचमजॉर्ज, सहावा अेडवर्ड, राणी अेलिझाबेथ वगैरेंचे. गांधी, नेहरू, सुभाष यांचे चित्र दिसले नाही. येशू ख्रिस्ताचीही चित्रे पुष्कळ होती. बायबलातील अनेक प्रसंग होते. परंतु ते सारे पाश्चात्त्य. भारतीय वातावरणाचे प्रतिबिंब पुसटही दिसले नाही. यावरून मिशनऱ्यांनी या लोकांचे किती मोठ्या प्रमाणात अभारतीयकरण केले आहे, याची कल्पना येते. आपली मुले व नातवंडे खासी संस्कृतीचा त्याग करून नव्या पाश्चात्त्य संस्कृतीकडे धाव घेत आहेत, याचा विषाद म्हातारीच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. परंतु आपण भारतीय संस्कृतीला पारखे झाल्याचे दुःख, किंबहुना त्याची जाणीवही तिला नसावी असे वाटले.

त्यानंतर नोकरी करणाऱ्या अेका तरुण खासी महिलेच्या घरी गेलो. ती स्वयंपाक-घरातून येअून आमच्याशी गप्पा मारीत बसली. तिचा नवरा मुलांना जेअू घालून भांडी घाशीत होता. आम्ही त्याला भेटायला म्हणून आत गेलो. आम्हांला पाहिल्या-नंतर तो ओशाळेल अशी माझी कल्पना होती. परंतु तसे काही घडले नाही. आपापल्या सोयीप्रमाणे श्रमविभाजन करून घेण्याचे तत्त्व त्यांनी जाणीवपूर्वक स्वीकारले असावे असे वाटले. स्वयंपाकघर आपल्याकडील खेड्यातील स्वयंपाकघरासारखेच चिमुकले. चुलीच्या खालची जमीन मातीची. अितरत्र लाकडी फळ्या अंथरलेल्या. येथील थंडीचा विचार करिता ते योग्यच वाटले. चार-सहा बोटे अुंचीच्या लाकडी पाटावर थाळी ठेवून जमिनीवर बसूनच जेवतात. साधेपणा भरपूर दिसला.

खासी लोकांना कोणताही कर द्यावा लागत नाही. प्राप्तिकर नाही की घर-पट्टी नाही. यामुळे त्यांच्या नावावर धंदा करून अितर लोक सरकारचे अुत्पन्न बुडवि-तात, अशी अेक तक्रार अैकावयास मिळाली. वस्तुतः खासी लोक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या अितके पुढारलेले आहेत, की त्यांच्याकडून कर घेण्यास काय हरकत आहे ?

स्त्रियांच्या पोषाखात फरक पडू लागला आहे. पारंपरिक परकर व शाल यांअैवजी स्कर्ट प्रचारात येअू लागले आहेत, याबद्दल या तरुणीला खेद वाटत असावा असे दिसले. अिंग्रजांच्या जमान्यात मुलामुलींची नावे अिंग्रजी ठेवण्याकडे प्रवृत्ती होती. परंतु आता त्यांची अस्मिता जागृत झाल्यामुळे खास खासी नावे प्रचारात येअू लागली आहेत. याही घरात भारतीयत्वाची काही बाह्य चिन्हे दिसली नाहीत. परदेशी मिशनरी

जाऊन देशी मिशनरी आले, तरी तेही पाश्चात्यधार्जिणे असल्यामुळे येथील जमातींमध्ये भारतीयत्वाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न होत नाही, असे समजते.

गुवाहाटी
८–२–६८

हिंदीचा प्रचार व विरोध

सकाळच्या बसने निघून गुवाहाटीला परत आलो. आज दुपारचे जेवण असम-राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मंत्री श्री. रजनीकांत चक्रवर्ती यांच्याकडे होते. त्या वेळी असममधील राष्ट्रभाषा प्रचारासंबंधी त्यांच्याशी बोलणे झाले. ते म्हणाले, "काही थोडे राजकारणी व साहित्यिक लोक हिंदीला विरोध करीत असले, तरी सर्वसामान्य लोक हिंदीचे स्वागत मोठ्या प्रेमाने करीत आहेत. दर वर्षी ३०–४० हजार लोक परीक्षेला बसतात. त्यात डोंगरी जमातीचे लोकही असतात." हिंदी भाषा ही अेका प्रांताची किंवा विभागाची भाषा असल्यामुळे तिला राज्यभाषेचे किंवा राष्ट्रभाषेचे स्थान दिले जाता कामा नये, ते स्थान संस्कृतला देण्यात यावे म्हणजे सर्वांची सारखीच गैरसोय होअील या भूमिकेवरून असम साहित्यसभेच्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. ज्ञाननाथ बरा यांनी हिंदीला विरोध केलेला होता. परंतु त्यांचे ते मत प्रातिनिधिक नाही, असे श्री. चक्रवर्ती यांनी सांगितले.

प्रकाशकाला पैसा कोठून मिळतो ?

सायंकाळी लॉयर्स बुकस्टॉल या प्रख्यात प्रकाशनसंस्थेच्या दुकानात गेलो. शाळांचे नवे वर्ष सुरू झालेले असल्यामुळे (आपल्याकडे अुन्हाळा संपल्यावर शाळा अुघडतात. येथे हिवाळा संपल्यावर) दुकानात अेकच गर्दीअुसळलेली होती. गल्ल्यावर मालक श्री. विचित्र नारायण दत्तबरुआ (बी. अेल्. अॅडव्होकेट) स्वतः बसले होते. असमीया भाषेत पुस्तकांचा खप चांगला होतो असे आतापर्यंत भेटलेल्या लेखकांनी सांगितले होते. कोणत्याही ललित साहित्याची आवृत्ती २ हजारांपेक्षा कमी काढीत नाहीत. कविताही याला अपवाद नाही. सैयद अब्दुल मालिक यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'आधारशिला' या कादंबरीची ३३०० ची आवृत्ती १४ महिन्यांत संपली. त्यांच्या काही कथा-कादंबऱ्यांच्या ५–५, ६–६ आवृत्त्या निघाल्या आहेत. डिगबअिला श्री. पी. सी. बरुआ यांनी सांगितले होते, की त्यांनी स्वतः काढलेल्या कविता संग्रहाच्या ७०० प्रती सहा महिन्यात खपल्या होत्या. श्री. बीरेंद्रकुमार भट्टाचार्य यांच्याही 'अियारुअिङम' या कादंबरीच्या तीन आवृत्त्या निघाल्या आहेत. त्यावरून असमीया साहित्याचा खप मराठीपेक्षा चांगला असावा अशी माझी कल्पना होती. परंतु श्री. दत्त-बरुआ यांनी ठासून सांगितले, "ललित पुस्तके मुळीच खपत नाहीत . लेखकांना मात्र वाटते की प्रकाशक आपल्या पुस्तकांवर पैसा मिळवून गबर होतो. पण ते खरे नाही.

आम्ही पैसा पाठ्यपुस्तकांवर मिळवतो साहित्यावर घालवतो. त्यात पुन्हा आणि तो माझ्यासारखा विक्रयकला कुशल प्रकाशक असला तरच तो आपली पुस्तके ग्राहकांच्या गळ्यात मारू शकतो. येरा गबाळाचे ते काम नव्हे." महाराष्ट्रातही असे सांगणारे प्रकाशक आहेतच. (आणि तरीही ते ललित साहित्य प्रकाशित करण्याचे थांबवत नाहीत !) वस्तुस्थिती अशी आहे की असमीया भाषेत सर्वात कमी पुस्तके प्रकाशित होतात. (दर दहा लाख लोकांमागे असमीया भाषेत फक्त १·१· –म्हणजे १ पुस्तक प्रकाशित होते,तर मराठीत सबंध भारतात सर्वात जास्त म्हणजे दर दहा लाख लोकांमागे ३१.२ पुस्तके प्रकाशित होतात.) त्यामुळे पुरवठा कमी व मागणी जास्त अशी परिस्थिती तेथे आहे. अलीकडे असमीया लोकांमध्ये स्वभाषेसंबंधी अेक प्रकारची अतिरेकी अस्मिता निर्माण झालेली असल्यामुळे असमीया पुस्तके विकत घेणे, लग्नप्रसंगी ती भेट म्हणून देणे वगैरे प्रथा रूढ होअू लागल्या आहेत. त्यातून असमीया साहित्याच्या निर्मितीला प्रोत्साहन मिळत आहे. परंतु प्रकाशक मात्र या परिस्थितीचा फायदा अितर प्रांतांतील प्रकाशकांप्रमाणे भांडवलशाही वृत्तीने घेत असावेत असे दिसते. अर्थात याबद्दल त्यांनाच दोष देण्यात काय अर्थ ? भारतातील प्रकाशकांमध्ये प्रकाशन व्यवसायाकडे अेक अुच्च, सुसंस्कृत व्यवसाय म्हणून पाहणारे किती लोक आहेत ? किराणाभुसार मालाच्या व्यापारासारखाच तो अेक व्यापार आहे, असे मानणारेच बाहुसंख्य प्रकाशक नाहीत काय ?

नियतकालिकांचा संसार

असमीया भाषेतील ललित पुस्तकांच्या खपाची बाजू अितकी अुज्ज्वल व अुत्साहवर्धक असताना तेथील नियतकालिकांचा संसार मात्र अत्यंत दरिद्री असावा, त्यांबाबतीत अगदीच खडखडाट अैकू यावा, हे जरा चमत्कारिक वाटते. पण वस्तुस्थिती तशीच आहे. सबंध असममध्ये फक्त दोन दैनिके आहेत व ती दोन्ही गुवाहाटीहून प्रसिद्ध होनात. ती म्हणजे 'दैनिक असम' व 'नतुन असमीया.' यांचा खपही १०–१५ हजारांच्या आतच आहे. नाव घेण्यासारखी साप्ताहिके फक्त दोन : 'असमबानी' व 'असमबातरि.' (यांपैकी 'असमबातरि' हे द्विसाप्ताहिक.) ही देखील गुवाहाटीहूनच निघतात. 'आसाम ट्रिब्यून' हे महत्त्वाचे अिंग्रजी दैनिक गुवाहाटीहूनच प्रसिद्ध होते· शिलाँगहून अेक लंगोटीसारखे दैनिक 'शिलाँग टाअिम्स' निघते. महाराष्ट्रातल्याप्रमाणे येथे जिल्हापत्रांची समस्याच नाही. याचे मुख्य कारण असे की असमीया माणूस हा जगाच्या घडामोडींपासून मानसिक दृष्ट्या अलिप्तच आहे. जगात काय घडते आहे ते जाणून घेण्याची त्याला अुत्सुकताच नाही. हा मानसिक आलस्याचाच अेक प्रकार असावा. दुसरे कारण म्हणजे वाहतुकीच्या साधनांचा अभाव. गुवाहाटीची वृत्तपत्रे तिनसुकिया, डिब्रुगड, डिगबअिसारख्या शहरी पोचायला किमान बारा तास तरी लागतातच. तेव्हा शिळ्या बातम्या वाचण्यापेक्षा बातम्याच न वाचणे अधिक

श्रेयस्कर, असे असमीया माणसाला वाटत असावे. तिसरे कारण असे की बंगाली, मारवाडी, पंजाबी, दक्षिण भारतीय वगैरे बिगर असमीया लोक असमीया वृत्तपत्रे वाचण्याअैवजी बंगाली, हिंदी, अिंग्रजी वृत्तपत्रे वाचणे विशेष पसंत करतात. असममधील खरे वृत्तपत्रवाचक तेच. कलकत्त्याहून विमानाने येणारी बंगाली, हिंदी, अिंग्रजी दैनिके ते घेतात. बहुसंख्य मजूर, शेतकरी, पूर्व बंगालमधून आलेले मुसलमान वृत्तपत्रे वाचण्याच्या आधुनिक संस्कृतीपर्यंत अजून येअूनच पोचलेले नाहीत. अर्थात् यामुळेच असमीया भाषेत नाव घेण्यासारखी मासिकेही नाहीत. चांगली मासिके ('रामधनु', 'दीपक' यांसारखी) अल्पायुषी ठरतात. 'आमार प्रतिनिधि', 'आवाहन', 'मणिदीप' यांसारखी काही बरी मासिके कशीबशी चालतात. लेखकांना मोबदला देण्याची प्रथा बहुतेक नाहीच. जी नियतकालिके मोबदला देतात तीही १०–१५ रुपयांपेक्षा जास्त देत नाहीत. २५ रुपये म्हणजे डोकीवरून पाणी गेले. आमच्याकडे १००–१५० रुपये लेखन-मोबदला देणारी नियतकालिके आहेत, आणि 'किर्लोस्कर'-सारखे अेखादे मासिक अेखादा खास लेख लिहवून घेण्यासाठी पाच-सहाशे रुपयेही खर्च करण्यास मागे पाहात नाही, हे जेव्हा मी अिकडील लोकांना सांगितले तेव्हा ते आश्चर्यातिरेकाने माझ्याकडे आ वासून बघतच राहिले !

लष्करी जवानांकडून पुन्हा अेकदा गचांडी

नगाभूमीला जाण्यासाठी आज रात्री प्रस्थान ठेवले. ९–२५ ची गाडी १०–३० ला आली. मजूर अुतारूंची तोबा गर्दी अुसळली होती. कसाबसा डब्यात प्रवेश मिळविला अितक्यात गाडी सुटायच्या वेळी बरौनीच्या घटनेचीच पुनरावृत्ती झाली. 'खाली करो', 'खाली करो' असे दरडावीत आमचे देशरक्षक जवान डब्यात घुसले आणि त्यांनी अुतारूंना धक्के मारून बाहेर काढले. 'देवा, या रक्षणकर्त्यांपासून वाचव !' असे म्हणत डबा रिकामा केला. या डब्यात जेमतेम ५–७ जवानच बसले. बाकीचा डबा रिकामाच होता. पहिल्या दुसऱ्या वर्गांत जागा नव्हती. म्हणून आम्ही मेंढरांप्रमाणे स्वतःला दुसऱ्या अेका डब्यात कोंबून घेतले. तिकिट चेकरकडे लष्करी जवानांच्या या दांडगाअीबद्दल जेव्हा मी तक्रार केली तेव्हा जणू मी काहीतरी भयंकर अपराध केला असावा, अशा नजरेने माझ्याकडे पाहात तो म्हणाला, "महाशय, गाडी माझी नाही किंवा तुमचीही नाही. ती जवानांची आहे. त्यांच्या मेहेरबानीमुळे तुम्ही या डब्यात तरी बसू शकलात. त्यांनी मनात आणले तर तुम्हांला ते येथूनही गचांडी मारून हाकलून देअू शकतील." कुंपणानेच शेताचे रक्षण करण्याचे नाकारावे किंवा रक्षकानेंच भक्षक बनावे, अशी ही घटना होती. अशा परिस्थितीत प्रवास न करणारे असमीया लोक जास्त शहाणे असले पाहिजेत, हे मी मनोमन मान्य केले.

अिजा, बिजा, तिजा

धक्के खात, पेंगत रात्र कशीबशी काढली. लुमडिंग (लामडिंग) च्या अलीकडील अेका स्टेशनावर वरच्या बर्थवरील अेक अुतारू अुतरून गेला. मी जरा हातपाय पसरले आणि सुटकेचा निःश्वास टाकला. तीन-चार तास तरी पाठ टेकता येअील असे वाटू लागले. अितक्यात लामडिंग आले आणि लष्करी जवान यमदूतांप्रमाने डब्यात शिरले. त्यांनी पुन्हा डबा 'खाली' करायला लावला. अेव्हाना माझेही मन मरून गेले होते. हे असेच चालायचे– असे म्हणून मी अुठलो आणि सामान घेअून दुसऱ्या डब्यात घुसलो.

लामडिंगपासून मरियानीपर्यंतचा रेल्वेमार्ग धोक्याचा समजला जातो. नगाभूमीच्या सरहद्दीजवळून व काही ठिकाणी नगाभूमीतून हा मार्ग जातो. डब्यात बाँबचे स्फोट घडवून आणले जातात. गाड्या पाडल्या जातात. म्हणून या भागात प्रत्येक अुतारूची व डब्याची कसून तपासणी केली जाते. या भागातून कोणतीही गाडी रात्री पसार होणार नाही, अशा बेताने वेळापत्रकाची आखणी केलेली असते.

दुःखात सुख अेवढेच होते, की असमयात्रेतील हा शेवटचा रेल्वेप्रवास होता.

केरळीय क्रिस्तावांचा पाहुणचार

डिमापूर-मणिपूर रोडला गाडी सकाळी ८ च्या अैवजी १० वाजता पोचली. डिमापूर हा 'हिडिंबापूर' या शब्दाचा अपभ्रंश. महाभारतात भीमावर भाळलेल्या हिडिंबा राक्षसिणीचा अुल्लेख येतो. तिचे हे नगर. तिचा भाअू हिडिंब हा मोठा पराक्रमी राजा होता, आणि भीमापासून पुढे तिला झालेला घटोत्कच हाही भारतीय युद्धात स्वपराक्रमाने चांगला चमकला. ही हिडिंबा नगा जातीचीच असेल काय ? त्या काळी या भागात कछारी लोकांचे राज्य होते. त्यामुळे कदाचित ती कछारी जातीचीही असेल. तिने जादूने सुंदर रूप धारण करून भीमाला आपल्यावर भाळवयास लावले असे महाभारत सांगते. परंतु नगा स्त्रियांचे रूप पाहता ती खरोखरीच सुंदर असली पाहिजे असे वाटते. असो. नगाभूमीत प्रवेश करण्यासाठी परवाना घ्यावा लागतो. बर्मा ऑअिल कंपनीचे स्थानिक अेजंट राय चुनीलाल बहादुर अँड सन्स यांनी श्री. बाळासाहेब रानडे यांच्या सांगण्यावरून माझ्यासाठी हा परवाना आधीच काढून ठेवलेला होता. त्यामुळे वेळ मोडला नाही. डिमापूरहून कोहिमा ४३ मैल आहे. नागालँड स्टेट बस सर्व्हिस चालते. पहिली बस निघून गेली होती. दुसरी बस ११–३० ला होती. बसने वरच्या वर्गाचे भाडे ६ रुपये पडले असते. परंतु तत्पूर्वी अेक टॅक्सी (तीही सरकारीच) जाणार होती. तिचे भाडे १२ रुपये होते. परंतु तेथील वैराण व भकास

बसस्टँडवर बसून राहावेसे वाटले नाही. म्हणून टॅक्सीनेच निघालो. श्री. चौबळ यांनी कोहिमाचे अेस्. आय्. बी. अधिकारी नागपूरचे श्री. गाडगीळ यांच्यासाठी पत्र दिले होते. श्री. चुनीभाअींनी शांति-केंद्र (पीससेंटर) चे डॉ. आरम यांच्यासाठी पत्र दिले होते. त्या दोघांपैकी कोणाकडे तरी अुतरावे असे ठरविले होते. परंतु टॅक्सीत श्री. अेम्. अेम्. चॅको नावाचे अेक केरळीय अेंजिनियर भेटले. गप्पागोष्टींच्या ओघात ते म्हणाले, "तुम्ही आमच्या घरीच का अुतरत नाही ?" मी पडत्या फळाची आज्ञा घेअून ते मान्य केले. नगाभूमी हे वस्तुतः ख्रिस्ती राज्य आहे. येथे ख्रिश्चनांना अधिक सुलभपणे नोकऱ्या मिळतात. त्यामुळे केरळीय ख्रिस्ती लोक येथे फार मोठ्या संख्येने आढळतात. मल्याळम् भाषा बोलणाऱ्यांची संख्या नगाभूमीत ९२८ आहे; तर तमिळ व तेलुगु बोलणाऱ्यांची संख्या अनुक्रमे फक्त ८६ व ८९ आहे. नगा लोकांचा व राज्यकर्त्यांचा त्यांच्यावर विश्वासही आहे. चॅको ज्या फिलिप जॅकबच्या घरात राहतात तो तरुण तर नगाभूमीच्या मुख्य मंत्र्यांचा खासगी चिटणीसच आहे.तेव्हा नगाभूमीविषयीची खरीखुरी माहिती मिळविण्याच्या दृष्टीने हे आमंत्रण मला स्वागतार्ह वाटले. श्री. चॅको गेली अनेक वर्षे नगाभूमीच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात अेंजिनियर म्हणून काम करीत आहेत. सबऑर्डिनेट स्टाफची अेक संघटना बनत आहे. तिचे ते चिटणीस आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील अशा संघटनेची घटना व नियमावली पाठवून देण्याची विनंती मला केली. मी ती मान्य केली. सबंध रस्ता किर्र झाडीतून व डोंगरदऱ्यांतून जातो. माणसाची जाग क्वचितच. अधूनमधून लष्करी जवानांचे तांडे भेटतात, तेवढीच माणसे. नगांची गावे रस्त्यापासून दूर डोंगरात आहेत. ज्या वेळी शांतता-तह अस्तित्वात नसतो तेव्हा या रस्त्याने प्रवास करणेही धोक्याचे असते; परंतु सध्या मात्र ती भीती वाटत नाही.

निर्मळ, प्रेमळ केरळीय

माझ्या केरळच्या प्रवासात मी ख्रिस्ती कुटुंबांतून राहिलो होतो आणि त्यांची स्वच्छता, टापटीप, मितभाषीपणा यांनी मी प्रभावित झालो होतो. त्याच गुणांचे दर्शन चॅको-जॅकबच्या या संयुक्त कुटुंबात घडले. चॅको, त्यांची पत्नी अमीनी (Ammine) व मुलगी अेलिझाबेथ अूर्फ शेर्ले आणि अविवाहित तरुण फिलिप जॅकब असे हे छोटेखानी कुटुंब आहे. छोकरी तर भलतीच गोड. काळीसावळीच परंतु बाळसेदार. खूप बोलकी. आमची माया लहानपणी अशीच दिसायची. तिच्याशी लगेच गट्टी जमली. जॅकब तर नंबुद्री ब्राह्मणासारखाच वाटतो. माझा शाकाहार त्यांना अडचणीचा वाटेल म्हणून मी म्हणालो, "माझ्याबरोबर तुम्ही मत्स्याहार किंवा मांसाहार घेतलात तरी माझी काही हरकत नाही." परंतु त्यांनाच ते योग्य वाटले नाही. भात, आमटी, भाजी, तूप, ताक असे छान जेवण झाले.

भारताचे सोळावे राज्य

अिंग्रजीत ज्याला 'नागालँड' असे म्हणतात त्या राज्याचे नाव 'नागा' या शब्दावरून पडले आहे. परंतु हा शब्द मुळात 'नाग' आहे, 'नागा' आहे की 'नगा

आहे याबाबतीत अेकमत नाही. वस्तुतः हे काही 'नाग' नव्हेत. ते नग्न राहात होते म्हणून त्यांना 'नागा' (नग्न) हे नाव वस्त्रधारी लोकांकडून दिले गेले असण्याची शक्यता आहे. फादर अेल्विन यांच्या मते 'नॉक' या गारो, आओ वगैरे भाषांतील शब्दापासून हा शब्द बनला असावा. नॉक म्हणजे जनता. परंतु मला स्वतःला मात्र संस्कृत 'नग' (पर्वत) या शब्दापासून बनविलेला 'नगा' (म्हणजे पार्वत्य) हा असमीया शब्द जास्त बरोबर वाटतो. ६३६६ चौरस मैल क्षेत्रफळ आणि ३,६९,२०० लोकसंख्या असलेले भारताचे नगाभूमी हे सोळावे राज्य १ डिसेंबर १९६३ रोजी अस्तित्वात आले. पूर्वी हा असमचा नागा हिल्स नावाचा अेक जिल्हा होता. त्यात २०६८ चौरस मैल क्षेत्रफळ व १,३४,२७५ लोकसंख्या असलेला टुअनसांग (टुवेनचां) जिल्हा सामील करून हे राज्य बनविण्यात आले. (वस्तुतः टुअेनसांग जिल्हा नगाभूमीत सामील झाल्यानंतर नेफाचे अुत्तर-पूर्वसीमांत अंचल हे नाव निरर्थकच झाले आहे. कारण त्यातील पूर्वेचा भाग टुअेनसांगने व्यापलेला होता. तो आता त्यातून बाहेर पडल्यामुळे अुत्तरसीमांत अंचलच अुरला आहे.) टुअेनसांग जिल्हा नगाभूमीतील सर्वात जास्त दाट लोकवस्तीचा. (दर किलोमीटरला सुमारे ३० लोक) परंतु शिक्षणात अत्यंत मागासलेला. (साक्षरतेचे प्रमाण ४–५ टक्के) याच्या अुलट अुरलेला भाग (कोहिमा व मोकोकचुंग हे दोन जिल्हे) विरळ लोकवस्तीचा (दर किलोमीटरला ११ ते २० लोक) परंतु शिक्षणात पुढारलेला (साक्षरतेचे प्रमाण २५.३९ टक्के). त्यामुळे साहजिकच टुअेनसांगच्या जनतेचा वाली कोणी नाही. टुअेनसांगच्या लोकांपैकी २२,८१४ लोक ख्रिस्ती आहेत, तर कोहिमा व मोकोकचुंगची ख्रिस्ती लोकसंख्या ७५,७७१ अितकी आहे. नगाभूमीतील हिंदूंची लोकसंख्या ३४,६७७ आहे. याबाबतीतील गमतीची गोष्ट अशी, की १९५१ ते १९६१ या दशकात ख्रिश्चनांची संख्या दुपटीने वाढली असली, तरी हिंदूंची संख्या तिपटीपेक्षा अधिक वाढली आहे. (१९५२ साली नगाभूमीत फक्त ८६७० हिंदू होते) ही लोकसंख्या शहरी भागात वाढली असती तर तितकेसे नवल वाटले नसते. परंतु ती मुख्यतः ग्रामीण भागात वाढली आहे. हिंदू समाजाची आकुंचनशील प्रवृत्ती लक्षात घेता ही वाढ निश्चितच आश्चर्यकारक आहे. १९५१ साली अेकूण लोकसंख्येत हिंदूंचे प्रमाण ४.०७८ टक्के होते ते १९६१ साली ९.३९ टक्के झाले आहे. अर्थात आदिवासी जमातींचा धर्म पाळणारे लोक हिंदूंपेक्षा खूपच अधिक (१,३७,४८४) आहेत. त्यांच्यातून हिंदू धर्मात येणाऱ्यांची संख्या फारच अल्प असली पाहिजे, हे अुघड आहे. आदिवासी जमातींपैकी सर्वात मोठी जमात अर्थात नगांची आहे. डिमसा (काछारी), कुकी. मिझो वगैरे लोकांची संख्या फार थोडी आहे. निकोबार बेटे वगळता भारतातील सर्वात अधिक विरळ लोकवस्तीचे हेच राज्य होय. (दर किलोमीटरला २२).

नगा लोकांच्या कोन्याक, चाकहेसांग, आओ, अंगामी, लोथा, सेमा, संगताम वगैरे अनेक पोटजाती आहेत. त्यांच्या भाषाही वेगवेगळ्या आहेत. अंगामी, सेमा,

आओ, लोथा, सेमा, रेंगमा वगैरे. परंतु रोमन लिपीत लिहिलेली अंगामी हीच भाषा विशेष प्रचलित आहे. नगाभूमीत बोलल्या जाणाऱ्या जवळजवळ शंभर भाषांमध्ये मराठीही अेक आहे, हे वाचून आपल्याला आश्चर्य वाटेल.,आणि मराठी बोलणाऱ्यांची संख्या ५१ ही गुजराती ८ कन्नड, ४ वगैरे लोकांपेक्षा बरीच मोठी आहे. याचा अर्थ, बरीच मराठी माणसे येथे नोकऱ्या करीत असली पाहिजेत. नगाभूमीची राजभाषा अिंग्रजी आहे. अिंग्रजीचे शिक्षण व अिंग्रजींतील प्रावीण्य यांमध्ये नगा विद्यार्थी भारतात सर्वश्रेष्ठ समजले जातात, असे अैकले.

गेंडा हे जसे असमचे राजचिन्ह,तसे मिथुन प्राण्याची दोन शिंगे हे नगाभूमीचे राजचिन्ह आहे. सरकारी प्रकाशने, पाटया, वाहने यांवर ते पाहावयास मिळते. मिथुन किंवा मेथन हा गव्यासारखा किंवा जंगली बैलासारखा प्रचंड शाकाहारी पशू आहे. त्याचे मांस नगा लोक आवडीने खातात. हा पाळला जात नाही. दुरूनच त्यावर मालकी ठेवली जाते. अस्मल जातिवंत मेथनला १५०० रुपयांपर्यंत किंमत येते. लग्नामध्ये मुलाकडून मुलीला हुंडा म्हणून मेथन दिला जातो. मेथनला पकडण्याचा कार्यक्रम सामुदायिकपणे आखला जातो. (नगा लोक गोमांस निषिद्ध मानीत नाहीत.) सणावारी मिथुनाची कत्तल करून त्याचे मांस खातात.

नगाभूमीत दाट जंगले आहेत. ७,७६,५७६ अेकर जमीन जंगलांखाली आहे. येथील मुख्य शेती भाताची. तिच्या खाली सुमारे २ लाख अेकर जमीन आहे. सुमारे ४५ हजार अेकर जमीन पाण्याखाली भिजणारी आहे, हे आणखी अेक आश्चर्य. अुद्योगधंदे, कारखाने अर्थातच नाहीत.

प्रेक्षणीय स्मशानभूमी

समुद्रसपाटीपासून सुमारे ५ हजार फूट अुंचावरील लहान लहान डोंगरमाथ्यांवर वसलेली ही राजधानी म्हणजे अेक मोठेसे खेडे आहे. अितकी लहान राजधानी (लोकसंख्या ७२४६) दुसऱ्या कोणत्याही राज्याची नाही. परंतु आहे मात्र मोठी टुमदार. अेवढ्या लहान गावात डॉ. आरम यांच्या जगप्रसिद्ध ' शांति-केंद्रा'चा (पीस-सेंटरचा) पत्ता शोधून काढण्यास श्री. चॅको यांच्याबरोबर किती पायपीट करावी लागली ते आठवले की या ' जगप्रसिद्ध 'पणाचे हसू येते. शांति केंद्र आहे मोठे छान.परंतु डॉ. आरम परगावी गेले असल्यामुळे सारी धडपड व्यर्थ गेली. येथे पाहण्यासारखे अेकमेव स्थान म्हणजे येथील दफनभूमी. तिला ' वॉर सेमिटरी ' असे म्हणतात. अेका लहानशा टेकडीवर अेक छोटासा स्तंभ आहे. त्यावर पुढील पंक्ती कोरलेल्या आहेत :–

" When you go home
Tell them of us and say-
For your tomorrow
We gave our today."

(तुम्ही जेव्हा घरी परत जाल तेव्हा त्यांना आमची माहिती द्या आणि सांगा, की तुमच्या ' अुद्या 'साठी आम्ही आमच्या ' आज ' चे बलिदान केले.)

१९४४ च्या अेप्रिल, मे, जून महिन्यात कोहिमा व अिम्फाल रोड या ठिकाणी झालेल्या लढाअीत ब्रिटिश सैन्यातील दुसऱ्या डिव्हिजनचे जे लोक मारले गेले त्यांच्या स्मरणार्थ हा स्तंभ अुभारण्यात आलेला आहे. टेकडीवर या सैनिकांच्या नावाच्या ब्राँझच्या पाट्या आहेत. या ठिकाणी या सैनिकांचे दफन झालेले नसणार हे अुघड आहे. कारण थोडीथोडी जागा सोडून जमिनीवर लहानलहान सीमेंटचे ओटे बनविण्यात आलेले आहेत; व त्यांवर या पाट्या बसविल्या आहेत. बहुतेक पाट्या गोऱ्या सैनिकांच्या नावांच्या आहेच. त्यांवर सुंदर काव्यपंक्ती आहेत. हिंदू सैनिकांच्या नामपट्टिकांवर नागरी अक्षरांत 'ॐ भगवते नमः' आणि मुसलमानांच्या नामपट्टीवर अरबी लिपीत 'हू अल गफूर' (अीश्वर क्षमावान्, मोक्षदाता आहे.) हे मंत्र कोरलेले आहेत. मराठा सैनिकांमध्ये बी. अेस्. घोरपडे, कृष्णा वाघ वगैरे नावे आहेत. दफनभूमीत स्वच्छता आहे, फुलझाडे आहेत. अेकूण दृश्य करुणरस व शांतिरस निर्माण करणारे आहे. परंतु त्यामुळे मनात कारुण्य मात्र निर्माण झाले नाही. अनेकांना जसे गहिवरून येते तसे मला आले नाही. मन कोरडे, शुष्कच राहिले. (१९४४ साली जपानी येथपर्यंत आले होते. युद्धाच्या काही खाणाखुणाही येथे आढळतात.) मनात विचार आला, हे शूरसैनिक कुणासाठी मेले ? भारतमातेसाठी ? की अिंग्रजांचे साम्राज्य टिकावे म्हणून ?

न अुमललेले फूल

त्या दफनभूमीतून फिरत असता चॅको मला म्हणाले, "माझा अेक लहान मुलगा या भूमीत झोपी गेलाय. फक्त दोन दिवसांचं त्याचं वय. त्याच्या थडग्यावर मला अेक पाटी लावायची आहे. पण त्यावर काय लिहावं ते कळत नाही. तुम्ही साहित्यिक आहात. तुम्ही अेखादी काव्यपूर्ण पंक्ती सुचवा ना !" त्यांच्या त्या हकीकतीने मात्र माझे हृदय हेलावले. लहान मुलांच्या व तरुणतरुणींच्या मृत्यूने मी नेहमीच अस्वस्थ होतो. माझे अंतःकरण गलबलले, आणि माझ्या मुखातून अचानक अेक पंक्ती बाहेर पडली :– "Here lies the bud that could not become flower." (जी अुमलू शकली नाही अशी अेक कळी अिथे झोपली आहे.) मला स्वतःलाच आश्चर्य वाटले– अिंग्रजीतून आपण आपली भावना व्यक्त करू शकलो याबद्दल ! मी चॅकोकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर कृतज्ञता होती. अखेर अेक सुंदर पंक्ती मिळाल्याचा आनंद होता. माझा स्वतःचा या असल्या गोष्टींवर विश्वास नाही. माझ्या श्रद्धास्थानांची छायाचित्रेही मी घरात टांगलेली नाहीत. तरीपण ज्यांचा या गोष्टींवर विश्वास आहे, त्यांच्या भावनेची मी कदर करतो. तिचे सामर्थ्य, तिचे पावित्र्य मी जाणतो. बहुधा म्हणूनच मला ती पंक्ती स्फुरली,आणि तिने चॅकोंना समाधान लाभले असावे असे मी समजतो.

सोनें-चांदी नको, पण बंदूक हवी

बाजारात हिंडताहिंडता श्री. चॅको अेका दुकानात शिरले. ते शस्त्रास्त्रांचे दुकान होते. मला समजेना, ते या दुकानात काय करणार ? दुकानदाराशी त्याच्या भाषेत चार-दोन वाक्ये बोलून त्यांनी काही कागदपत्रांवर सह्या केल्या,आणि ते बाहेर आले. मी त्यांना विचारले, " ही काय भानगड आहे ?" ते हसून म्हणाले, " भानगड-बिनगड काही नाही. अेका मोठ्या कटकटीतून मी नुकताच सुटलो. तिचे शेपूट आहे हे." " कसली कटकट ?" मी विचारले. ते सांगू लागले," मला डोंगरदऱ्यांतून नि जंगलांतून हिंडावे लागते. शिवाय मला शिकारीचाही नाद आहे. म्हणून मी अेक बंदूक सरकारी परवान्यावर मिळविली होती. पण लौकरच माझ्या लक्षात आले, की बंदूक जवळ असल्यामुळे संरक्षण होण्याअैवजी आपल्या जिवाला धोकाच जास्त आहे. कारण नगा बंडखोरांना बंदुका हव्या असतात. अेखाद्याजवळ बंदूक आहे असे समजले, की ते वाटेल ते साहस करून ती बंदूक हस्तगत करण्यासाठी धडपड करतील. मग त्यासाठी बंदुकीच्या मालकासकट चारदोन लोकांचे मुडदे पाडायलाही ते मागेपुढे पाहायचे नाहीत. त्यांना पैसा नको, सोने-चांदी नको, कापडचोपड नको. कशाला हात लावायचे नाहीत. नाना मार्गांनी आलेला कितीतरी पैसा त्यांच्या हातात असतो. तुमच्या संगतीत दारू प्यायची हुक्की त्यांना आली, तर हातातल्या नोटा चिठोऱ्यासारख्या अुधळतील. पण बंदुकीचा लोभ मात्र त्यांना आवरता यायचा नाही. तशी सर्वच नगांना शिकारीची हौस असते. पण या बंडखोर नागांना मात्र जंगलीपशूंची नव्हे, तर तुमच्या आमच्या-सारख्या माणसांची शिकार करायची असते."

रात्री थंडीचा कडाका फारच वाढला. माझ्याजवळचे अंथरूणपांघरूण त्याला तोंड देअू शकणार नाही, असे वाटून चॅको मला म्हणाले, "असल्या भयंकर थंडीत तुम्ही बाहेरच्या खोलीत झोपलात तर गारठून जाल. जॅकबच्या पलंगावर त्याच्यासह झोपलात तर थंडी वाजायची नाही. तुमची काही हरकत नाही ना ?" मी क्षणभर गडबडलो. परपुरुषाशी शय्यासोबत करण्याचा आयुष्यातील बहुधा तो पहिलाच प्रसंग होता. तरीपण त्यांची अडचण मला समजली. मी म्हणालो, "मुळीच हरकत नाही."आणि जॅकबच्या भल्या मोठ्या जाडजूड रजअीत मी शिरलो. रात्रीच्या जागरणाने व दिवसभराच्या थकव्याने मी अगदी बेजार झालो होतो. अंथरुणाला पाठ लागताच गाढ झोपी गेलो.

थंगल बाजार इम्फाल (मणिपूर)
१०-२-६८

सुखदायक योगायोग

सुखदायक योगायोगांच्या दृष्टीने आजचा दिवस संस्मरणीय म्हणता येअील. अितका सुखदायक प्रवास यापूर्वी झाला नव्हता. कोहिमाहून अिम्फाल फक्त ८८ मैल

आहे. परंतु रस्ता अत्यंत अवघड, डोंगरदऱ्यांतून व दाट जंगलांतून जाणारा. सध्या नगाभूमीत शांतता-तह चालू असल्यामुळे तसा धोका नाही. ऐरवी कुठल्या झुडपा-आडून गोळी येईल आणि तुमच्या छातीत किंवा मस्तकाच्या आरपार जाईल याचा नेम नसतो.

वस्तुतः डिमापूरहून अिम्फालला जाणाऱ्या मोटारी कोहिमामार्गेच जातात. परंतु का कोण जाणे, कोहिमाहून थेट अिम्फालचे मात्र तिकीट मिळत नाही. कोहिमाहून १८ मैलांवर असलेल्या माओ या नगाभूमी–मणिपूरच्या सरहद्दीवरील मणिपूरच्या हद्दीतील गावापर्यंत जावयाचे, आणि तेथे बस बदलून अिम्फालला जावयाचे, असे सव्यापसव्य करावे लागते. ते करण्याच्या तयारीने सकाळी भरपूर न्याहारी करून चॅकोच्या घरून निघालो. सौ. अमीनी चॅकोंना कळवळा आला. त्या म्हणाल्या, " तुम्हांला संध्याकाळपर्यंत वाटेत काहीही खायला मिळायचं नाही. तेव्हा ही शिदोरी बरोबर ठेवा." आणि त्यांनी तुपात तळलेल्या चपात्या (परोठे) केळीच्या पानात गुंडाळून दिल्या. ती आत्मीयता पाहून माझे मन गहिवरले. मी कुठला कोण ? ना जातीचा ना पातीचा. भाषा, धर्म, प्रांत कसलाच संबंध नाही. कालच ओळख झालेली. पुन्हा कधी भेट होईल अशी शक्यताही क्वचितच होती. तरीही त्या माउलीला माझ्या तहानभुकेची काळजी वाटली ! माणुसकी, तुला त्रिवार वंदन !

घरच्या गड्याच्या डोकीवर सामान देऊन आम्ही बसस्टँडवर निघालो. आम्ही म्हणजे मी व जॅकब. वाटेत अेस्.आय्.बी. (केंद्रीय गुप्तचर विभाग) ची कचेरी लागली. जॅकबचे अेक मित्र श्री. कृष्णमूर्ती तेथे मोठ्या अधिकारावर आहेत. त्यांना भेटावे म्हणून तो आत शिरला. मीही त्याच्याबरोबर गेलो. महिन्याचा दुसरा शनिवार असल्यामुळे कचेरी बंदच होती. परंतु श्री. कृष्णमूर्ती आवारातच राहात होते. आत गेल्यावर माझ्या मनात विचार आला, श्री. चौबळ यांनी श्री. गाडगीळ यांच्यासाठी दिलेल्या पत्राचा आपण काही अुपयोग केला नाही. निदान आपण येअून गेल्याचे तरी त्यांना फोनवरून सांगावे. म्हणून मी श्री. गाडगीळ यांना त्यांच्या घरी फोन केला. त्यांना फार आनंद झाला. ते म्हणाले, " मी तुमच्यासाठी काय करू शकतो ? वस्तुतः तुम्हांला अिम्फालपर्यंत पोचविणेही मला अशक्य नव्हते. परंतु आमची गाडी कालच अिम्फालला गेलीय. तरीपण माओपर्यंत तुम्हांला पोचविणे मला शक्य आहे." मी त्याबद्दल त्यांचे आभार मानले. त्यांनी श्री. कृष्णमूर्तींना माझी सोय करण्यास सांगितले. श्री. कृष्णमूर्तींनी चौकशी केली तेव्हा त्यांना समजले, की श्री. ठाकूर नावाचे अधिकारी त्यांच्या अेका मित्राच्या खासगी मोटारीतून अिम्फालला जाणार आहेत. प्रथम श्री. ठाकूर मला माओपर्यंतच नेण्यास तयार होते. परंतु नंतर अिम्फालपर्यंत नेण्याचे त्यांनी कबूल केले. गाडीत ते अेकटेच होते. त्यांनाही सोबत हवीच होती. दोघांचेही काम झाले.

गाडी गावात गेलेली होती. ती यायला थोडा वेळ होता. बसस्टँडवर गेलेले सामान मागवून घेतले आणि मी कचेरीतील कर्मचाऱ्यांशी गप्पा मारू लागलो. सुटी असली तरी ते कुठे जाणार? जवळपास अेकही मोठे शहर नाही. अंदमानात जाअून पडल्यासारखे त्या लोकांना वाटत असले पाहिजे. शिवाय काम फार जबाबदारीचे व जोखमीचे. बंडखोर नगांच्या हालचालींवर लक्ष ठेवावयाचे व त्यांची माहिती केंद्रीय सरकारला कळवायची.

इम्फालला जाण्यापूर्वी भेटून जाण्याचे आमंत्रण श्री. गाडगीळ यांनी दिले होते. म्हणून गाडी आल्यानंतर श्री. ठाकूर यांच्यासह त्यांच्या बंगल्यावर गेलो. अेकेका डोंगरावर अेकेक बंगला. त्यामुळे अंतर खूप कापावे लागते. मात्र रस्ते डांबरी व सुस्थितीत असल्यामुळे (मोटारीतून) हिंडण्यास गंमत वाटते.

श्री. गाडगीळ नागपूरचे. त्यांच्या सौभाग्यवती अहमदाबादच्या. दोघेही अुत्साही, हसतमुख व प्रेमळ वाटले.नगा लोकांविषयी लिहिण्याचा मी सौ.गाडगीळांना आग्रह केला. त्यांनीही ते मान्य केले. त्यांच्याशी गप्पा मारताना नगा लोकांच्या प्रामाणिकपणाची माहिती मिळाली. अेक प्रत्यक्ष घडलेली घटना श्री. गाडगीळांनी सांगितली. जपान्यांचा हल्ला झाला त्यावेळी अेका दूरच्या खेड्यात पगाराची रक्कम वाटण्यासाठी म्हणून पोत्यातून पैसे पाठविण्यात आले होते. नगा लोकांचा कागदी नोटांवर विश्वास नाही. त्यांना धातूची नाणीच हवी असतात. म्हणून पगारवाटपासाठी पोती भरभरून पैसे पाठवावे लागतात. जपानी येताच ते पोते जमिनीत पुरून दडवून टाकण्यात आले. पळापळी झाली. लोक अिकडेतिकडे पांगले. पुढे अनेक वर्षानंतर कुणाला तरी ते पोते मिळाले. त्या लोकांनी त्यातील अैका पैशालाही हात न लावता जशीच्या तशी रक्कम सरकारी खजिन्यात नेअून भरली. असला प्रामाणिकपणा बहुधा आता आदिवासींमध्येच शिल्लक राहिला असावा. आदिवासी (नगा) स्त्रियांच्या प्रामाणिकपणाच्या, प्रेमाच्या व दारिद्र्याच्या काही गोष्टी सौ.गाडगीळांकडून समजल्या. मोठ्या हृदयस्पर्शी होत्या त्या. श्री. गाडगीळ यांच्याविषयी सर्व कर्मचाऱ्यांना फार आपलेपणा वाटतो, कारण ते प्रेमळ व कनवाळू आहेत, असे श्री. ठाकूर यांनी सांगितले. श्री. ठाकूर हे बिहारचे राहणारे.

नगांचा प्रश्न कसा सुटेल ?

येथे येण्यापूर्वीच नगांच्या प्रश्नाचा मी थोडाबहुत अभ्यास केलेला होता. येथे आल्यानंतर व प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर काही गोष्टी अधिक स्पष्टपणे लक्षात आल्या.

भारतीय नगांची अेकूण लोकसंख्या सुमारे ६ लाख. त्यांपैकी फक्त साडेतीन लाख लोकच नगाभूमीत राहातात. नेफाच्या टिराप डिव्हिजनमध्ये ४० हजार व

मणिपूरच्या माओ–मरम डिव्हिजनमध्ये सव्वा लाख नगा (काबुअी नगा, तांगखुल नगा, माओ नगा) आहेत.

अिंग्रजांच्या अमदानीतही नगा लोक पुष्कळ अंशी स्वतंत्रच होते. त्यांचा प्रदेश असममध्ये समाविष्ट होता व त्यावर असमच्या राज्यपालाची तांत्रिक सत्ता होती. त्यांच्याकडून प्राप्ती अशी काहीच होत नव्हती. त्यामुळे त्यांच्या विकासासाठीही ब्रिटिश सरकारने काही केले नाही. नगांच्या वेगवेगळ्या जमातींमध्ये वंशपरंपरागत वैरे चालत आलेली होती. त्यांच्या आपसात लढाया चालू असत. त्यात पुन्हा नगा लोक शत्रूचे मुंडके कापून आणून त्याचे प्रदर्शन करण्यात (head–huntingमध्ये) पुरुषार्थ मानणारे. त्यामुळे जोपर्यंत ते असमच्या मैदानी प्रदेशात अुतरून तेथील लोकांना त्रास देत नसत किंवा सरकारी अधिकाऱ्यांचे खून पाडीत नसत तोपर्यंत अिंग्रज सरकार त्यांच्या वाटेला जात नसे. युरोपीय मिशनऱ्यांनी मात्र त्यांच्यात प्रवेश करून त्यांना माणसाळविण्याचे, त्यांना सुशिक्षित बनविण्याचे, त्यांची सर्व प्रकारे सेवा करण्याचे प्रयत्न चालविले होते. आज नगांमध्ये जी जागृती दिसते– आणि जो भारत-द्वेष दिसतो, जी फुटीरपणाची वृत्ती दिसते तीही या मिशनऱ्यांचीच देणगी होय.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर बहुधा या परकीय मिशनऱ्यांच्या चिथावणीमुळेच नगांनी आपल्याला स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारताने मान्यता द्यावी यासाठी सशस्त्र बंड अुभारले. ते अजूनही चालू आहे. बंडखोर नगांचे पुढारी फिझो अिंग्लंड-मध्ये राहून त्यांचे मार्गदर्शन करीत असतात. बंडखोर नगांचे स्वतंत्र सरकार आहे, स्वतंत्र सैन्य आहे. त्यांच्या सैनिकांना चीन व पाकिस्तानकडून शस्त्रास्त्रे व लष्करी शिक्षण मिळते. दुर्गम, डोंगराळ प्रदेशामुळे चीन–पाकिस्तानला जाणाऱ्या बंडखोरांना अडविणे भारतीय सैन्याला शक्य होत नाही.

नगांपैकी सौम्यपंथी लोक, भारत सरकारशी सहकार्य करून आपल्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांचे कायदेशीर सरकार आज नगाभूमीत आहे. परंतु हे तथाकथित सनदशीर पुढारी व नगा सरकारचे नोकर मनातून बंडखोर नगांच्या बाजूचेच आहेत. ते दिवसा भारत सरकारशी व भारताशी राजनिष्ठ असतात, आणि रात्री नगा बंडखोरांच्या बरोबर असतात. त्यांच्या या दुटप्पी वर्तनामुळेच नगा बंड-खोरांचा बीमोड करणे भारतीय सैन्याला शक्य होत नाही, असे अैकण्यात आले. बंडखोर नगांच्या हातून मारले जाअू नये म्हणून हे लोक नगांना सामील आहेत, की त्यांना खरोखरीच स्वतंत्र नगाभूमीबद्दल जिव्हाळा वाटतो म्हणून ते नगांना साह्य करतात, हे सांगणे कठीण आहे.

नगाभूमीतील लष्कराविषयीही दोन प्रकारची मते अैकावयास मिळाली. पहिले मत खुद्द लष्करी अधिकाऱ्यांचे. त्यांचे म्हणणे असे, की आमचे हात भारत सरकारने बांधून ठेवलेले आहेत. आम्हांला पोलिसांप्रमाणे वागविण्यात येते. अमुक करू नका, तमुक करू नका, अशी बंधने आमच्यावर आहेत. ज्यांचा बंदोबस्त करण्याचे काम

आमच्याकडे सोपविले आहे ते युद्धाचे कसलेच नीतिनियम पाळत नाहीत. विश्वासघाताने, लपूनछपून आमच्यावर हल्ले चढवितात; आणि आम्ही त्यांचा प्रतिकार करू लागलो, की सामान्य जनतेत मिसळून जातात. मग आम्ही त्यांचे काहीच वाईट करू शकत नाही. शांतता तह त्यांनी केव्हाही मोडावा, कुणावरही गोळी चालवावी, पण आम्ही मात्र सारे नियम पाळलेच पाहिजेत. अशाने बंडखोरांचा बंदोबस्त होईल की ते जास्तच शेफारतील? आम्हांला पूर्ण स्वातंत्र्य दिले तर आम्ही चार दिवसांत साऱ्या बंडखोरांना वठणीवर आणू.

याच्या उलट अितर लोकांचे म्हणणे असे,की आमचे लष्करी जवान व अधिकारी भयंकर सुस्तावले आहेत. त्यांना लढाअीच नको आहे. धोका पत्करण्याची त्यांची तयारी नाही. ज्यांना युद्धक्षेत्र जवळ असल्यामुळे आपल्या बायका-मुलांना कायद्याने तेथे नेता येत नाही, ते कायद्यातील पळवाटांचा वापर करून जवळच्या शहरात अेखाद्याशी दोस्ती जमवून त्याच्या घरी आपल्या बायकांना बोलावून घेतात; आणि जणू युद्धक्षेत्राशी आपला काही संबंधच नाही, अशा थाटात वागतात. अर्थात वर्षानुवर्षे बायका–मुलांपासून दूर राहणे हे काही सोपे नाही, कारण ते अनैसर्गिक आहे. म्हणून वस्तुत: त्यांना त्यांच्या जबाबदारीवर बिऱ्हाड थाटण्याची परवानगी दिली पाहिजे. सबंध सरहद्दीवर सैनिकांची बिऱ्हाडे थाटली गेली, तर निदान त्यांच्या रक्षणासाठी तरी ते अधिक जागरूक राहतील.

नगा प्रश्नाच्या सोडवणुकीचे तीन मार्ग

नगा प्रश्न सोडविण्याचे तीन मार्ग सध्या आपल्यासमोर आहेत. पहिला मार्ग म्हणजे नगांची स्वतंत्र राष्ट्राची मागणी मान्य करून नगाभूमी हे भारताशी संबंध नसलेले राष्ट्र आहे, या त्यांच्या दाव्याला मान्यता देणे. अर्थात हा प्रश्न अितका सोपा व मर्यादित नाही. नेफाच्या टिराप डिव्हिजनमध्ये व मणिपूरच्या माओमरम डिव्हिजनमध्ये नगा लोक मोठ्या संख्येने आहेत. तेव्हा हे भागही भारतापासून तोडून नगाभूमीला जोडावे लागतील. शिवाय नगांना अेवढे स्वातंत्र्य दिल्यानंतर मिझो, खासी, गारो, बडो, आहोम, काछारी वगैरे सर्वच डोंगरी व मैदानी जमातींना स्वतंत्र राज्ये किंवा राष्ट्रे म्हणून मान्यता द्यावी लागेल. अर्थात कोणतेही लोकशाही सरकार अेवढी हिंमत करू शकणार नाही– त्याने ती करावी किंवा नाही, हा प्रश्न अलाहिदा.

दुसरा मार्ग म्हणजे विरोध करणाऱ्या प्रत्येक नगाला वेचून ठार मारावयाचा. नेपाम बाँब टाकून बंडखोरांची खडी बेचिराख करावयाची आणि अशा प्रकारे 'न रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी' अशी स्थिती निर्माण करावयाची. पन्नास कोटी लोकसंख्येतील पाचसहा लाख लोक असे मारून टाकणे फारसे अवघड नाही. कदाचित

सरकार असे धोरण अवलंबीत, आहे असे पाहिल्यावर नगा बंडखोर आपोआपच सरळही येतील. परंतु लोकशाहीच्या तत्त्वाला बांधलेले सरकार अशा प्रकारचे अमानुष धोरण अवलंबू शकणार नाही हे अुघड आहे.

तिसरा व शेवटचा मार्ग म्हणजे नगा लोकांना सुखलोलुप, विलासी व शांतताप्रिय बनवून त्यांच्या विरोधाची धार बोथट करणे व परिस्थितीशी जुळते घेण्याची अिच्छा त्यांच्यात निर्माण करणे हा होय. हा मार्ग तसा सनातन आहे. औरंगजेबाने शाहू छत्रपतीच्या बाबतीत तो वापरला होता. बंगाली क्रांतिकारकांच्या बाबतीत अिंग्रजांनीही तो यशस्वीपणे हाताळला होता. नजरबंदीच्या काळात क्रांतिकारकांना भरपूर सुखसोयी पुरवावयाच्या आणि नंतर त्यांना सोडून द्यावयाचे. या अुपायामुळे बहुसंख्य क्रांतिकारक आपल्या क्रांतिकार्यापासून विमुख होत. तेव्हा नगांच्या बाबतीत हे अशक्य आहे, असे समजण्याचे कारण नाही. भारत सरकारने गेली काही वर्षे हा अुपाय अजमावून पाहिला आहे आणि त्यात ते पुष्कळच यशस्वी झाले आहे असे दिसते. नगांच्या मुलांना अुच्च शिक्षण देअून मोठमोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या जात आहेत. त्यामुळे बंडखोर नगाही आपल्या मुलांना सरकारी छात्रवृत्त्या मिळाव्यात म्हणून भारतीय अधिकाऱ्यांची खुशामत करू लागले आहेत. या नवशिक्षित तरुणांमध्ये आधुनिक जीवनाचे आकर्षण वाढत आहे. डोंगरदऱ्यांत वणवण भटकत राहून, स्वतःचा जीव पदोपदी धोक्यात घालून भारत सरकारशी लढत राहण्याची जिद्द त्यांच्यात अुरलेली नाही. सर्वसामान्य नगांनाही शांततामय जीवनाची चटक लागली आहे. या दृष्टीने पाहिल्यास भारत सरकारचे हे धोरण यशस्वी होत आहे, हे कबूल केले पाहिजे. हळूहळू अधिकाधिक नगा लोक 'नगाभूमी' हे भारताचे अेक घटकराज्य म्हणून मान्य करून राहावयास तयार होत आहेत असे दिसते. नगाभूमीला असम राज्याशी जोडणारा राज्यपालाचा दुवा नगांना नको आहे. त्याअैवजी त्यांना स्वतंत्र राज्यपाल दिला, त्यांच्या अिच्छेप्रमाणे पोलिसांची संख्या वाढवून दिली आणि भारताशी फारकत होण्यामधील धोके त्यांना पटवून दिले, तर नगा लोक भारतात राहावयास आनंदाने तयार होतील असे वाटते. नगाभूमीचा वार्षिक खर्च सुमारे २० कोटी रुपये आहे. त्यांपैकी १ कोटी रुपयेसुद्धा नगाभूमीतून वसूल होत नाहीत. याचा अर्थ आज ते राज्य सर्वस्वी केंद्र सरकारच्या म्हणजेच सर्वसामान्य भारतीय जनतेच्या पैशातून चालत आहे. याची स्पष्ट कल्पना नगा लोकांना दिल्यास त्याचा अनुकूल परिणाम होअू शकेल. चीन व पाकिस्तान हे आज नगा बंडखोरांना शस्त्रास्त्रे पुरवीत असले, तरी चीनने तिबेटची व पाकिस्तानने पख्तून लोकांची काय दुर्दशा करून टाकली आहे, हे त्यांना समजावून सांगितले पाहिजे. शिवाय बहुसंख्य नगा ख्रिस्ती असल्यामुळे धर्मालाच नामशेष करू पाहणारा चीन आणि अन्य धर्मीयांना तलवारीच्या जोरावर अिस्लामच्या तटबंदीत आणू अिच्छिणारा पाकिस्तान, हे आपले खरे मित्र होअू शकत नाहीत ही गोष्ट नगांना पटवून देणे तसे अवघड जाअू नये.

आणखी अेक अुपाय करून पाहण्यासारखा आहे. सुशिक्षित नगांना नगाभूमीच्या बाहेर– असम, बंगाल, बिहारमध्येच नव्हे, तर गुजरात, महाराष्ट्र, केरळमध्येही नोकर म्हणून पाठवावे. तेथील जीवनाची त्यांना कल्पना आली, तर कदाचित पुन्हा ते आपल्या भागात परत जाअू अिच्छिणार नाहीत. त्यांच्यात भारतीयत्वाची भावना निर्माण होअील आणि ती अितर नगांपर्यंत पोचविण्याच्या कामी त्यांची मदत होअील. अर्थात त्याकरिता अन्य प्रांतीयांनी नगाभूमीत जाण्यास तयार झाले पाहिजे व त्याकरिता त्यांना आवश्यक त्या सोयी व प्रलोभनेही दिली गेली पाहिजेत.

नगा– अेक मोहक व्यक्तिमत्त्व

नगा लोकांसंबंधी अेवढी चर्चा वाचल्यानंतर वाचकांचा असा समज होण्याची स्वाभाविक शक्यता आहे, की नगा हे भयंकर क्रूर, काळेकभिन्न, जंगली राक्षस असावेत. परंतु नगा लोकांना प्रत्यक्ष वावरताना पाहिले, की आपला भ्रमनिरास होतो. नगा स्त्रीपुरुष गोरेपान, धिप्पाड, हसतमुख व रंगेल आहेत. त्यांचे बारीक डोळे वगळल्यास युरोपियन लोकांत ते सहज खपून जातील. आदिवासींसंबंधीची आपली जी कल्पना भिल्ल, गोंड, वारली, संथाळ वगैरे लोकांवरून होते ती नगांच्या बाबतीत पार कोसळून पडते. नगा अुलुपीवर अर्जुन का फिदा झाला असेल ते लगेच लक्षात येते.

शरीरश्रमामध्ये मुळीच कमीपणा न मानणे हा नगांचा अेक प्रमुख गुण. अेखाद्या मंत्र्याची किंवा आय्. अे. अेस्. अधिकाऱ्याची चांगली शिकलेली मुलगी किंवा बायकोही जरूर पडल्यास जंगलात जाअून पाठीवरून लाकडे वाहून आणते, किंवा बाजारात बसून आपल्या परड्यातील भाजीपाल्याची व फळाफुलांची विक्री करते. घरच्या कामाला नोकर ठेवण्याची साहेबी पद्धत तेथे रूढ नाही. त्यामुळे अितर प्रांतांतून गेलेल्या लोकांना तेथे नगा नोकर मिळत नाहीत. बिहारी, अुत्तर प्रदेशीय किंवा असेच लोक घरगुती गडी किंवा हमाल म्हणून काम करताना आढळतात. स्वाभिमान व शरीरश्रमाबद्दलचे प्रेम यांचा सुरेख संगम नगांमध्ये झालेला आढळतो.

नगा लोकांकडून आपल्याला अनेक गुण घेता येण्यासारखे आहेत. त्यांचे स्वावलंबन, सहकार, जिद्द वगैरे अनेक गुण वाखाणण्यासारखे आहेत. ते आपल्यापेक्षा मागासलेले आहेत, असे समजून त्यांच्याकडे न जाता, ते आपल्यासारखेच आहेत, आपल्या आपल्या तोडीचे आहेत, या भूमिकेतून आपण त्यांच्याजवळ गेलो तर खात्रीने ते आपले प्रेमाने स्वागत करतील आणि भारतीय जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी अेकरूप होण्याचा ते आपण होअून प्रयत्न करू लागतील.

थोडक्यात बचावलो!

कोहिमा ते अिम्फाल हा रस्ता शेवटचे १५–२० मैल वगळल्यास अत्यंत दाट जंगलातून व डोंगरखोऱ्यातून जातो. हिवाळा असूनही सगळीकडे हिरवेगार होते. महाराष्ट्रासारखे बोडखे, वैराण डोंगर अिकडे नाहीत. त्यामुळे डोळ्यांना सुख वाटते.

अर्थात मनात धाकधूकही असतेच. कुठल्या झुडपातून अेखाद्या बंडखोर नगा, मिझो किंवा कुकी बाहेर पडेल आणि गोळचा झाडील हे काही सांगता येत नाही. मैदानी प्रदेशात प्रवेश करताना काँपोकपि (Kangpokpi) या ठिकाणी तेथील पोलिस अधिकारी श्री. सिंग भेटले. ते श्री. ठाकूर यांचे मित्र. म्हणून आम्ही थोडावेळ तेथे थांबून त्यांचा पाहुणचार घेतला. बिचारे सिंग अगदी गडबडून, भांबावून गेल्यासारखे दिसत होते. त्याचे कारण विचारता ते म्हणाले, "तुम्ही आलात त्या भागात नुकतीच कुकी व मिझो बंडखोरांची अेक टोळी घुसली असून तिने तिथे धुमाकूळ माजविला आहे." त्याबरोबर ठाकूर मला म्हणाले, "देवाची कृपा ! आपण थोडक्यात बचावलो. त्यांच्या तावडीत सापडलो असतो तर काय झाले असते देव जाणे !"

मणिपूरचे नगाभूमीशी हाडवैर

मणिपूरमधील अुत्तरेचा बराचसा भाग नगा लोकांनी व्यापिलेला आहे. तो नगाभूमीला जोडावा अशी नगांची मागणी आहे. अर्थात मणिपुरी लोकांना हे मान्य नाही. त्यामुळे मणिपुरी व नगा यांच्यात हाडवैर निर्माण झालेले आहे. मणिपुरी लोकही शूर, लढवय्ये आहेत. नगांचा प्रश्न आमच्याकडे सोपवा, आम्ही तीन दिवसांत त्यांचा बंदोबस्त करून दाखवितो, असे मणिपुरी म्हणतात. नगांच्या बंदोबस्तासाठी शीख, गुरखा, मराठे वगैरे सैनिक वापरण्याअैवजी मणिपुरी सैनिकांचा वापर करून पाहण्यासारखा आहे. मणिपूर व नगाभूमी यांच्यातील शत्रुत्वाची अेक झलक काँपोकपिला पाहावयास मिळाली. आम्ही श्री.सिंग यांच्या ठाण्यात बसलो असता नगाभूमीच्या मुख्य मंत्र्यांची मोटर तेथे आली. वस्तुत: मुख्य मंत्र्यांची गाडी अडविण्याची प्रथा नाही. परंतु मणिपूरच्या पोलिसांनी सदर गाडी अडविली. अेवढेच नव्हे, तर ड्रायव्हरकडे लायसेन्स आहे की नाही याचीही कसून तपासणी केली; आणि लायसेन्सवर ड्रायव्हरचा फोटो नसल्याबद्दल त्याला चांगलेच धमकावले. म्हणजे पर्यायाने नगाभूमीच्या मुख्य मंत्र्याचाच त्यांनी अपमान केला.

कोंदणात बसविलेले रत्न

८,६२८ चौरस मैल क्षेत्रफळाच्या मणिपूर राज्यातील फक्त ७०० चौरस मैल क्षेत्र मैदानी खोऱ्याचे असून ७,८०,०३७ लोकसंख्येपैकी ५,१४,६६७ लोक या सपाट खोऱ्यात राहतात. त्यामुळे खोऱ्यातील लोकसंख्येचे सघनता–प्रमाण फार मोठे म्हणजे दर चौरस मैलास ७४७ असून डोंगरी प्रदेशात ते फक्त ३३ आहे. मणिपूरचे हे खोरेही समुद्रसपाटीपासून २६०० फूट अुंचीवर असल्यामुळे येथील हवा फार छान आहे – अगदी पुण्याच्या हवेसारखी. सभोवती अुंचअुंच (१० हजार फुटांपर्यंत अुंची असलेल्या) डोंगरांच्या रांगा आणि मधोमध वाटीसारखे खोलगट व सपाट खोरे काश्मीरची आठवण करून देते– जणू कोंदणात बसविलेला मणी (रत्न)च ! आणि मग मणिपूर हे नाव सार्थ वाटते. काश्मीरच्या अुत्पत्तीसंबंधी जी दंतकथा अैकायला मिळते तीच

मणिपूरसंबंधीही प्रचलित आहे. अेकेकाळी या खोऱ्यात पाणीच पाणी होते. काश्मीरच्या खोऱ्यातील पाण्याला काश्यप ऋषींनी वाट काढून दिली. तर मणिपूर खोऱ्यात भोवतालच्या डोंगरावरून माती वाहून येअून ते भरले गेले. त्यातून पाच बेटे निर्माण झाली. कामरूप (असम)चे राज्यकर्ते आपल्या राज्यातील भयंकर गुन्हेगारांना हद्दपारीची – काळ्या पाण्याची-शिक्षा भोगण्यासाठी या बेटांवर पाठवीत. (आज असम, त्रिपुरा, काछार, मणिपूर व ब्रह्मदेश यांच्यांत दळणवळणाची पुरेशी साधने विद्यमान नाहीत. परंतु प्राचीन काळी या भागांमध्ये चांगले दळणवळण असावे असे वाटते.) काश्मीरी लोकांप्रमाणे मणिपुरी लोकही कलाकुसरीत प्रवीण व प्रख्यात आहेत. त्यामुळे मणिपूरला 'पूर्वेकडील काश्मीर' म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. परंतु हे साम्य येथेच संपते. काश्मीरी लोक नाजुक प्रकृतीचे, नेहमीच अितरांच्या आधिपत्याखाली राहिलेले, तर मणिपुरी लोक शूर, लढवय्ये. भारतात सर्वात शेवटी (अि. स. १८९१ च्या ऑगस्ट महिन्यात) अिंग्रजांच्या अमलाखाली आलेले. आजही मणिपुरी सैनिक गुरखा सैनिकांप्रमाणेच निधड्या छातीचा व बहादुर समजला जातो. साक्षरतेच्या बाबतीत काश्मीर अत्यंत मागासलेले तर मणिपूर अत्यंत पुढारलेले. १९५१ साली मणिपूरमधील साक्षरतेचे प्रमाण फक्त १० टक्के होते. ते १९६१ साली ३३ टक्क्यां-पर्यंत गेले. शाळेत जाण्याच्या वयाची १०० टक्के मुले शाळेत जात आहेत असे, बहुधा हे अेकमेव राज्य असावे. काश्मीरी ही काश्मीरची भाषा साहित्यिकदृष्टया जवळजवळ बोलीभाषेच्या पातळीवरच आहे, आणि म्हणून काश्मीरची राज्यकारभाराची भाषा अुर्दू आहे. अितके असूनही राजकीय कारणांमुळे काश्मीरीला भारताच्या राज्यघटनेत आठव्या अनुसूचीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. याच्या अुलट मणिपुरी ही अत्यंत समृद्ध भाषा आहे. पाच दैनिके, व अनेक द्वैमासिके, त्रैमासिके या भाषेत प्रसिद्ध होतात दरसालडझनावारी पुस्तके प्रकाशित होतात, तरीही या भाषेला आठव्या अनुसूचीत· स्थान नाही. काश्मीरी माणूस आपले खोरे सोडून बाहेर पडत नाही, तर मणिपुरी विद्यार्थी काशी, अलाहाबाद, दिल्लीपासून पुण्यामुंबअीपर्यंत पसरलेले आढळतात. अशी अनेक भेदस्थळे सांगता येतील.

टुमदार अिम्फाल शहर

अिम्फाल शहरात प्रवेश करताच दोन गोष्टी आपले लक्ष वेधून घेतात. अैस-पैस, प्रशस्त पक्के रस्ते आणि त्या रस्त्यांवरून बहुसंख्येने जाणारे सायकलस्वार. तशी अिम्फालची लोकसंख्या फार मोठी नाही. फक्त ६७,७१७ च आहे. परंतु वस्ती दूरदूर पसरलेली आहे. त्यामुळे कोंदटपणा कसा तो नाही. बहुधा यामुळेच येथे सायकलींची संख्या अितकी अधिक असावी. तरुण मुले-मुली मोकळेपणाने सायकलवरून फिरत असतात. ते दृश्य पाहिले, की पुण्याची आठवण येते. आणि मग मणिपुरी विद्यार्थ्यांचा ओढा पुण्याकडे अितका अधिक का याचा अुलगडा होतो. आज पुण्यात जवळजवळ ४० मणिपुरी विद्यार्थी वेगवेगळ्या महाविद्यालयांत शिकत आहेत. त्यांच्यापैकी

काहीजणांना जेव्हा मी हा प्रश्न केला की, तुम्ही गुवाहाटी, कलकत्ता, पाटणा वगैरे जवळची शहरे सोडून अितक्या लांब, अगदी दुसऱ्या टोकाला, कशाला येता? तेव्हा त्यांनी मला सांगितले, "अेकतर अिथली समशीतोष्ण हवा आम्हांला फार मानवते. अगदी अिम्फालसारखीच आहे ती. शिवाय मुंबअी, कलकत्त्यासारखी गर्दी येथे नाही. त्या गर्दीत आम्हांला गुदमरल्यासारखे होते. अिथे कसे मोकळेमोकळे वाटते. त्यात पुन्हा पुण्याच्या विद्याप्रेमाचा डंका आमच्या राज्यापर्यंत जाअून पोचलेला आहे. त्यामुळे अिथे येण्याकडे आमचा ओढा विशेष."

"शिवाय अिथल्या सायकलस्वारांच्या गर्दीत मिसळल्यानंतर आपण अिम्फालच्या रस्त्यातूनच हिंडत आहोत, असेही तुम्हांला वाटत असेल नाही?" मी विचारले.

त्यांनी यावर असे गोड स्मित केले, की जणू त्यांना म्हणायचे होते, "आमची मख्खी तुम्हांला कळलीय बरं का!"

शालींची खरेदी

मणिपूरचे नाव अुच्चारताच दोन गोष्टी आपल्या मनःश्चक्षूंसमोर येतात. मणिपुरी नृत्य आणि हातमागावर विणलेल्या रंगीबेरंगी मणिपुरी शाली –विशेषतः प्रतिष्ठित स्त्रियांनी बाहेर जाताना अंगावर घ्यावयाच्या मोहक शाली. यांपैकी मणिपुरी नृत्य मी पूर्वी वेगवेगळ्या प्रसंगी पाहिलेले होते. शिवाय माझ्या छोटयाशा मुक्कामात माझ्यासाठी स्थानिक मंडळींनी नृत्याचा कार्यक्रम आयोजित करावा, असा काही मी कोणी मंत्री किंवा राजकीय पुढारीही नव्हतो. म्हणून नृत्याचा विचार डोकीतून काढून माझे यजमान मित्र श्री. निर्मलेंदू दास यांच्याबरोबर शालींच्या बाजारात गेलो. हा बाजार अगदी अुघडा आहे. लहानलहान चौकोनी ओटयांवर नाना प्रकारच्या शालींच्या घडया समोर ठेवून मणिपुरी स्त्रिया सराअीतपणे त्यांची विक्री करीत होत्या. सगळा बाजार बायकांच्या ताब्यात. खरेदी करणारे मात्र पुरुष– विशेषतः बाहेरून आलेले. कारण स्थानिक लोकांना हवा असलेला माल त्यांच्या घरीच तयार होत असतो. शिलाँगच्या बाजारातील खासी स्त्रिया आणि मणिपूरच्या ख्वाअिरमबंद बाजारातील मणिपुरी स्त्रिया यांच्यात बाह्यतः काहीच फरक वाटला नाही. हां, भाषेच्या बाबतीत फरक होता. खासी स्त्रिया अिंग्रजीही बोलू शकतात. त्यांच्यावर पाश्चात्त्य ख्रिस्ती संस्कारांची चांगलीच छाप असल्याचे चटकन लक्षात येते. याच्या अुलट मणिपुरी स्त्रिया हिंदू आहेत. त्यांचा व्यवहार मुख्यतः मणिपुरी भाषेत आणि अंशतः मोडक्या-तोडक्या हिंदीत चालतो. गिऱ्हाअिकाशी सलगीने बोलणे, त्यांची थट्टामस्करी करून त्यांना आपलेसे करणे आणि त्यांच्या गळयात आपला माल बांधणे या कामात त्या चांगल्याच पटाअीत आहेत. श्री. दास हे स्थानिक रहिवासी. त्यात पुन्हा व्यापारी. मणिपुरी भाषा त्यांना चांगली अवगत आहे. यामुळे दराची घासाघीस त्यांनीच केली. आपण फसलो नाही, याचे समाधान मला लाभले. भाजी-बाजारातही फेरफटका मारून आलो. तेथील विक्रीचे कामही स्त्रियाच करीत होत्या.

स्त्रीपुरुषांमधील श्रमविभाजन

"ज्या अर्थी अिथल्या स्त्रिया बाजार सांभाळतात, त्या अर्थी अिथले पुरुष आळशी असले पाहिजेत, नाही ?" मी निर्मलबाबूंना विचारले.

"छे: छे: ! तसेच काही म्हणता यायचे नाही. अिथल्या स्त्रीपुरुषांनी आपसात ठरविलेला हा श्रमविभाग आहे. पुरुषांनी लढाया माराव्यात, शिकार करावी, जंगलातून लाकडे आणावीत, शेतात राबावे, ओझी अुचलावीत, आणि अशीच अंगमेहनतीची कामे करावीत. तर स्त्रियांनी कताअीविणाअी करावी, बाजारात बसून मालाची विक्री करावी, आणि शिवाय चूल नि मूल सांभाळावे. संसाररथाची दोन्ही चाके समान. आपापली जबाबदारी अिमानाने पार पाडणारी."

कला व तंत्रज्ञान यांची आवड

सायंकाळी श्री. दास यांच्याबरोबर काही प्रतिष्ठित मंडळींना जाअून भेटलो. श्री. गोपाल भट्टाचार्य हे व्यापारी असून येथील परिस्थितीचे चांगले जाणकार आहेत. कोणाकोणाला भेटावे, याची व्यवस्थित माहिती त्यांनी दिली. लांब दाढी असलेले, ऋषितुल्य वृद्ध शिक्षक श्री. कुंजविहारी गोस्वामी यांनी मणिपुरी लोकांची काही खास वैशिष्टये सांगितली. ते म्हणाले, "या लोकांमध्ये कलेची व तंत्रज्ञानाची अुपजत आवड आहे. चित्रकलेत तर ते विशेष प्रावीण्य दाखवू शकतील. शाळेतील मुले सहज बघताबघता सुंदर चित्रे व अचूक नकाशे काढतात. त्यामुळे यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास यांच्यातून चांगले कलावंत व तंत्रज्ञ तयार होतील. अर्थात सुखवस्तू पांढरपेशा जीवनाची चटक यांनाही लागलेली आहे आणि त्याबरोबरच पांढरपेशा जीवनाचे दुर्गुणही त्यांनी अुचललेले आहेत." गेली अनेक वर्षे या भागात सैन्याचा तळ आहे. दुसऱ्या महायुद्धात जपान्यांशी लढण्याकरिता आलेले ब्रिटिश व भारतीय सैनिक आणि आता पाकिस्तानचा धोका निर्माण झाल्यामुळे आलेले भारतीय सैनिक. सैनिकांच्या संसर्गामुळे सर्वसामान्य नागरिक भ्रष्ट होतो असा सार्वत्रिक अनुभव आहे. त्याच प्रकारचा भ्रष्टाचार या भागात बोकाळला असल्यास नवल नाही.

वैष्णव संप्रदायाचा प्रभाव

मणिपूरचे मूळ रहिवासी किरात. नंतर गंधर्व आले. अुत्तरेकडून आर्य आले, पूर्वेकडून व अीशान्येकडून ब्रह्मी, मंगोलियन आले. सर्वांच्या मिश्रणातून आजचा मणिपुरी माणूस तयार झाला. गोरा किंवा सावळा रंग, बारीक डोळे, फुगीर गाल आणि धडधाकट शरीर. मधूनच अद्भुत सौंदर्य दृष्टीस पडते. मणिपूरचा गंधर्व राजा चित्रसेन याची कन्या चित्रांगदा. तिच्या प्रेमात अर्जुन सापडला. त्या प्रीतीने जन्म दिला बभ्रुवाहनाला. (बभ्रू म्हणजे भुऱ्या रंगाचा किंवा भुरकट केसांचा). हा बापसे बेटा सवाअी. त्याने आपल्या जन्मदात्या पित्याचा, अर्जुनाचा पराभव केला, असे महाभारत सांगते.

मणिपूर खोऱ्यातील बहुसंख्य लोक (सुमारे ५ लाख) हिंदू आहेत. बंगालच्या वैष्णव पंथाचे अनुयायी. हा पंथ रूढ होण्यापूर्वी खूप संघर्ष झाला. राजा ज्या पंथाचा अनुयायी असेल त्या पंथाचा जोर होओी. प्रारंभी हे लोक अग्निपूजक होते. आजही या अग्निपूजेचे अवशेष विद्यमान आहेत. जुन्या पद्धतीच्या प्रत्येक घरात अेक फुंगा म्हणजे अग्निकुंड असावयाचेच. घरातील सर्वांत महत्त्वाच्या खोलीत, दिवाणखान्यात हा फुंगा मधोमध असतो. यातील अग्नी सतत प्रज्वलित राहावा, याची काळजी घेतली जाते. कारण अग्नी विझणे हा अपशकुन मानला जातो. आजकाल या कर्मकांडात लोकांना फारसा रस अुरलेला नाही. तरीदेखील नव्या घराची वास्तुशांती झाल्या-नंतर पाच दिवसपर्यंत हा फुंगा प्रज्वलित ठेवण्याची प्रथा आजही कटाक्षानें पाळली जाते. या फुंगाच्या पश्चिमेस जवळच जमिनीत अेक खड्डा असतो. त्याला फुंगालाअिरू असे म्हणतात. जुने लोक रोज सकाळी या फुंगालाअिरूला प्रणाम करीत. घरातील मौल्यवान वस्तू या खड्डयात ठेवीत. या देवाचा दरारा अितका मोठा असे, की चोर-देखील त्यातील वस्तूंना स्पर्श करण्यास धजत नसे. घराच्या नैऋत्येकडील कोपऱ्यात सनामाही काचिन म्हणजे देवघर (काचिन–कोपरा) असते. या ठिकाणी मातीचा अेक घट असतो. त्याचीही पूजा केली जाते. शिवाय फुंगाच्या अुत्तरेस भिंतीजवळ लैमारेन नावाची देवी असते. मणिपुरी नववर्षदिनी– चैरौबाच्या दिवशी आणि लग्न-प्रसंगी– तिनलैथबाच्या वेळी– या देवीचे स्मरणपूजन केले जाते.

हा झाला मणिपुरी लोकांचा परंपरागत धर्म. यात मूर्तिपूजेला स्थान नाही. याच्याच बरोबर वैष्णव पंथाचाही पगडा दिसून येतो. मध्वाचार्य, रामानंदी, चैतन्य महाप्रभू, शंकरदेव वगैरे अनेक वैष्णव पंथीयांनी आपला मतप्रचार येथे केला. मधुरा-भक्तीनेही शिरकाव केला. पामहैबा अूर्फ गरीबनवाज या राजाने शांतिदास अधिकारी या बंगाली ब्राह्मणाच्या सल्ल्यावरून रामानंदी वैष्णव संप्रदायाची दीक्षा आपल्या प्रजेला देण्याचा जोरदार प्रयत्न केला. परंतु वैदिक धर्माचा पुरस्कर्ता लौरेम्बा खोङनाङथबा याने त्याला कसून विरोध केला. त्याच्यामागे फार मोठ्या संख्येने अनुयायी अुभे होते. त्यामुळे गरीबनवाजाला रामानंदी संप्रदाय हा सरकारी धर्म बनविण्यात यश आले नाही. तो अत्यंत क्रुद्ध झाला. त्याने प्रजेला चांगली अद्दल घडविण्याचे ठरविले. त्याने लोकांचे जुने धार्मिक ग्रंथ जाळून टाकले; लोकभाषेत देवाची स्तुतिस्तोत्रे गाण्या-वर बंदी घातली आणि लोकांना सक्तीने बंगाली वैष्णव भजने गावयास भाग पाडले. त्यामुळे रामानंदी संप्रदायाचा प्रसार होण्याअैवजी मध्वाचार्यांच्या संप्रदायाचाच प्रसार झाला. जुन्या काळी शैव-वैष्णवांमध्ये जे संघर्ष होत त्यापेक्षा हा वैष्णवांमधील दोन पंथांचा संघर्ष कमी अुग्र नव्हता. धर्मवेड काही फक्त मुसलमानांनीच व ख्रिश्चनांनीच या देशात आणले हे सर्वस्वी खरे नाही. ते त्यापूर्वीही येथे मोठ्या प्रमाणात होते; आणि अचानक केव्हातरी त्याचा प्रचंड अुद्रेक होओी, अेवढाच याचा मथितार्थ.

मैतेअि मरुप व सनामाही चळवळ

मणिपुरी भाषेला स्वत:ची लिपी होती. परंतु राजाश्रयाच्या जोरावर बंगालीने त्या लिपीला मागे सारून तिची जागा पटकाविली. आज मणिपुरी भाषा या बंगाली लिपीत लिहिली जाते. परंतु गेल्या काही वर्षांपासून मणिपुरी लोकांमध्ये विशेष अस्मिता जागृत झाली आहे. कदाचित बंगाली भाषा व बंगाली लोक यांच्या वाढत्या वर्चस्वामुळे त्या अस्मितेच्या अग्नीवरील राखेला फुंकर घालून अडविण्याचे कार्य अधिक झपाट्याने झाले असेल. धार्मिक क्षेत्रात बंगाल्यांचे वर्चस्व पूर्वीपासूनच होते. अलीकडे शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात बंगाल्यांनी – विशेषत: पूर्व पाकिस्तानातून आलेल्या बंगाल्यांनी– आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविल्यामुळे या अस्मिता प्रकटनाला चालना मिळाली असण्याचीही शक्यता आहे.

मणिपूरचे हिंदू लोक स्वत:ला मैतेअि (किंवा अधिक शुद्ध लिहावयाचे तर मैतै) म्हणवितात. त्यात मुख्यत: क्षत्रियांचा समावेश होतो. कारण तेच अिथले मूळचे रहिवासी. परंतु १५ व्या शतकात भारताच्या अितर प्रांतांतून आलेले ब्राह्मणही त्यांतच मोडतात. या लोकांनी 'मैतेअि मरुप' (मैतेअि भ्रातृसंघ) या नावाची संघटना स्थापन केलेली असून तिच्याद्वारे मणिपूरच्या वैष्णवपंथपूर्व धर्माचे पुनरुज्जीवन करण्याची जी चळवळ सुरू केली आहे तिला 'सनामाही' असे नाव आहे. देवघर, तेथील देवस्वरूप मातीचा घडा आणि अेकूण वैष्णवपंथपूर्व मणिपुरी धर्म या सर्वांसाठी 'सनामाही' हा शब्द वापरला जातो. सना म्हणजे सोने. माही म्हणजे द्रवरूप. सनामाही म्हणज सोन्याचा रस. मानवी वीर्याचेच ते प्रतीक आहे, असे सांगणारेही भेटले. नवे घर बांधण्यापूर्वी अेक स्तंभ अुभा करून त्याची पूजा करतात, त्यालाही सनामाही असेच संबोधतात. अर्थात सध्या तरी जुन्या मणिपुरी धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीला प्रेरणा देणारा तो प्रभावशाली शब्द बनला आहे अेवढे खास.

धार्मिक वृत्तीचा पगडा

ही झाली धर्माची राजकीय बाजू. हिचा बोलबाला शहरी सुशिक्षितांमध्ये पुष्कळ असला तरी सर्वसामान्य जनता पूर्वीप्रमाणेच वैष्णव संप्रदायाची अनुयायी आहे. तिच्यावर धार्मिक वृत्तीचा पगडा खूपच अधिक आहे. रस्त्यातून जाताना गंध लावलेले मणिपुरी पुरुषच नव्हे,तर स्त्रियाही बऱ्याच मोठ्या संख्येने पाहावयस मिळतात. त्यांचे गंध कपाळावर तर असतेच; परंतु नाकावरही त्याचा ठसठशीत पट्टा असतो. प्रत्येक गावात राधाकृष्ण,जगन्नाथ वगैरेंची देवळे असतात. लोक देवळात जमून सामुदायिक भजन-कीर्तन करतात. अेवढेच नव्हे तर रस्त्यानेही भजने गात जाणाऱ्या शुभ्र वस्त्रधारी स्त्रियांचे घोळके आढळतात.

या लोकांमध्ये सोवळे फार कडक आहे. मणिपुरी स्त्रिया आंघोळ करून धूतवस्त्र नेसल्याखेरीज स्वयंपाक करणार नाहीत. सर्व लोक मत्स्याहारी असले तरी मांसा-

हार व अंडी खाणे अत्यंत निषिद्ध मानले जाते. पूर्वी तर मांस खाणाऱ्याला घरात प्रवेशही करू देत नसत, आणि घरच्याच माणसाने मांसाहार केला असल्यास त्याला आंघोळ करून शुद्ध व्हावे लागे. अिंफालमध्ये आजही मांस विक्रीचे दुकान नाही, असे मला सांगण्यात आले. यावरून मांसाहाराविरुद्ध लोकमत किती अुग्र आहे, याची कल्पना येते. अर्थात अन्य धर्मीय लोक आपली सोय कशी करून घेत असतील असा प्रश्न माझ्या मनात आल्याशिवाय राहिला नाही.

सर्वांत मोठा सण होळीचा

अुत्तर भारताप्रमाणे मणिपूरमध्येही होळी हा सर्वांत मोठा सण समजला जातो. हा पाच दिवस चालतो. येथील होळीचे स्वरूपही थोडे वेगळे आहे. गावातील लोकांकडून वर्गणीदाखल लाकडे गोळा करतात. (पूर्वी ही लाकडे चोरून आणीत). त्या लाकडांच्या साहाय्याने अेक झोपडी व अेक देअूळ तयार करतात. देवळात गौरांग प्रभूंची (चैतन्यांची) लाकडी मूर्ती स्थापन करतात. मूर्तीची पूजा करून प्रसाद वाटतात आणि मूर्ती बाहेर काढतात. त्यानंतर त्या दोन्ही झोपड्या पेटवून देतात. दुसरे दिवशी घरोघर हिंडून पैसे मागतात. रस्त्यातही अडवून पैसे मागतात. अबीर गुलाल फासतात, आणि मिळालेल्या पैशांची मिठाअी आणून सामुदायिकपणे जल्लोष करतात.

काही सामाजिक वैशिष्ट्ये

मणिपूरला मातृसत्ताक पद्धती प्रचलित नाही. पितृसत्ताक पद्धतीच आहे. तरीपण स्त्रियांना बरोबरीचा दर्जा प्राप्त झालेला आहे. याचे कारण येथील स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. घरकामासाठी गडी ठेवण्याची प्रथा श्रीमंतांमध्येही नाही, त्यामुळे साहजिकच पुरुषांनाही कामात मदत करावी लागते.

आपल्याकडे स्त्रियांनी आपले केस कापणे– बॉबकट ठेवणे ही फार पुरोगामी फॅशन समजली जाते. सर्वसामान्य मध्यम वर्गातील मुलीही ही फॅशन करायला धजत नाहीत. परंतु मणिपूरमध्ये मात्र ही फॅशन कालबाह्य, गावढळ ठरली आहे. म्हणजे आता फक्त खेड्यातल्या मुलीच मानेवर केस कापून घेतात. शहरामध्ये लांबसडक केस ठेवणे ही पुरोगामी फॅशन झाली आहे. अर्थात पूर्वीही केस कापण्याची प्रथा सर्वच महिलावर्गाला लागू नव्हती. फक्त कुमारीकाच केस कापून घेत. आता नवी फॅशन रूढ झाल्यामुळे कोणती स्त्री कुमारीका आहे व कोणती विवाहित आहे हे ओळखण्याचे काही साधन अुरलेले नाही.

येथील लग्नविधी फार सोपा व सुटसुटीत असतो. हुंड्याची प्रथा मुळीच नाही. वरसंशोधनाअैवजी वधूसंशोधन करावे लागते. मुलाचे आअीबाप मुलगी शोधतात. लग्न ठरले की निवडक लोकांची जेवणावळ होते. साखरपुड्याचे जेवण हेच लग्नाचे जेवण. या वेळी मुहूर्त ठरतो. लग्न मुलीच्या घरी लागते. सप्तपदी वगैरे वैदिक पद्धतीचाच

अवलंब केला जातो. त्या वेळी स्त्री-पुरुष मंडळी घेर धरून भजनें गातात व नाचतात. लग्नासाठी शेकड्यांनी लोक जमतात. परगावाहूनही लोक येतात. परंतु प्रत्येकाने आपापल्या घरी जेवण करून यावयाचे. लग्नाची अशी जेवणावळ नसते. लग्नानंतर मिठाई वाटतात. मग नवरीला घेऊन वऱ्हाडी मंडळी परत येतात. पूर्वी वरवधूंना पैसे देण्याची प्रथा होती. आता आधुनिक प्रकारच्या भेटवस्तू देतात. लग्नाच्या पाचव्या दिवशी नवरानवरी वधूच्या घरी जातात. तेथे अिष्टमित्रांना जेवण दिले जाते.

११-२-६८

भेटीगाठी

सकाळी विमानकंपनीच्या शहर-कचेरीत जाऊन अुद्याचे सिल्चरचे तिकीट काढले. विमानसर्व्हिस गावठी असल्यामुळे कचेरीत भपका असा नव्हताच. आपल्याकडे अेस्. टी.च्या कचेऱ्या याच्यापेक्षा जास्त रुबाबदार असतात. आधी नाव नोंदविले असल्यामुळे तिकीट मिळण्यास काही त्रास पडला नाही.

त्यानंतर डी. अेम्. कॉलेजातील अर्थशास्त्र व राजकारण या विषयांचे प्राध्यापक श्री. भूपेशरंजन सेनगुप्त यांच्या घरी गेलो. बराच वेळ मोकळेपणाने गप्पागोष्टी झाल्या. मणिपूर देशाच्या अेका कोपऱ्यात आहे. येथे जगापासून वेगळे पडल्यामुळे अेकाकी वाटते. काही करण्यास अुत्साह वाटत नाही, अशी तक्रार श्री. सेनगुप्त यांनी केली. मणिपूरच्या राजकीय व सामाजिक जीवनाची ओझरती ओळख त्यांनी करून दिली.

मला अेखाद्या महत्त्वाच्या मणिपुरी साहित्यिकाला भेटावयाचे होते म्हणून गावाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या प्रा. नीलकांत सिंह यांच्या घरी गेलो. प्रा. सिंह मणिपुरी-साहित्य-परिषदेचे चिटणीस व संगीत-नाटक-अकादमीचे सभासद आहेत. साहित्याप्रमाणेच मणिपुरी नाट्य व नृत्य यांचीही चांगली माहिती त्यांच्याजवळ आहे. परंतु ते घरी नव्हते. म्हणून महाराजकुमारी श्रीमती विनोदिनीदेवी यांच्या बंगल्यावर गेलो. त्यांनी मोठ्या प्रेमाने आमचे स्वागत केले. विनोदिनीदेवी या मणिपूरच्या पहिल्या पदवीधर महिला. 'अशङ्बा नोङजाबी' (निळसर संधिप्रकाश) हे त्यांचे नाटक चांगलेच गाजले आहे. त्याशिवाय 'नुङ्यारक्ता चन्द्रमुखी' (खडकातील कमळ) हा त्यांचा कथासंग्रहही खूपच लोकप्रिय झालेला आहे. अर्थात मणिपुरी भाषिकांची संख्या फार थोडी म्हणजे जेमतेम १२ लाख आहे. (त्यात मणिपूरच्या बाहेर काछार वगैरे भागात राहणाऱ्या मणिपुरी भाषिकांचाही समावेश होतो.) शिवाय हे लोक लिपीच्या समानतेमुळे बंगाली व असमीया पुस्तकेही वाचू शकतात. त्यामुळे मणिपुरी पुस्तकांचा खप नाही. दरसाल १०-१२ पुस्तके निघतात. लोक पुस्तके विकत घेण्या-अैवजी अुसनवारीने वाचणेच जास्त पसंत करतात, अशी तक्रार विनोदिनी देवींनी

केली. परंतु मी त्यांना सांगितले, की पुस्तके विकत न घेणे हा सर्वच भारतीयांचा स्वभावधर्म आहे. मणिपुरी भाषेत मुख्यत: कथासंग्रहच निघतात. कादंबऱ्या फारच कमी लिहिल्या जातात. कवितेलाही मागणी फारशी नाही. सरकारकडून पुस्तक-प्रकाशनाला मदत मिळते म्हणून एवढी तरी पुस्तके निघतात, असे समजले.

दुपारचे जेवण डॉ. अमलेंदू गुह यांच्या थोरल्या बंधूंकडे झाले. मी मांसमच्छर खात नाही हे कळल्यानंतर सौ. गुहा फार हळहळल्या. अर्थात असममध्ये प्रवेश केल्या-पासून या गोष्टीसाठी हळहळणाऱ्या भगिनी जागजागी भेटल्या असल्यामुळे मला आता त्याची सवय झाली आहे. त्यांची अडचण मला समजते. अितक्या दुरून आलेल्या पाहु-ण्याला आपण काहीच चमचमीत करून घालू शकत नाही, आपल्या अितमामाला साजेलसा पाहुणचार करू शकत नाहीत, याचा खेद त्यांच्या स्वरातून व मुद्रेवरून मला स्पष्ट दिसतो. तरीपण मी तरी काय करणार ? "तुम्ही मला भात-भाजी खाऊ घाला. मला त्यातच आनंद आहे." असे मी सांगतो. पण त्यांना ते कसे बरे वाटणार ? त्या भाज्यांचे नाना प्रकार करतात, बंगाली असल्या तर तऱ्हेतऱ्हेच्या मिठाया आणतात; आणि मग नको-नको म्हणत तो सारा अत्याचार (पोटावरील) सहन करावा लागतो. अर्थात त्यामागे त्यांची आत्मीयता, स्नेह, जिव्हाळा स्पष्टपणे दिसत असल्यामुळे कुरकुर करणेही योग्य वाटत नाही. आजही असेच 'भरपेट' भोजन करावे लागले.

आरतीचे आगळे दृश्य

तिसऱ्या प्रहरी गावाबाहेरील राजवाड्यातील श्री गोविंदजीचे मंदिर पाहावयास गेलो. मंदिराचे घुमट सोनेरी आहेत. यामुळे त्याला सुवर्णमंदिर (गोल्डन टेंपल) असे म्हणतात. मंदिराचे आवार प्रशस्त व स्वच्छ आहे. या ठिकाणी मणिपुरी नृत्याचे (रासाचे) कार्यक्रम अधूनमधून होत असतात. त्याला ही जागा योग्य आहे. आरतीची वेळ होती. यामुळे येथील विशिष्ट प्रकारची आरती पाहावयास मिळाली. मंदिराच्या गाभाऱ्यात अेका बाजूला जगन्नाथपुरीची प्रसिद्ध त्रिमूर्ती (कृष्ण, बलराम व सुभद्रा) आहे. तर दुसऱ्या बाजूला कृष्ण व बलराम यांच्या मूर्ती आहेत. मध्यभागी मुख्य मूर्ती—राधा-कृष्णाच्या आहेत. सर्वच मूर्ती मोहक आहेत. देवाच्या जोडीने राजांच्याही मूर्ती विराजमान आहेत. राजवाड्यातील मंदिर असल्यामुळे तसे असणे स्वाभाविक समजता येअील.

आरतीपूर्वी भक्तगण अंगणामध्ये समोरासमोर दोन रांगा करून, गुडघे टेकून बसतात. हे दृश्य नवे होते. तोंडाने देवाचे नामस्मरण चालूच असते. आरती सुरू होताच सगळे देवाकडे तोंड फिरवून हातातील झांजा व घंटा वाजवितात. कोल्हापूरला अंबाबाअीच्या देवळात जशी अेक प्रचंड घंटा आहे तशीच अेक घंटा येथे टॉवरवर आहे. आरती सुरू झाली की दोरी ओढून ती घाट वाजविली जाते. तिचा गंभीर आवाज वतावरणात बराच वेळ घुमत राहतो.

पोलोची जन्मभूमी

राजवाड्याबाहेरील मैदानात बरेच लोक जमले होते. घोडीतट्टेही दिसत होती. म्हणून निर्मलबाबू म्हणाले, "हे लोक बहुधा पोलो पाहायला जमले असावेत. पोलो हा खेळ मूळचा मणिपूरचा. अिथून तो जगभर पसरला. ज्यांना हा परवडत नाही ते हॉकी खेळतात. अिथली हॉकीही जरा वेगळीच आहे. तिला फ्रीस्टाअिल हॉकी म्हणतात. भरपूर व्यायाम होतो तिच्यात." मी पोलो पाहायला अुत्सुक होतो. परंतु ती तट्टे रेसची निघाली. गावठी रेसचा जुगार थोडचाच वेळात सुरू झाला, आणि आम्ही हिरमुसले होत्साते तेथून काढता पाय घेतला.

साहित्यिकांच्या मेळाव्यात

सायंकाळी येथील व्हिक्टोरिया क्लबात स्थानिक साहित्यिकांना भेटण्याचा कार्यक्रम योजण्यात आला होता. १९०४ साली स्थापन झालेला हा क्लब म्हणजे अेक प्रतिष्ठित संस्था आहे. परंतु जमलेल्या लोकांत बंगाली मंडळीच जास्त होती, त्यामुळे माझा थोडा विरस झाला. सुदैवाने प्रा. नीलकांत सिंह आले होते. म्हणून मी माझे लक्ष त्यांच्यावरच केंद्रित केले आणि त्यांच्याकडून मणिपुरी साहित्याची अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला, मणिपुरी भाषेत आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या आधुनिक पुस्तकांची संख्या सुमारे १ हजार आहे. सुमारे १०० जुनी पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत. सरकारी मदतीने प्राचीन मणिपुरी साहित्य प्रकाशित करण्याचे कार्य मणिपुरी साहित्यपरिषदेने सुरू केलेले असून, अजून सुमारे ९०० हस्तलिखिते प्रकाशित व्हावयाची आहेत. मणिपुरी भाषेला घटनेच्या आठव्या अनुसूचीत स्थान मिळवून देण्याची चळवळही परिषदेने हाती घेतली आहे.

"अितक्या लहान भाषेचा आठव्या अनुसूचीत समावेश केला जाअील असे तुम्हांला कसे वाटते ?" मी विचारले.

"त्यात काय हरकत आहे ? सिंधीचा समावेश नुकताच करण्यात आलेला नाही काय ? शिवाय आमची भाषा संख्येच्या दृष्टीने लहान असली तरी गुणवत्तेच्या दृष्टीने कोणत्याही प्रगत भाषेहून कमी नाही," असे श्री सिंह म्हणाले.

प्रकाशित पुस्तकांच्या बाह्यांगावरून मणिपुरी पुस्तके बंगालीच्या तोडीची आहेत, हे मान्यच करावे लागते. (कारण त्यांची छपाअी वगैरे कलकत्त्यालाच होते) परंतु अंतरंगाच्या बाबतीत मणिपुरी भाषिकांच्या अभिप्रायावरच विसंबून राहावे लागणार. मणिपुरीची आजची लिपी बंगाली असली तरी ती भाषा सर्वस्वी भिन्न आहे. माचा–मुलगा; नुमित्–सूर्य किंवा दिवस; लैपाक–पृथ्वी; पुक्नि–मन; शामु–हत्ती; शगोन–घोडा; युम–घर; चाक–भात; अिशिङ अिचेल–पाण्याचा प्रवाह; लासिंग–कापूस; सक्येनमिनसेन–आरसा; योंग–माकड; हुअी–कुत्रा; मिरोनबा–गरोदर वगैरे शब्दांवरून हे सहज लक्षात येअील. (अितर भारतीय भाषांपेक्षा

मणिपुरीचे अेक अगदी वेगळे वैशिष्टय म्हणजे 'ङ' या व्यंजनाचा त्या भाषेत होणारा सर्रास वापर. शब्दांच्या मध्येतर 'ङ' येतोच; पण सुरवातीलाही येतो. अुदाहरणार्थ, ङसि–आज; ङरॉं–काल; ङन्ना–लौकर वगैरे. मणिपुरी लोकांची नावेही सर्वसामान्य भारतीय नावांहून वेगळी असतात. अुदाहरणार्थ, लैरेनमायुम; अिबूनगोहाल; मोअिरांग; हुअिदरोम; ङाङबा; चिङताङ वगैरे.)

नियतकालिकांचा संसार

मणिपुरी भाषेत अेकही मासिक नाही. 'कल्चरल फोरम फॉर मणिपूर' या संस्थेतर्फे निघणारे 'ऋतु' हे द्वैमासिक, मणिपुरी साहित्य-परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र 'साहित्य' (या परिषदेचे अेकूण सभासद २०० असून तिच्या ५–६ शाखा आहेत) आणि साहित्यप्रेमी समितीतर्फे प्रकाशित होणारे त्रैमासिक 'वखल' (विचार) हीच काय ती नियतकालिके. मात्र गमतीची गोष्ट अशी, की अेकट्या अिम्फाल शहरात (अिंग्रजी 'दि मणिपूर टाअिम्स' या दैनिकाव्यतिरिक्त) मणिपुरी भाषेत पाच दैनिके प्रकाशित होत असतात. सव्वा कोटी लोकसंख्या असलेल्या असममध्ये फक्त दोन असमीया दैनिके प्रसिद्ध होतात, तर ७–८ लाख लोकसंख्या असलेल्या मणिपूरमध्ये देशी भाषेत पाच दैनिके प्रसिद्ध होतात, हे अैकून मला आश्चर्य वाटले. अर्थात प्रत्यक्ष ती दैनिके पाहिल्यानंतर ते आश्चर्य ओसरले. पुण्याच्या 'पूना डेली न्यूज' किंवा 'डेक्कन हेरल्ड' च्या आकाराची २ किंवा ४ पाने असतात. त्यांतील निम्मी जागा जाहिरातींनी व्यापलेली असते. मुख्यत: सरकारी टेंडरांच्या वगैरे जाहिरातींवरच ती जगतात. टेलिप्रिंटरची व्यवस्था नसल्यामुळे बहुधा रेडियोवरील बातम्याच या दैनिकांत येतात. ग्रामीण भागातले लोक ही दैनिके वाचीत नसतात. म्हणजे अिंफालच्या ६०–७० हजार लोकांसाठीच ती आहेत. पुण्या-मुंबअीत लंगोटीवजा जी सायंदैनिके निघतात त्यांच्याशी यांची तुलना होअू शकेल. ज्याचा छापखाना असेल त्याने दैनिक काढावे, असा येथील संकेत आहे. यांपैकी 'खोल्लाओ' (आरोळी) या कम्युनिस्ट पत्राचा खप सर्वांत अधिक म्हणजे २ हजार आहे. अितर पत्रांचा खप १ हजाराच्या आसपास आहे. यांपैकी 'सीमांत पत्रिका' हे काँग्रेसचे मुखपत्र असून 'प्रजातंत्र' हे काँग्रेसचे समर्थक आहे. 'अनौब समाज' (नवा समाज) हे संयुक्त समाजवाद्यांचे पत्र असून 'ङसि' (आज) हे अपक्ष दैनिक आहे.

करीमगंज
१२–२–६८

'कशाला अुद्याची बात?'

सकाळी ९ ला अिंडियन अेअर लाअिन्सच्या अिम्फालच्या शहर कचेरीत आलो. श्री. निर्मलेंदू दास यांच्या घरापासून कचेरी अगदी जवळ होती. सामानाचे वजन करण्यात आले. २० किलोपर्यंत वजनाचे सामान जास्त भाडे न भरता बरोबर नेता

येते. माझे सामान २८ किलो भरले. (तरी मी बरोबरच्या पुस्तकांचा भला मोठा गठ्ठा गुवाहाटीला श्री. चुनीभाअींकडे ठेवून तो पोस्टाने पुण्याला पाठवून देण्यास सांगून आलो होतो !) मला वाटले, आता चांगलाच भुर्दंड भरावा लागणार. परंतु फक्त २ रु. भरावे लागले ! मी अेका बाजूने सुटकेचा निःश्वास टाकला, तर दुसऱ्या बाजूने थोडा हिरमुसलो. "काय ही भिकारडी विमानकंपनी ! अेवढे पैसे तर आम्ही पुण्या-मुंबअीच्या स्टेशनवर हमालाला देतो !" अर्थात जी विमानकंपनी अिम्फाल ते सिल्चर या अर्ध्या तासाच्या विमान-प्रवासाचे फक्त २३ रुपये भाडे घेते, तिने ८ किलो जादा वजनाबद्दल २ रुपये घेतले तर ते योग्यच समजले पाहिजे. शहरापासून विमानतळ ४–५ मैल दूर होता. विमानकंपनीच्या बसमधून विमानतळावर आलो.

कलकत्त्याहून येणाऱ्या विमानातून येणार असलेल्या आपल्या पत्नीला अुतरून घेण्यासाठी आलेले अिम्फालचे क्युरेटर विमानतळावर ओळखीचे झाले. (बंगाली लोकांशी ओळख व्हायला मला कधी फार वेळ लागत नाहीच.) मणिपुरी लोकांसंबंधी त्यांचा अभिप्राय मला मोठा अुद्बोधक वाटला. ते म्हणाले, "मणिपुरी माणूस हा फक्त आजचा विचार करतो. 'आता कशाला अुद्याची बात ?' ही त्याची वृत्ती ! हातात पैसा आला की तो अुधळून मोकळा. जिवाची चैन करावी, अेवढेच त्याचे ध्येय. मणिपुरी पुरुष आळशी समजले जातात. परंतु वेळ पडल्यास ते अंग मोडून भरपूर मेहनतही करू शकतात. अत्यंत स्वाभिमानी लोकांत त्यांची गणना होते. पंजाबी, सिंधी किंवा असमीया लोकांप्रमाणे मणिपुरी माणूसही कधी भीक मागणार नाही. स्वाभिमानाचे मोल त्याला अेवढे अधिक वाटते, की भीक मागण्याअैवजी मरून जाणे तो जास्त पसंत करील. शौर्याच्या बाबतीतही मणिपुरी माणसाचा हात धरणारे फार थोडे निघतील. अिम्फालमध्ये तुम्ही थंगल बाजार व पाओना बाजार पाहिले असतील. थंगल आणि पाओना, हे मणिपूरच्या १८९१ च्या शेवटच्या स्वातंत्र्ययुद्धातले शूर सेनापती. त्यांच्याबद्दल आजही मणिपुरी लोकांना फार आदर वाटतो. असे अनेक शूर पुरुष मणिपूरच्या अितिहासात होअून गेले आहेत. मात्र त्यामानाने अैतिहासिक अवशेष या प्रांतात फारसे आढळत नाहीत.

"अर्थात भारतातल्या अितर प्रांतीयांप्रमाणे मणिपुरी लोकांमध्येही संकुचित प्रांतीयता आहेच. आमच्यासारख्या परप्रांतीयांना व विशेषतः सिलहटच्या बंगाली लोकांना ते तुच्छतेने 'मयांग' म्हणजे अुपरे म्हणतात. तसेच डोंगरी लोकांशीही त्यांची वागणूक फार तुच्छतेची असे. त्यांना ते 'हाओ' म्हणतात. माओ, नगा, कुकी वगैरे डोंगरी लोक आता शिकूनसवरून शहाणे झाले आहेत. त्यांना मैतेअि (मणिपुरी) लोकांची ही दादागिरी सहन होत नाही. ते त्यांच्यापासून फुटून निघण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु मैतेअि लोकांना अजून आपल्या वागणुकीतील चूक कळून येत नाही. नुकतीच घडलेली अेक गोष्ट सांगतो तुम्हांला. काही मैतेअि पंडितांबरोबर मी चाललो होतो. आमच्या गाडीचा ड्रायव्हर नगा होता. दुसरा अेक

नगा आमच्याबरोबर होता. त्याच्याशी ड्रायव्हर नगा आपल्या भाषेत बोलू लागला त्याबरोबर मैतेअि पंडितांचे माथे भडकले. ते म्हणाले, "ही कसली जंगली भाषा बोलता तुम्ही? आम्हांला ती समजत नाही ना!" यावर नगा ड्रायव्हर शांतपणे म्हणाला, "हे बंगाली साहेब तुमच्याबरोबर आहेत. त्यांना तुमची भाषा कळत नाही. म्हणून तुम्ही ती बोलायची सोडता का?" अितका धीटपणा डोंगरी लोकांत आला आहे. मणिपुरी लोकांनी आपली जुनाट संकुचित दृष्टी सोडली नाही तर त्यांची धडगत नाही."

दुसरे अेक गृहस्थ म्हणाले, "मणिपूरला केंद्रीय सरकारकडून भरमसाट पैसा मिळतो. दुसऱ्या महायुद्धात बाँबिंगमुळे मणिपूरच्या लोकांचे जे नुकसान झाले त्याची भरपाओी म्हणूनही त्यांना भरपूर पैसा मिळालेला आहे. या आयत्या पैशामुळे त्यांच्यात फार भ्रष्टाचार माजला आहे. विलासी जीवनाची चटक त्यांना लागली आहे. त्यातून त्यांना बाहेर काढावे लागेल. त्यासाठी त्यांना केंद्रशासित न ठेवता शेजारच्या प्रांतात विलीन करावे लागेल."

विमानाचा चित्तथरारक अनुभव

कलकत्त्याहून येणारे डाकोटा विमान वेळेवर म्हणजे सव्वादहाला आले पंधरा मिनिटांत अुतारू व सामान अुतरले आणि आम्ही त्यात बसलो. साडेदहाला विमानाने जमीन सोडली. डाकोटा म्हणजे अेस्. टी. ची बस. २०–२२ अुतारू असतात. मी आजूबाजूला नजर टाकली. सामान्य गलिच्छ मजूर, त्यांच्या अडाणी बायका, शेंबडी-लेंबडी पोरे यांचीच संख्या जास्त होती. ते दृश्य पाहिल्यानंतर आपण विमानातून जाणार असल्याचा गर्व गळून पडला. अर्थात ज्या कारणासाठी मी विमानाने सिल्चरला चाललो होतो त्याच कारणासाठी ही जनताही 'अिमाना'तून चालली होती. अिम्फालहून सिल्चरला जाणारा रस्ता मिझो हिल्समधून जातो. तो अजून तयार झालेला नाही. जेमतेम जीपगाड्या जातात. या भागाकडे केंद्र सरकारचे किती दुर्लक्ष आहे, याचे हे अेक दृश्य अुदाहरणच आहे. त्यामुळे विमान टाळून जावयाचे तर कोहिमा, डिमापूर, लामडिंग या मार्गाने जावे लागते. हा मार्ग फार लांबचा. मिझो टेकड्यांना वळसा घालून जाणारा. २–३ दिवस लागतात, शिवाय खर्चही जवळजवळ तेवढाच येतो. म्हणून सर्वसामान्य लोकही विमानाने प्रवास करतात.

मी प्रथमच विमानात बसत होतो. त्याच्या कर्कश आवाजाने कानात दडे बसत होते. कापसाचे बोळे कानांत कोंबूनही काही अुपयोग झाला नाही. विमान जसजसे वर चढू लागले तसतशी गंमत वाटू लागली. सुदैवाने खिडकीजवळची जागा मिळाली होती. यामुळे खालचे दृश्य पाहता आले. शेते गालिच्याप्रमाणे आखल्यासारखी दिसत होती. कमी अुंचीवरून गुरेमाणसेही खेळण्यांसारखी दिसत होती. अेकामागून अेक डोंगर पार करीत विमान वेगाने चालले होते. अेकदोनदा ढगही खालून पळाले. त्यावरून विमानाच्या वेगाची कल्पना आली. अेके ठिकाणी डोंगरमाथ्यावर सर्वोच्च

ठिकाणी वसलेले अेक टुमदार गाव दिसले. अेक नदी नालाच्या आकारात डोंगरावर चढून खाली अुतरल्यासारखी दिसली. सगळे डोंगर हिरवेगार. यामुळे डोळ्यांना सुख होत होते. मध्येच विमान थांबल्याचा भास झाला. मनात विचार आला, विमानात काही बिघाड तर झाला नसेल ? कालच्याच वृत्तपत्रात अेक विमान बेपत्ता झाल्याची बातमी वाचली होती. अल अिटालियासारख्या प्रचंड विमान-अपघातांच्या स्मृतीही जाग्या झाल्या आणि क्षणभर जिवाचा थरकाप झाला. परंतु दुसऱ्याच क्षणी विमानाचा वेग जाणवला आणि भीती नाहीशी झाली.

बंगाली पाहुणचाराचा अत्याचार

विमान ११ वाजता सिल्चरच्या विमानतळावर अुतरले. तेथे सामान वगैरे मिळून बसमध्ये बसेपर्यंत अर्धा तास मोडला. विमानतळापासून सिल्चर शहर १८ मैल. तेथे पोचावयास १२–३० वाजले. शहर-कचेरीमध्ये करीमगंजच्या रवींद्रसदन गर्ल्स कॉलेजमधील अितिहासाचे प्राध्यापक श्री. सुजित चौधरी व श्री. वाणीप्रसन्न मिश्रांचा धाकटा भाअू पार्थसारथी जीप घेअून आले होते. त्यांच्याबरोबर जिल्हा कॉंग्रेसचे अेक महत्त्वाचे कार्यकर्ते श्री. नृपतिरंजन चौधरी हेही होते. वस्तुत: आम्हांला श्री. मिश्र यांच्या बराअीग्राम या गावी जेवावयास जावयाचे होते. सिल्चरहून करीमगंज ३२ मैल व तेथून बराअीग्राम १५ मैल. म्हणून ताबडतोब निघावे, असे मी सुचविले. परंतु आता मी बंगाली यजमानांच्या तावडीत सापडलो होतो. बंगाली माणसाचे प्रेम व आतिथ्य तुम्हांला अगदी गुदमरवून, घुसमटून टाकते. प्रा. सुजितबाबू मला घेअून प्रा. बिजितकुमार चौधरी या आपल्या वडील बंधूंच्या घरी गेले. तेही सिल्चरच्या गुरुचरण कॉलेजात अितिहासाचे प्राध्यापक आहेत. ते गावी नव्हते. त्यांच्या पत्नीने 'जलपान' करून जाण्याचा आग्रह केला. या जलपानासाठी सुजितबाबूंच्या वहिनींनी अितक्या प्रकारची बंगाली मिठाअी माझ्यासमोर ठेवली की मी दडपूनच गेलो. अर्थात अेकीकडे तोंडाला पाणी सुटत होते, आणि दुसरीकडे अुशीर होअील म्हणून भीती वाटत होती. मी थोडीफार मिठाअी अुदरस्थ केल्यानंतर अुठण्याचा प्रयत्न केला. परंतु समोरची प्लेट संपूर्ण रिकामी झाल्याशिवाय मला अुठू द्यावयाचे नाही, असा सुजितनी व त्यांच्या वहिनींनी चंगच बांधला होता. अखेर जेव्हा आम्ही तो कार्यक्रम संपवून तेथून निघालो, तेव्हा भरगच्च जेवण झाल्यासारखी माझ्या पोटाला तडस लागली होती; आणि या घोळात अर्धा पाअूण तास निघून गेला होता.

पूर्व पाकिस्तानची झलक

करीमगंजजवळून कुशियारा नावाची लहानशी नदी वाहते. तिचे पात्र ही भारत-पाकिस्तानची सरहद्द. काठाकाठानेच आमची जीप चालली होती. त्यामुळे पलीकडच्या काठावरील भातशेती, सुपारीच्या बागा व शेतात काम करणारी पाकिस्तानी माणसे दिसत होती. वाटेत अेक ठिकाणी महाराष्ट्र राखीव पोलिसांची किंवा

मराठा बटॅलियनची छावणी दिसली. थोडा वेळ असता तर छावणीत डोकावून आलो असतो. परंतु बराअीग्रामला पोचण्याची घाअी होती. हिंद-पाकमधील घुसखोरी व चोरटा व्यापार यांना आळा घालण्यासाठी जागजागी अशी ठाणी अुभारलेली आहेत परंतु घुसखोरीला किंवा चोरट्या व्यापाराला मुळीच आळा बसलेला नाही. कारण ही फाळणीच मुळी कृत्रिम पायावर आधारलेली आहे. काही ठिकाणी घराचा सोपा पाकिस्तानात आणि स्वयंपाकघर हिंदुस्तानात अशी फाळणी केलेली आहे. सीमारेषा आखताना मानवी मनाचा, जीवनाचा किंवा सोयीगैरसोयींचा जणू विचारच करण्यात आलेला नसावा.

फर्मास वक्तृत्वाचा अेक नमुना

करीमगंजमार्गे बराअीग्रामला पोचेपर्यंत ३ वाजले. 'हुश्श !' म्हणून मी सुटकेचा निःश्वास टाकला. थोडा वेळ विश्रांती घेता येअील अशी आशा वाटत होती. परंतु दुर्दैवाने पुन्हा बंगाल्यांचे आतिथ्य आडवे आले. श्री. वाणीप्रसन्न यांचे वडील श्री. प्रबोधचंद्र मिश्र हे ज्या हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत त्या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. दिनमणी नाथ या गृहस्थांना वाटले, अितक्या दुरून महाराष्ट्राचा अेक सुपुत्र (!) आपल्या गावात येतो आहे, तेव्हा त्याचे जंगी स्वागत आपण केले नाही तर आपल्या बंगालीपणाला बट्टा लागेल. त्यांनी शाळेच्या व गावाच्या वतीने जंगी स्वागतसमारंभ योजलेला होता. (सुदैव अेवढेच की झांजा-मृदंगांच्या गजरात गावातून माझी मिरवणूक काढण्याची दुर्बुद्धी त्यांना झाली नाही !) हा काछार जिल्हा असममध्ये असला तरी त्याचा भाषिक व सांस्कृतिक दृष्टचा असमशी काही संबंध नाही. हा पूर्णपणे बंगाली भाषी जिल्हा आहे. बंगाली संस्कृतीचे जणू अेक बेटच ! स्वागतगीत झोकात झाले पाहिजे, त्याकरिता विद्यार्थ्यांवर विसंबण्यात अर्थ नाही, या प्रामाणिक समजुतीने मुख्याध्यापक महाशयांनी स्वतःच स्वागतगीत गायला सुरुवात केली. नाथ संप्रदायी (कानफाटे) असल्यामुळे गाण्याची सवय त्यांना असावी. आवाजही वाअीट नव्हता. पण काही केल्या त्या गीताचा शेवट होअीना. संपूर्ण वंदेमातरम्च्या दुप्पट-तिप्पट मोठे गीत होते ते. माझा जीव खालवर होअू लागला. तरीपण मी मनाची समजूत घातली की स्वागतगीत व स्वागतभाषण असे दोन भाग न करिता गीतावरच भागवितील. म्हणून त्यांचे स्वागतगीत संपले, की आपण आपले भाषण कसे सुरू करावयाचे याचा आराखडा मी मनाशी आखू लागलो परंतु हाय दैवा! श्री. नाथ यांनी स्वागतगीत संपविले आणि स्वागतपर भाषणाला सुरुवात केली ! मी ठार होअून खुर्चीत कोसळलो. बंगालचा अितिहास, परंपरा, चैतन्य महाप्रभूंपासून स्वामी विवेकानंदांपर्यंत साधुसंत, राजा राममोहन रॉय, बंकिमबाबू, शरदबाबू, रवींद्रनाथ, सुभाषबाबू वगैरे आधुनिक महापुरुष वगैरेंचे साग्रसंगीत वर्णन देअून त्यांनी आपला सोनार बाँगला आणि बंगाली (भाषा व लोक) हे किती श्रेष्ठ आहेत ते जणू मला पटवून देण्याचा प्रयत्न चालविला. मला वाटले, मध्येच अुठावे आणि त्यांना सांगावे, "मोशाय, तुमची सारी विधाने मला अेकदम मान्य आहेत. मी शरणागती पत्करतो. पुढे बोला." पण सौजन्य व

शिष्टाचाराच्या दडपणामुळे मी गप्प बसून राहिलो. नाथांनी माझा व अितर श्रोत्यांचा (बिचाऱ्या विद्यार्थ्यांसह!) अंत पाहण्याचा निश्चय केलेला असावा. बंगालचे गुणगान करून झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राचे गुणवर्णन करायला सुरुवात केली. हरे राम! म्हणजे पुन्हा शिवाजी आणि टिळक! महाराष्ट्रापासून शेकडो मैल दूर आल्यानंतरही शिवाजी व टिळक माझी पाठ सोडायला तयार नव्हते. अेरवी अितके पूज्य व आदरणीय वाटणारे हे महापुरुष आज मात्र मला अगदी काळपुरुष वाटले. मनात विचार आला, शिवाजी आणि टिळक महाराष्ट्रात जन्माला येण्याअैवजी कर्नाटक-तामिळनाडात जन्माला आले असते तर बरे झाले असते. निदान नाथांचे प्रवचन तरी लौकर आटोपले असते.पण तसे व्हायचे नव्हते. 'अशा या थोर महाराष्ट्राचे, अेवढा हा महान बंगाल प्रेमाने स्वागत करीत आहे!'– असे म्हणून नाथांनी जेव्हा व्याख्यान संपविले तेव्हा मी खरोखरीच सुटकेचा निःश्वास टाकला.

अर्थात नाथांचे वक्तृत्व मात्र झकास होते. भाषेवर प्रभुत्वही अुत्कृष्ट होते. वाणीत ओज व प्रवाह होता. त्यामुळे अेखाद्या कसलेल्या गवयाच्या रागदारी संगीतासारखे ते भारदस्त व कर्णमधुर वाटत होते. सायंकाळच्या कार्यक्रमाचा लकडा मागे नसता तर मी मोठ्या तन्मयतेने त्याचा रसास्वाद घेतला असता. पण दिवस मावळण्यापूर्वी मला करीमगंजला पोचावयाचे होते. त्यामुळे आतल्या आंत चुळबुळ करीत राहिलो.

अेवढ्या भारदस्त स्वागताला मी अुत्तरही तेवढेच भारदस्त द्यावयास हवे होते ; परंतु मी त्या मनःस्थितीत नव्हतो. मी साने गुरुजींची आंतरभारतीची कल्पना थोडक्यात समजावून दिली; आणि बरोबर घेतलेली माझी 'रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र' 'मुलांचे रवींद्रनाथ', 'काजी नजरुल अिस्लाम' वगैरे पुस्तके श्रोत्यांना दाखवून बंगालची ओळख महाराष्ट्राला करून देण्यासाठी आम्ही लोक काय करीत आहोत त्याचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना घडविले, आणि बंगाली मित्रांनीही बंगाली भाषिकांना महाराष्ट्राची ओळख करून देण्याची खटपट करावी, अशी सूचना केली.

चार वाजून गेले होते. मला शाळेतल्या या स्वागत-कार्यक्रमापेक्षा वाणीच्या घरी जाअून त्याच्या आअीला, आजीला भेटण्याची व वाणीची खुशाली त्यांना सांगण्याची जास्त अुत्सुकता होती. येथील घरे कोकणातल्या घरांसारखी अेकमेकांपासून दूर, शेतात आहेत. श्री. प्रबोधचंद्र मिश्र यांनी नुकतेच घर बांधले आहे. मध्ये स्वच्छ अंगण आणि भोवती झोपडीवजा खोल्या. अेका बाजूला गोपाळकृष्णाचे सुरेख देअूळ. पण ते देअूळ म्हणून नव्हे तर घरातलेच देवघर म्हणून. मागील बाजूला पुकुर (लहानसे तळे). जेवण आमची वाट पाहात होते. वाणीने त्यासंबंधी सविस्तर सूचना पत्राने कळविल्या होत्या. प्रबोधबाबूंचा आनंद त्यांच्या मनात मावत नव्हता. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावरून व बोलण्यातील धांदलीतून तो व्यक्त होत होता. आग्रह करकरून ते स्वतः वाढत होते, अितरांना वाढायला सांगत होते. वाणीची आअी, आजी, बहीण सगळ्याच प्रेमाने वाढत होत्या. –जणू त्यांचा वाणीच फारा दिवसांनी घरी परतला होता. त्यांच्या त्या स्नेहाच्या अभिव्यक्तीने मला गुदमरल्यासारखे होत होते.

जेवण संपविले. विडा घेतला आणि निघालो. वाणीच्या आजीला व आओला मी वाकून प्रणाम केला. कुठली कोण माणसे ! ना ओळख ना पाळख! पण त्यांचा निरोप घेताना माझे अंत:करण भरून आले. डोळे डबडबले. माझ्यासारख्या भटक्याच्या जीवनात हा अनुभव अगदीच नवा नसला, तरी स्नेहबंधनाची अितकी तीव्रता क्वचितच जाणवते. लहानपणी अुन्हाळ्याच्या सुटीनंतर आओवडिलांना सोडून पुण्याला येताना हृदयात जसे कालवल्यासारखे होओ तसाच काहीसा अनुभव अितक्या वर्षांनी पुन्हा अेकदा या परक्या प्रदेशात आला.

पाच वाजून गेले होते. अंधार पडू लागला होता. येथे (करीमगंजला) सुजितबाबूंनी अेक छोटीशी अनौपचारिक सभा आयोजित केलेली होती. म्हणून मला जाण्याची घाओ होती. परंतु जीपचे मालक श्री. परेशचंद्र दे यांनी जवळजवळ जबरदस्तीने ओढूनच आपल्या दुकानी नेले आणि 'मिष्टी' (मिठाओ) खाअू घातली. माझ्या पोटात तर मुळीच जागा नव्हती. पण त्यांना वाओट वाटू नये म्हणून अेक-दोन रसगुल्ले कसेबसे घशाखाली घातले. माझ्या पोटाची मलाच कीव येत होती. पण नाअिलाज होता.

६–३०ला येथे (चित्तरंजन गल्लीतील श्री. सुजित चौधरींच्या घरी) पोचलो. 'हुश्श !' करीत मी खुर्चीत कोसळलो. पोटाला तडस लागलेली होती. मला जरा पाय लांब करून ताणून देता आले असते तर बरे झाले असते. पण अजून भोग संपलेला नव्हता. (अुत्तर भारतात देवाच्या नैवेद्याला 'भोग' का म्हणतात ते आज कळले !)

मी जरा टेकतो न टेकतो तोच बंगाली 'मिष्टी'ची थाळी समोर आली. आता मात्र मी चांगलाच हादरलो. या मिष्टीमुळे या लोकांना माझी अंत्येष्टी या ठिकाणी करावी लागणार असे मला दिसू लागले. 'दूरदेशी' राहिलेल्या बायकोपोरांचे दीनवाणे चेहरे माझ्या डोळ्यांसमोर आले. काही झाले तरी या मिठाओतल्या अेकाही वस्तूला हात लावायचा नाही, असा मी मनोमन निर्धार केला. परंतु सुजितबाबूंचे पिताजी श्री. विधुभूषण चौधरी यांनी अितक्या आर्जवी स्वरात व खानदानी ढंगात आग्रह केला, की त्यांचा शब्द मोडण्यापेक्षा आपल्या जिवाचे बरेवाओट होअू देणे अधिक बरे असे मला वाटले. थोडी रसमलाओ त्यांच्यासाठी खाल्ली.

साहित्यिकांशी चर्चा

सायंकाळी भारतीय संस्कृती संसद या संस्थेतर्फे पौरसभेच्या सभागृहात निमंत्रित साहित्यिकांशी चर्चेचा कार्यक्रम झाला. या गावात बरेच साहित्यिक असावेत असे दिसते. प्राध्यापक सुजित चौधरी, प्राध्यापिका रुचिरा श्याम, श्री. प्रसेनजित चक्रवर्ती, श्री. जन्मजित राय, श्री. मिहिर पुरकायस्थ वगैरे प्रमुख मंडळी अुपस्थित होती. मराठी माणसाप्रमाणे बंगाली माणसालाही साहित्याचे भलतेच वेड. मराठी माणूस पुस्तके विकत घेत नाही आणि बंगाली घेतो अेवढाच फरक. त्यामुळे या लहानशा गावातही अनेक लहानमोठी साहित्यिक नियतकालिके प्रकाशित होत असतात. 'कुशियारा', 'आगामी', 'शताब्दी' वगैरे. मराठी साहित्याच्या गतिविधीसंबंधी,

त्यांनी प्रश्न विचारले. मी त्यांच्याकडून आधुनिक बंगाली कथा-कवितेची माहिती मिळविली. नेहमीप्रमाणे येथेही शिवसेनेसंबंधी मला प्रश्न विचारण्यात आले. अर्थात शिवसेना बंगाल्यांविरुद्ध काही करीत नाही, हे जाणून त्यांचा जीव भांड्यात पडला. मी माझ्या पोतडीतील टागोर, नजरुलांची पुस्तके त्यांना दाखवून त्यांचा स्नेह मिळविण्याचा हुकमी अेक्का वापरावयास विसरलो नाही.

श्री. विधुबाबूंशी चर्चा

घरी परत आलो तर समोर जेवणाचे ताट वाढून तयार ! माझी कंबरच खचली. मी अगदी काकुळतीला येअून, गयावया करून मला भूक नसल्याचे परोपरीने पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण चुकून घरी आलेल्या अतिथीला अुपाशीपोटी (!) झोपू द्यायला विधुबाबूंचा गृहस्थधर्म तयार नव्हता. अखेर कसेबसे अन्न चिवडून मी थाळी दूर सारली. त्या वेळी माझ्यासमोर अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन आले असते, तर मी त्यांना सांगितले असते, " बाबा जॉनसना, अितके दिवस धान्य धाडलेस ते पुष्कळ झाले. या देशात किती विपुल अन्न आहे हे तुझ्याच डोळ्यांनी पाहा आणि यापुढे तो घोड्यांचा तोबरा आमच्याकडे पाठवायचे बंद कर ! "

जेवणानंतर विधुबाबूंशी काछारच्या प्रश्नासंबंधी चर्चा केली. 'युगशक्ती' या गेली अेकवीस वर्षे चालू असलेल्या बंगाली साप्ताहिकाचे ते संपादक आहेत. असममध्ये बंगाली भाषा व बंगाली लोक यांची कशी गळचेपी होत आहे ते त्यांनी सांगितले. असमची संघराज्य धर्तीवर पुनर्रचना व्हावी आणि काछारला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा किंवा काछारचा भाग केंद्रशासित ठेवावा, अशी मागणी काछारचे लोक का करीत आहेत ते त्यांनी समजावून सांगितले. म्हैसूर राज्यात बेळगावच्या लोकांचे जसे हाल होत आहेत, तसेच असममध्ये काछारच्या जनतेचे होत आहेत. हे दोन्ही लोक आपले स्वतंत्र अस्तित्व आपल्या राज्यात विलीन करायला तयार नाहीत, हे त्यांच्या दुःखाचे मूळ कारण. बेळगावचे लोक महाराष्ट्रात विलीन होण्याची मागणी करू शकतात. पण तशी संधी काछारी बंगाल्यांना अुपलब्ध नाही. फाळणीच्या वेळी आणि नंतरही भारतीय नेत्यांनी आपल्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले असल्याचे शल्य त्यांच्या मनात खूप खोलवर डाचत आहे.

कुंजबन टाअुनशिप
आगरतला (त्रिपुरा)
१३–२–६८

सर्वांत वाअीट व दगदगीचा प्रवास

पूर्वांचलाच्या सफरीतील आजचा दिवस प्रवासाच्या दृष्टीने सर्वात वाअीट व दगदगीचा ठरला. असममध्ये शिरताना आगगाडीच्या प्रवासाचा अत्यंत

वाईट अनुभव आला होता. आज असममधून बाहेर पडताना तितकाच वाईट अनुभव बरोबर घेऊन आलो.

करीमगंज ते आगरतला हे अंतर १७० मैलांचे. चांगली डांबरी सडक आता झालेली आहे. परंतु या मार्गावरून या दोन शहरांना जोडणारी फक्त अेक बस सबंध दिवसात जाते व येते. म्हणजे अेक करीमगंजहून आगरतल्याला जाते व अेक आगरतल्या-'न करीमगंजला येते. खासगी सर्व्हिस. आपल्याकडे अेस्. टी. सुरू होण्यापूर्वी जशा हहाफटनी' गाड्या धावत होत्या तशा प्रकारची अत्यंत जुनाट, डबडी गाडी. तिचे नाव मात्र 'राजहंस.' गाडीच्या मालकांची नावेही सफाअीदार अक्षरात गाडीच्या आतील भागात अिंग्रजीत लिहिलेली. (जी. सी. साहा व अुषारानी देव).

गाडी सकाळी ६–४५ ला सुटली. चुराअिबाडीपर्यंतचे २५–३० मैलांचे अंतर तिने अेका तासात काटले. मी मनात हिशेब करू लागलो. या वेगाने आपण गेलो तर निदान ३ वाजेपर्यंत तरी नक्कीच आगरतल्याला जाअून पोचू. म्हणजे निम्मा दिवस सार्थकी लागेल. पण कसचे काय आणि कुठले काय ! गाडी जसजशी पुढे जाअू लागली तसतसा तिचा वेग मंदावू लागला. वाटेत भेटणारा अेकही 'पासिंजर' हातचा सोडायचा नाही, हे ड्रायव्हरचे ब्रीद. २५ लोकांच्या त्या डब्यात ५०–६० लोक तो लीलया कोंबत होता. मोठा हसतमुख. परंतु भयंकर लोभी. जुन्या काळच्या 'लिप्पाणी-मुरगूड' फाट्यावरच्या हालसू बारदेस्करासारखा. सर्वांचे मन राखण्याची धडपड करणारा. परंतु त्यामुळे गाडीत बसलेल्या आम्हा लोकांची मात्र भयंकर कुचंबणा होत होती. महाराष्ट्रात अेस्. टी. मुळे प्रवास किती सुखाचा झाला आहे याची चांगली कल्पना या प्रवासामध्ये मला आली. शिवाय जागजागी छोटे पूल बांधले जात होते. जुन्या लाकडी पुलांअैवजी नवे काँक्रीटचे पूल तयार होत होते. त्यामुळे वळणे घ्यावी लागत होती. अर्थात या सर्व कारणांनी मनात योजलेले वेळापत्रक पार अुलटेसुलटे झाले हे सांगणे नलगे ! त्रिपुराच्या दक्षिण टोकाला असलेल्या बिलोनिया या गावी स्थानिक कॉलेजात प्राध्यापक असलेले श्री. दक्षिणारंजन दास गाडीत होते. बहुधा सुशिक्षित म्हणता येतील असे तेवढेच गृहस्थ गाडीत असावेत. सुजितबाबूंनी करीम-गंजला त्यांची-माझी ओळख करून दिली होतीच. त्यामुळे तेवढेच वेळ जायला साधन झाले. त्यांचे बिऱ्हाड करीमगंजला आहे. कारण बिलोनियाला काहीच सोयी नाहीत. करीमगंजहून बिलोनियाला जायचे म्हणजे दोन दिवस मोडतात. यामुळे ते वैतागलेले दिसले. ते सांगत होते, "त्रिपुरामध्ये मुख्य व्यवसाय दोन– लाचलुचपत (करप्शन) आणि चोरटी आयात-निर्यात (स्मगलिंग). सारी श्रीमंती या दोन मार्गांनी आलेली. शिवाय केंद्रीय सरकार पाण्यासारखा पैसा ओतते आहे. जेमतेम १०–१२ लाख लोक-संख्या. हे लोक केंद्राकडून दरसाल ३०–४० कोटी रुपये मिळवितात आणि ते अुधळून टाकतात. फुकटचा पैसा. कुणीही कसाही अुधळावा. त्याकरिता मोठमोठ्या अधि-काराच्या बोगस जागा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. कार्यक्षमता काडीची नाही. जोपर्यंत स्वतःला लागणारा पैसा स्वतः निर्माण करण्याची जबाबदारी लोकांवर टाक-

ण्यात येत नाही तोपर्यंत हे असेच व्हायचे. मणिपूर आणि त्रिपुरा या राज्यांतील पैशाची अधळपट्टी पाहिली, की ही राज्ये शेजारच्या प्रदेशांत विलीन करण्याऐवजी केंद्रशासित ठेवण्यामध्ये सरकार भारतीय जनतेच्या पैशाची ही अशी नासाडी का करीत आहे तेच कळत नाही: दिल्लीतल्या राज्यकर्त्यांना किंवा खासदारांना हे कळत नसेल काय?"

"अहो, ते कळते म्हणूनच असे घडते. कारण तसेच घडत राहावे, अशी सर्वांची अिच्छा असणार. सर्वांचेच हितसंबंध या ना त्या मार्गाने या प्रकरणात गुंतलेले असणार. आता हेच पाहा ना! आपल्या बसचा ड्रायव्हर बेकायदा 'शिटा' भरून वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक पोलिसाची मूठ दावतो आहे. सरकारी बस-सर्व्हिस– अेस्. टी. सुरू झाली की ही वरची प्राप्ती संपली. तेव्हा अेस्. टी. कशी लांबणीवर पडेल हेच सर्वजण पाहणार नाहीत काय? ही लाच काही त्या पोलिसशिपायांच्याच खिशात राहणार नाही. ती थेट वरपर्यंत जाअून पोचणार आहे. बरे, तुमच्या आमच्यासारख्यांनी या बेकायदा अुतारू भरतीविरुद्ध किंवा पोलिसांना दिल्या जाणाऱ्या लाचेविरुद्ध आवाज अुठविला, तर तुमचा आमचा आवाज कायमचा बंद होण्याचीच शक्यता जास्त! तात्पर्य काय की हे असेच चालायचे!"

मुसलमानांच्या संख्येवर नियंत्रण

त्रिपुरा हे राज्य जवळजवळ संपूर्णतया पाकिस्तानी प्रदेशाने वेढलेले आहे. पाकिस्तानी रेल्वेचा मार्ग गळफासासारखा त्याच्या मानेभोवती आवळलेला आहे. (प्रत्यक्ष त्रिपुरामध्ये मात्र रेल्वे नसल्यासारखीच आहे. धर्मनगरपासून असमच्या काछार जिल्ह्यातील चुराअिबाडी स्टेशनापर्यंत झालेला सातआठ मैलांचा रेलमार्ग हा नाममात्रच म्हणावा लागेल.) अितके असूनही असमच्या मानाने त्रिपुरामध्ये मुसलमानांची संख्या फार कमी दिसते. अेकूण ११,४२,००५ लोकसंख्येपैकी हिंदू ८,६७,९९८ असून मुसलमान २,३०,००२ आहेत. १९५१ च्या खानेसुमारीनंतर मुसलमानांची संख्या १ लाखाने वाढली आहे तर हिंदूंची संख्या ४ लाखाने वाढली आहे. अर्थात पूर्व बंगालमधून आलेल्या हिंदू निर्वासितांमुळे ही संख्या वाढली आहे, हे अुघड आहे. याच काळात मुसलमानांचीही संख्या अशीच वाढू शकली असती. परंतु त्या वेळी श्री. रमण नावाचे अेक कार्यक्षम प्रशासक त्रिपुरामध्ये होते. त्यांनी घेतलेल्या खबरदारीमुळे पाकिस्तानी मुसलमान त्रिपुरामध्ये मोठ्या संख्येने घुसू शकले नाहीत. अर्थात श्री. रमण यांच्या या देशभक्तीचे प्रायश्चित्त त्यांना मिळालेच. त्यांच्यावर ठपका ठेवून त्यांना दिल्लीला परत बोलाविण्यात आले; आणि मग पाकिस्तानातून घुसणाऱ्या मुसलमान घुसखोरांचा मार्ग निष्कंटक झाला, असे सदर प्राध्यापकांकडून समजले. पाक घुसखोरांविरुद्ध योग्य ती खबरदारी घेण्यात आली नाही तर त्रिपुराचे पिकले फळ पूर्वपाकच्या घशात आपसुक पडल्याशिवाय राहणार नाही.

अुलटयांचा सामुदायिक कार्यक्रम

त्रिपुराचा बहुतेक भाग डोंगराळ व जंगलांनी व्यापलेला आहे. अुत्तरेपासून दक्षिणेपर्यंत थोडयाथोडया अंतरावर पूर्वपश्चिम (किंवा अधिक अचूक सांगावयाचे तर वायव्येकडून आग्नेयीकडे) प्रचंड पर्वतमाला आहेत. हे डोंगर दगडांचे नसून अत्यंत ठिसूळ मातीचे आहेत. थोडा जरी पाअूस पडला तरी कडे कोसळतात व वाहतूक बंद होते. रेल्वेच्या किंवा मोठया बसेसच्या हादऱ्यानेही ते कोसळतील म्हणून डोंगरातून रेल्वे काढता येत नाही किंवा सरकारी मालकीच्या मोठया बसेस चालविता येत नाहीत, असे समजले. या डोंगरांच्या ओळी ओलांडूनच आगरतल्यापर्यंत पोचावे लागते. दोन पर्वतरांगांच्या मध्ये जेवढा भाग येअील तेवढीच सपाटी. या १७० मैलांच्या रस्त्यावर नाव घेण्यासारखे मोठे असे गाव अेखादेच दिसले. जिकडे पाहावे तिकडे डोंगर आणि हिरवेगार जंगल. चुराअिबाडीनंतर पानीसागर व कुमारघाट येथे थोडा वेळ थांबून गाडी मनूला पोचली आणि तिने जेवणाची सुटी घेतली. मनू हे या रस्त्यावरील मध्यवर्ती ठिकाण. येथे तास-दीड तास गाडीने व लोकांनी आराम केला. कोहिमाच्या श्रीमती अमीनी चॅकोंनी दिलेल्या चपात्या माझ्या पिशवीत तशाच होत्या. थंडीचे दिवस असल्यामुळे ३–४ दिवसांनंतरही त्या फारशा बिघडलेल्या नव्हत्या. तूपसाखर चोपडलेला भाग तर छानच होता. आजचा दिवस मी त्या चपात्यांवर काढला; आणि अमीनी वहिनींना दुआ देत तृप्तीची ढेकर दिली.

दोलूबाडी (Dolabari) नंतर 'अठरा मुडा' (अठरा वळणे) हा २० मैल लांबीचा प्रचंड घाट सुरू झाला. दक्षिणकानडा जिल्ह्यातील आगुंबे, शिराडी, चारमाडी वगैरे भयंकर घाटांचे स्मरण मला झाले. तशीच किर्र झाडी आणि अवघड वळणे. ही वळणे नागमोडी व चक्राकार अशी दोन्ही प्रकारची आहेत. अेकामागून अेक डोंगर चढायचे आणि अुतरायचे. त्यामुळे चढअुताराचे गचके चांगलेच जाणवत होते. मध्यंतरी अेके ठिकाणी डोंगरातून झऱ्याचे पाणी रस्त्याच्या कडेला पडत होते. दयाळू ड्रायव्हराने तेथे गाडी थांबविली आणि सर्वांना सामुदायिकपणे ओकून घेण्याचा कार्यक्रम अुरकून घेण्याचे आवाहन केले. घाट सुरू होताच अुलटयाही चालू झालेल्या होत्याच. त्यामुळे बहुतेकांनी (व विशेषत: महिलांनी) त्याच्या आवाहानाला योग्य तो प्रतिसाद दिला आणि रस्त्याच्या कडेला बसून मनूमध्ये पोटात भरलेले अन्न-पाणी डोंगरातल्या धरतीमातेला अर्पण केले. ते भयंकर दृश्य पाहून मला मात्र मळमळायला लागले! अर्थात या अुलटया काही अेवढयावरच थांबावयाच्या नव्हत्या. यानंतर अजूनही घाट होतेच. म्हणून गाडीत अुलटी झाली तर तिची घाण सगळीकडे पसरू नये यासाठी अुलटीवाल्या लोकांना ड्रायव्हरने आधीच मातीचे किंवा रेतीचे ढीग स्वत:च्या पायाशी तयार ठेवण्याचा हुकूम दिला. पासिंजरांनीही तो अिमानेअितबारे अमलात आणला.

‘शीट’ हरवली !

सूर्य मावळतीला कलला होता आणि भारताच्या आर्थिक स्थितीसारखा तो झपाट्याने घसरगुंडीला लागला होता. अंधार पडण्यापूर्वी आगरतल्याला पोचण्याची आशा मी अेव्हाना सोडून दिली होती. मला वाटते, माझ्याखेरीज अितर कोणालाही लौकर पोचण्याची निकड नसावी. ड्रायव्हरपासून किन्नरापर्यंत सर्वच जण निश्चित दिसत होते. अितक्यात गाडीने अेक अुचकी दिली आणि फतकल मारली. गाडीच्या अेंजिनात काही बिघाड झाला होता. माझ्या तोंडचे पाणी पळाले. त्या निर्जन जंगलात राहण्याची भीती मला वाटत नव्हती. परंतु कलकत्त्याचे अुद्याच्या विमानाचे तिकीट वाया जाअील आणि मग कलकत्त्याहून मुंबअीचे रेल्वेचे तिकीट फुकट जाअील, या काळजीनें माझा जीव खालवर होअू लागला. क्लीनर सांगत होता, “ हे लीकेज असल्याचे ड्रायव्हरला माहीत होते. तरीही त्याने तिकडे दुर्लक्ष केले.” तरीपण तासाभरात सर्व काही ठीक झाले. ड्रायव्हर तसा हुशार. आगरतल्यापर्यंत आज आपण नक्की पोहोचू असे आश्वासन त्याने आम्हांला दिले. अर्थात त्याला यात नवीन काहीच नसणार !

गाडी चालू झाली. मैलभर गेलीही. अितक्यात ड्रायव्हरच्या लक्षात आले, की आपल्या शेजारी मुड्यावर बसलेली ‘शीट’ जाग्यावर नाही. गाडीच्या स्टार्टरशी झटापट करताना त्याचे धक्के त्या पॅसेंजरला बसत होते, आणि पॅसेंजरचा अडथळा ड्रायव्हरला होत होता. तो अडथळा न झाल्यामुळे त्याला काहीतरी चुकल्याचुकल्यासारखे वाटू लागले आणि अचानक त्याला त्या माणसाची आठवण झाली. त्याने गाडी थांबविली. मग धावपळ सुरू झाली. त्या निर्जन घाटात त्याच्या नावाने हाका मारण्यात आल्या. मागून येणाऱ्या ट्रकांकडे (यातूनही सामानाबरोबर माणसांची बेकायदा वाहतूक चालू होती !) अमुकअमुक वर्णनाचा माणूस दिसला काय म्हणून चौकशी करण्यात आली. परंतु काही पत्ता लागेना. अंधार पडू लागला होता. घाटातून लौकर बाहेर पडणे जरूर होते. अखेर अेकदाचा तो अुतारू सापडला. तो पुढे गेला होता. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

अठारा मुडानंतर बड मुडा (मोठे वळण) सुरू झाला. तो सात मैल होता. त्यानंतर मात्र १८ मैल सपाटीचा प्रदेश होता. म्हणजे सुरवातीचे ३०-४० मैल व शेवटचे १८–२० मैल वगळल्यास मधला १०० मैलांचा रस्ता डोंगरदऱ्यातील होता. आगरतल्याला रात्री ७–३० ला पोचलो. म्हणजे १७० मैलांना १३ तास लागले. भयंकर थकून गेलो होतो. स्टँडवर श्री.जगदीश चक्रवर्ती हे वाणी मिश्राचे मित्र अुतरून घ्यायला आले होते. मला अुद्याच्या विमानतिकिटाची चिंता वाटत होती. त्यांच्याकडून जेव्हा समजले की पैशाची व्यवस्था न झाल्यामुळे त्यांना तिकीट काढता आलेले नाही, तेव्हा मी निराशेने मटकन खालीच बसली. या प्रवासात अितका थकवा व अितके नैराश्य यापूर्वी कधी आले नव्हते. अुद्या विमानाचे तिकीट मिळाले नाही तर श्री. शिव-

कुमार जोशींना मुंबअीचे तिकीट रद्द करण्याबद्दल तार द्यावी लागेल. शिवाय कलकत्त्याहून मुंबअीपर्यंत बसून प्रवास करावा लागेल तो वेगळाच !

कलकत्ता
१४–२–६८

आखीव, रेखीव, देखणे शहर : आगरतला

आज सकाळी अुठून विमानकंपनीच्या शहर-कचेरीत गेलो. "आजच्या विमानाचे तिकीट मिळू शकणार नाही, परंतु प्रतीक्षासूचीवर (वेटिंग लिस्टवर) नाव घेता अेअील, त्या वेळी विमानतळावर येअून पाहा. जागा असल्यास तिकीट देअू." असे मला सांगण्यांत आले. मी अुद्या सकाळच्या पहिल्या फेरीचे तिकीट काढले. त्यायोगे अुद्या संध्याकाळची मेल मिळू शकेल. त्याप्रमाणे शिवकुमारभाअींना तार दिली.

शहर फिरून पाहिले. सुमारे ६० हजार लोकवस्तीचे आगरतला नगर मोठे आखीव, रेखीव व देखणे वाटले. बाजार तर जयपूरच्या बाजारासारखा अेका रेषेत वसविलेला आहे. रस्ते चांगले रुंद आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या अिमारतीही प्रमाणबद्ध, अेकसारख्या आहेत. श्री. चक्रवर्ती जेथे राहतात तो कुंजबन टाअुनशिप हा भाग अेका टेकडीवर असून तेथील अिमारती आधुनिक व रस्ते कोरे करकरीत आहेत. प्रत्येकाच्या परसात फळाफुलांच्या हिरव्यागार बागा आहेत.

त्रिपुराचे महाराज बीरचंद्र माणिक्य, माणिक्य बीरेंद्र किशोर देवबर्मन बहादुर व बीर बिक्रम किशोर माणिक्य हे तिघेही विश्वकवी रवींद्रनाथांचे भक्त. गुरुदेवांच्या वेगवेगळ्या कामांना त्यांनी मुक्त हस्तान आर्थिक साह्य दिले. या स्नेहामुळे रवीन्द्रनाथ त्रिपुरा नरेशांचे पाहुणे म्हणून आगरतल्याला काही दिवस येअून राहिले होते. त्यांच्या निवासाने पुनीत झालेला 'मालंच' हा टुमदार बंगला पाहिला. तो लहानशा अुंचवट्यावर आहे. रवीन्द्रनाथांचे स्मारक म्हणून तो जपून ठेवला आहे.

येथील राजवाडाही चांगला भव्य आहे. तो बाहेरूनच पाहिला. लक्ष्मीनारायण मंदिर, बुद्ध मंदिर वगैरे स्थानेही वरवर पाहिली.

बंगाली भाषा व लोक यांचे प्राबल्य

त्रिपुरा हे अेकेकाळी प्राधान्ये करून आदिवासी जमातींचे राज्य होते. त्रिपुरी (बर्मन किंवा देवबर्मन), रेयांग, चकमा, हलम, मोग, जमातिया वगैरे अनेक जमाती येथे असल्या तरी त्यांपैकी मुख्य जमाती तीन :– त्रिपुरी, रेयांग व चकमा. यांपैकी त्रिपुरी जमातीतील बर्मन व देवबर्मन हे राजवंशीय असून ते चांगलेच सुधारलेले आहेत. रेयांग हे दुसरे टोक. अत्यंत गरीब व मागासलेले चकमा हे मुख्यत: बौद्धधर्मीय आहेत. (लोकसंख्या २३,७१६). या जमातींच्या वेगवेगळ्या भाषा किंवा बोली आहेत.

त्यांपैकीच त्रिपुरीही अेक भाषा. परंतु आता ती फक्त खेड्यापाड्यांतच चालते. थोडेफार प्राथमिक शिक्षणही तिच्यातून दिले जाते. चारी बाजूंनी बंगाली भाषेने वेढले गेल्यामुळे या राज्याने बंगालीचा व्यवहारभाषा म्हणून फार पूर्वीच स्वीकार केलेला आहे. अर्थात बंगाली लोकांची आवक या राज्यात पूर्वीपासूनच आहे. तरीपण १९४१ पर्यंत आदिवासींची संख्या फार मोठी होती. अेकूण सुमारे ५ लाख लोकसंख्ये-मध्ये दोन तृतीयांश आदिवासी असावेत. परंतु त्यानंतर लोकसंख्येचा हा पोत झपाट्याने बदलू लागला. १९४१ साली ढाक्याला भयंकर जातीय दंगल झाली आणि निर्वा-सितांचे लोंढे सुरक्षिततेसाठी त्रिपुरा राज्यात येअू लागले. १९४७ व १९६३ च्या दंगलींनंतर तर निर्वासितांचा पूरच त्रिपुरात घुसला. त्यामुळे आज तेथील आदिवासी फारच अल्पसंख्य बनले आहेत. अेकूण लोकसंख्येतील त्यांचे प्रमाण घटतघटत अेक तृतीयांशापर्यंत आले आहे आणि तितक्याच प्रमाणात बंगाली हिंदूंची संख्या वाढत जाअून स्थानिक आदिवासींची स्थिती 'असुनि खास मालक घरचा, म्हणति चोर त्याला' अशी झाली आहे. पूर्व पाकिस्तानात जातीय दंगा झाला की त्रिपुरामध्ये निर्वासितांचा पूर लोटतो. येत्या काही दशकांत या बंगाली निर्वासितांमुळे स्थानिक आदिवासी अमेरिकेतील रेडअिंडियनांप्रमाणे नामशेष होअून जातील अशी शक्यता आहे. पुढारलेल्या निर्वासितांच्या लोंढ्यापुढे टिकाव न लागल्यामुळे आजच येथील आदिवासी डोंगराळ प्रदेशात मागे रेटले जात आहेत. पुढारलेल्या जमातींचे दडपण असह्य होअून कधीकाळी ते कदाचित बंड करूनही अुठतील. परंतु त्या वेळी फार अुशीर झालेला असेल. नव्या युगापुढे शरणागती पत्करून त्यांना बाहेरून आलेल्या बहुसंख्य जमातीमध्ये विलीन व्हावे लागेल.

'जंगम शेती' (Shifting Cultivation) हे या आदिवासी लोकांचे वैशिष्ट्य. तिला ते 'झूम' शेती म्हणतात. या पद्धतीत सारखी जंगलतोड होत असते व त्या कारणाने जमिनीची धूपही होते. म्हणून आदिवासींना स्थायी बन-विण्याचे प्रयत्न सरकारने चालविले आहेत. परंतु त्यात फारसे यश येत नाही असे दिसते.

श्रीमंत कम्युनिस्ट व गरीब काँग्रेसवाले

त्रिपुरातील या विशिष्ट समाजपोतामुळे १९६७ च्या निवडणुकीपूर्वी अेक मजेदार दृश्य निर्माण झाले होते. लोकशाही राज्यघटनेने आपल्याला सामान्य लोकांच्या पंक्तीला बसविले आहे, हे पाहून स्वत:ला श्रेष्ठ समजणारे बर्मन लोक देशातील राज्य-कर्त्या पक्षावर म्हणजे काँग्रेसवर नाराज झाले; आणि ते कम्युनिस्ट पक्षाला मिळाले. याच्या अुलट घटनेने आपल्याला त्रिपुरींच्या बरोबरीचा दर्जा दिलेला पाहून रेयांग वगैरे गरीब जमातींना आनंद झाला आणि त्या काँग्रेसमध्ये शिरल्या. त्यामुळे गेल्या खेपेस काँग्रेस पक्षाची स्थिती बरीच डळमळीत झाली होती. १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसने ही चूक सुधारली. बर्मन लोकांना जास्त प्रतिनिधित्व देअून त्यांना आपलेसे

करून घेतले. त्रिपुराच्या महाराजांनाच काँग्रेसने खासदार बनविले. अशा प्रकारे त्या जमातीत फूट पडली आणि आता काँग्रेसचे आसन दृढ झाले आहे. अर्थात बंगाल्यांचा भरवसा शहाण्याने धरू नये. आजचा अुजवा बंगाली अुद्या डावा कम्युनिस्ट होणारच नाही, अशी हमी खुद्द परमेश्वरही देअू शकणार नाही. त्यामुळे त्रिपुराला असलेला जहाल साम्यवादाचा धोका नजरेआड न करणे बरे.

धार्मिकतेचा प्रभाव

अर्थात हा धोका निकट भविष्यातील नाही. सध्या तरी येथील लोक परंपरागत धर्माच्या जबरदस्त प्रभावाखाली असावेत असे दिसते. नवी देवळे निर्माण होत आहेत. आगरतल्याहून ३२ मैलांवर असलेल्या अुदयपूर या गावी, त्रिपुरसुंदरी किंवा त्रिपुरेश्वरी हिचे माताबाडी नावाचे मंदिर असून गुवाहाटीच्या कामाख्यासारखे तिचे माहात्म्य आहे. जुना आगरतला येथे चौद्द देवता (चौदा देवतांचे) देअूळ आहे. यात शंकर, पार्वती, विष्णु, लक्ष्मी, सरस्वती, कार्तिकेय, गणपती, चंद्र, ब्रह्मदेव, सागर, गंगा, अग्नि, कामदेव व हिमालय यांच्या मूर्ती आहेत. त्या पंचरशी धातूच्या आहेत. अितकेच काय पण सिटी-बसमध्येही सुभाषबाबूंच्या जोडीने गणपतीची रंगीत चित्रे दिसतात आणि 'सत्यं शिवं सुंदरम्' व 'अहिंसा परमो धर्म :' अशासारख्या सूक्ती बंगाली लिपीत लिहिलेल्या आढळतात. बसेस व रिक्शा यांच्यावर डौलदार अक्षरात 'अिलोरा' (वेरूळ), 'सुधीर', 'सव्यसाची', 'योगमाया' वगैरे नावे झळकत असतात. बसेस छान आहेत; परंतु लोकांमध्ये शिस्तीचा अभाव दिसतो. लोक कोणत्याही दाराने चढतात व कसेही अुतरतात. 'धूम्रपान निषेध' (धूम्रपानास मनाअी आहे) अशा पाट्या लागलेल्या असूनही लोक सर्रास बिड्या-सिगरेटी फुंकीत असतात आणि गाडीत जागा मिळाली नाही तर शहरातही लोक टपावर चढून बसतात! त्यामुळेच बहुधा 'माल निज दायित्वे राखून' (प्रत्येकाने आपले सामान स्वतःच्या जबाबदारीवर ठेवावे) अशा पाट्या बसेसमधूनही लावाव्या लागल्या असाव्यात. मला मात्र 'माल' या शब्दाअैवजी 'मान' हा शब्द असल्याचा भास झाला. अेकूण बेशिस्त पाहता तोच अधिक बरोबर वाटला.

महाराष्ट्रीय मित्रांच्या भेटी

शहर पाहून झाल्यानंतर काय करावयाचे असा प्रश्न पडला. अितक्यात माझे आतिथ्य करणारे श्री. चक्रवर्ती मला म्हणाले, "आमच्या कचेरीत श्री. कणिक नावाचे अेक मोठे महाराष्ट्रीय अधिकारी आहेत. आमच्या कुंजबन टाअुनशिपमध्येच राहतात. त्यांना का भेटत नाही तुम्ही?" अर्थात माझी काहीच हरकत नव्हती. मला त्रिपुरी नेत्यांपैकी कुणालातरी भेटावे असे वाटत होते. परंतु ते श्री. चक्रवर्ती यांच्या आवाक्याबाहेरचे असावे. म्हणून मी त्यांच्याबरोबर श्री. कणिक यांच्या घरी गेलो. श्री. कणिक येथील सार्वजनिक बांधकामखात्यात मोठ्या हुद्यावर असून गोमती नदीवर जे अेक

प्रचंड धरण बांधण्यात यावयाचे आहे, त्याच्या आखणीसाठी त्रिपुरा सरकारने त्यांना खास विनंती करून केंद्रीय सरकारकडून मागून घेतले आहे. श्री. व सौ. कर्णिक दोघेही मोठे प्रेमळ व आतिथ्यशील वाटले. त्यांनी मला जेवायला राहायचा आग्रह केला. परंतु श्री. चक्रवर्तींच्या पत्नीने घरी स्वयंपाक तयार केला असणार, म्हणून मी त्यांना म्हणालो, "मी आजचा दिवस आगरतल्यालाच राहणार आहे. तेव्हा रात्री मी तुमच्याकडे जेवायलाच नव्हे, तर राहायलाही येअीन. कारण पहाटे अुठून मला विमानकंपनीच्या शहर-कचेरीत जायचे आहे. अिथे रिक्शा वगैरे मिळायला अडचण पडेलसे दिसते. तेव्हा तुम्ही मला तुमच्या गाडीतून शहर कचेरीपर्यंत पोचवाल तर माझी अेक चिंता दूर होअील." त्यांनी ते आनंदाने कबूल केले. ते म्हणाले, "शहर-कचेरीकडे जाण्याची काही जरूर नाही. मी तुम्हांला सरळ विमानतळावरच नेअून पोचवीन. आता तुमचे सामान अिथे आणून टाका. त्याप्रमाणे मी श्री. चक्रवर्ती यांच्या घरी जाअून सामान घेतले व ते श्री. कर्णिक यांच्या प्रशस्त बंगल्यात आणून टाकले. श्री. कर्णिक यांना कचेरीला जावयाचे होते. ते मला म्हणाले "अिथे जवळच तुमच्या पुण्याचे श्री. पी. अेन्. बर्वे राहतात. तुमची त्यांची ओळख असेलच. तुम्हांला मी त्यांच्याकडे नेअून सोडतो. तिथून चक्रवर्तींचे घर अगदी जवळ आहे."

म्हणजे दुधात साखरच पडली. पुण्याच्या आकाशवाणी केंद्रावर श्री. बर्वे संगीत-विभाग सांभाळत होते त्या वेळी आकाशवाणीशी माझे संबंध बरे असल्यामुळे मी वारंवार आकाशवाणी केंद्रावर माझ्या कार्यक्रमांसाठी जात असे. तेथे त्यांची ओळख झाली होती. ते येथे असतील अशी मात्र कल्पना नव्हती. त्यांना व त्यांच्या पत्नींना (सौ. मालतीबाअी (पांडे) यांना) मला पाहून आश्चर्यही वाटले आणि आनंदही झाला. श्री. बर्वे हे येथील सरकारी संगीत महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. त्यांच्याकडून खूप माहिती मिळाली. अशी सरकारी महाविद्यालये भारतात फारच थोडी आहेत. त्यातही पुन्हा आगरतल्याच्या संगीत महाविद्यालयाचे भाग्य काही आगळेच आहे. केंद्र सरकरचा पैसा पाण्यासारखा या राज्यावर वर्षत असतो. त्यामुळे या महाविद्यालयात संगीतविषयक अुपकरणांची अगदी रेलचेल आहे. साधनसामग्रीने अितके सुसज्ज महाविद्यालय बहुधा दुसरे नसेल. सध्या या कॉलेजात २०० विद्यार्थी शिकत आहेत. शालेय शिक्षणाची अट नाही. हे विद्यार्थी स्नातक झाल्यावर शाळा-कॉलेजांतून अध्यापक व प्राध्यापक होतात. संगीतामध्ये त्यांची फार प्रगती होते असे नाही, परंतु त्याविषयाची त्यांची माहिती मात्र खूप वाढते. या भागात शास्त्रीय हिंदुस्तानी संगीताची परंपरा जवळजवळ नाहीच. जे आहे ते लोकसंगीत. शिवाय लोक आळशी. त्यामुळे संगीतसाधनेला आवश्यक असणारी साधना किंवा तपस्या फार थोडे लोक करतात. त्रिपुराला स्वतंत्र आकाशवाणी केंद्र नसल्यामुळे– व जे लहानसे केंद्र आहे ते मुख्यत: सिनेसंगीत व लोकसंगीत यांसाठीच वापरले जात असल्यामुळे– श्री. बर्वे व विशेषत: सौ. मालतीबाअी यांची बरीच कुचंबणा होते. दोन-तीन महिन्यांनी त्यांना कलकत्ता केंद्रावर गाण्याची संधी मिळते तेवढाच विरंगुळा.

बेत बदलला

दुपारचे जेवण करून व थोडी विश्रांती घेऊन मी श्री. कर्णिक यांच्या घरी गेलो. श्री. बर्वेही तेथे आलेले होते. माझ्याविषयीच त्यांचे बोलणे चालले होते. दोघेही सचिंत दिसत होते. मला पाहताच ते म्हणाले, "अुद्या संध्याकाळी तुम्हांला कलकत्त्याहून निघायचे आहे म्हणता, तर मग आजच तुम्ही कलकत्त्याला का जात नाही ?"

मला काही समजेना. मी त्यांच्याकडे पाहातच राहिलो. तेव्हा खुलासा करीत श्री. कर्णिक म्हणाले, "कलकत्त्याची ही विमानसर्व्हिस अगदी बेभरवशाची आहे. कलकत्त्यात दंगल सुरू झाली, की वैमानिक लोक घरून विमानतळापर्यंत सुखरूप येअून पोचतील, याची खात्री नसते. अशा वेळी विमानवाहतूक थंडावते. आज कलकत्त्याच्या विधानसभेवर मोर्चा जावयाचा आहे. म्हणजे जोराची दंगल ही ठरलेलीच. त्यातून कर्फ्यू वगैरे लागू झाला, तर अुद्याची विमाने अिकडे येतीलच याची शाश्वती नाही. तसे झाले तर तुमची पंचाअीत होअील. तेव्हा तुम्ही शक्यतर आजच्या संध्याकाळच्या विमानानेच गेलेले बरे."

"पण माझे तिकीट तर अुद्याच्या सकाळच्या विमानाचे आहे. आजच्या विमानात जागा नाही, म्हणून तर मला अुद्याचे तिकीट काढावे लागले." मी त्यांना सांगितले.

"त्याची काळजी नको. विमानाचे तिकीट केव्हाही चालते. मी आताच फोन करतो. निदान चान्स तर घेअून पाहू." श्री. कर्णिक म्हणाले.

त्याप्रमाणे त्यांनी विमानकंपनीच्या कचेरीत व विमानतळावर फोन केले. त्यांना नेहमीच कलकत्त्याला व दिल्लीला जावे लागत असल्यामुळे विमान-कंपनीतील सर्व लोक त्यांना चांगले ओळखतात. निश्चितपणे जागा मिळेल असे आश्वासन त्यांना मिळाले नाही. परंतु विमानतळावर येअून चान्स घेण्याचा सल्ला त्यांनीही दिला.

विमानतळावर जावयास निघण्यापूर्वी मी पुन्हा अेकदा पाकिस्तानी प्रदेशाने वेढलेल्या त्या भारतीय भूमीकडे डोळे भरून पाहून घेतले. श्री. कर्णिक यांच्या टेकडीवरील बंगल्याच्या समोरच पाकिस्तानी प्रदेश दिसत होता. रात्रीच्या वेळी तेथील दिवे येथून दिसतात. आगगाडीचा आवाजही अैकू येतो. कधीकाळी त्रिपुराचा बाह्य जगाशी संबंध जोडणारा तो रेलमार्ग आता पाकिस्तानात गेल्यामुळे ती रेल्वे त्रिपुराच्या गळ्याला लागलेली तांत बनली आहे. पाकिस्तानमुळे त्रिपुराचा जेवढा कोंडमारा झाला आहे तेवढा दुसऱ्या कोणत्याही प्रांताचा झालेला नाही. पूर्व बंगालचा क्रूर वाघ या कोकरावर कोणत्याही क्षणी झडप घालू शकेल. परंतु या भीषण परिस्थितीची जाणीव कोणाला आहे काय ?

योगायोग

श्री. कर्णिक यांच्या गाडीतून मी विमानतळावर पोचलो तेव्हा अेक डाकोटा व अेक फॉकर फ्रेंड अशी दोन विमाने कलकत्त्याला जाण्यासाठी विमानतळावर अुतर-

लेली होती. अिम्फालहून डाकोटातून आलो होतो. ते विमान मला आवडले नव्हते. यामुळे आता फॉकर फ्रेंडमध्ये जागा मिळावी, असे वाटत होते. कचेरीत जाअून चौकशी केली तेव्हा कळले, की फॉकर फ्रेंड हे आधी जाणार असून त्यातील अेक अुतारू अजून आलेला नाही. पाच मिनिटात तो आला नाही, तर मला त्यात जागा मिळू शकेल. पाच मिनिटांनंतर त्या अुतारूचे नाव तीनवार पुकारण्यात आले. तो काही आला नाही. मला ताबडतोब विमानाकडे जाण्याची सूचना मिळाली. विलंब होअू नये म्हणून माझ्या सामानाचे वजनही करण्यात आले नाही. ते केले असते तर कदाचित पाचदहा रुपये जादा भाडे मला द्यावे लागले असते. अर्थात मला हव्या असलेल्या फॉकर फ्रेंडमध्येच जागा मिळाली याचा मला अितका आनंद झाला होता की जादा भाडे द्यावे लागले असते तरी मला त्याचे काही वाटले नसते. श्री. कर्णिक यांचे आभार मानून मी विमानात चढलो.

पाकिस्तानचे विहंगम दृश्य

५-३० ला विमानाने जमीन सोडली. हे विमान चांगले प्रशस्त होते. अुतारूही भारी प्रतीचे दिसत होते. कॉफी, सँडविचेस, चॉकलेट वगैरे खाद्य-पेयेही देण्यात आली. मात्र हे काम करणारी हवाअी सुंदरी त्यात नव्हती. तिच्याअैवजी हवाअी मदन (मर्द ?) होता. मात्र त्याबद्दल हळहळ वाटली नाही. कारण आमचे विमान पाकिस्तानी प्रदेशातून चालले होते. रविबाबूंसकट साऱ्या बंग साहित्यिकांनी रसाळपणे वर्णिलेला, पद्मा व मेघना या नद्यांनी सस्यश्यामल बनविलेला 'सोनार बाँग्ला' न्याहाळण्यात मी गढून गेलो होतो. या नद्यांना ब्रह्मपुत्राची सर येणे शक्य नसले तरी त्यांची पात्रेही काही कमी प्रचंड नाहीत. थोड्याच वेळात अंधार पडला आणि दिव्यांच्या लुकलुकण्यावरून खालच्या पाकिस्तानी गावांची कल्पना करणे शक्य होअू लागले. ६-३० ला डमडम विमानतळावर विमान अुतरले. जवळजवळ तीन आठवड्यांचा असम, नगाभूमी, मणिपूर व त्रिपुरा या चार राज्यांचा माझा धावपळीचा दौरा समाप्त झाला.

कलकत्ता शांत

विमानतळावर अुतरलो तरी जीव धाकधूक करीत होता. कलकत्त्यात दंगल झाली असेल, संचारबंदी लागू झाली असेल तर काय करावयाचे ? म्हणून श्री. शिवकुमारभाअींना फोन केला. ते दुकानात नव्हते. सिनेमाला गेले होते. परंतु कलकत्ता शांत असल्याची माहिती त्यांच्या माणसाकडून समजली आणि जीव भांड्यात पडला. विमान-कंपनीच्या बसमधून शहर-कचेरीत आलो. कोठेच काही गडबड दिसली नाही. विधानसभेच्या अध्यक्षांनी नवे मंत्रिमंडळच बेकायदा असल्याचा फतवा दिल्यामुळे विरोधकांचा विरोध शमला होता. सर्व व्यवहार व्यवस्थित चालू होते. शिवकुमार भाअींचा माणूस शहर-कचेरीत आला होता. त्याच्याबरोबर येथे येअून तर पोचलो.

१५–२–६८

नाट्यवेडा तरुण

सकाळी अुठून जवळच असलेल्या ढाकुरिया तलावाच्या काठी शिवकुमार भाअींसह फेरफटका मारून आलो. तळे चांगले प्रशस्त आहे. मधले बेट सुस्थितीत ठेवले तर मोठे रमणीय स्थान होअू शकेल. परंतु दुर्लक्षित स्थितीत असल्यामुळे अत्यंत गलिच्छ व अव्यवस्थित आहे. कलकत्त्यावर अलीकडे निर्वासित व कम्युनिस्ट यांच्या आक्रमणाची अवकळा दिवसेदिवस वाढत असल्याचे अनुभवास येते.

काही बंगाली साहित्यिकांना भेटण्याची अिच्छा मी प्रकट केली. श्री. ताराशंकर बंद्योपाध्याय यांना नुकतेच अेक लाख रुपयांचे ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे; त्यांच्या 'आरोग्य-निकेतन' चे मी मराठीत भाषांतरही केले आहे; त्यामुळे त्यांच्याकडे जाण्याचा विचार प्रथम मनात आला. परंतु शिवकुमारभाअींनी त्यांना भेटावयास गेलेल्या अन्य भाषिक लोकांचे जे कटू अनुभव सांगितले ते अैकल्यानंतर त्यांच्याकडे जाण्याचा अुत्साह अुरला नाही. मग शिवकुमारभाअी स्वतःच्या गाडीतून श्री. तरुण राय या लोकप्रिय तरुण नाटककारांच्या घरी घेअून गेले. घरचा मोठा व्यापार सोडून नाटकाच्या वेडाने या क्षेत्रात पडलेल्या राय दांपत्याचे जीवन मोठे रोमांचक आहे. धोका पत्करून ते साहित्यलेखनावर आणि नाटकावर जगत आहेत. ते स्वतः नाटकात कामे करतात व नाटकाचे दिग्दर्शनही करतात. सध्या त्यांचे चालू असलेले नाटक चांगलेच लोकप्रिय आहे. त्याचे शंभरावर प्रयोग अेकाच थिअेटरात झाले आहेत. त्यांतील गुन्हेगार व पोलिस-अिन्स्पेक्टर या दोन्ही पात्रांचे काम अेकच व्यक्ती करते. ती व्यक्ती म्हणजे स्वतः तरुण राय. त्यांनी रंगभूमीसंबंधीची आपली नवी कादंबरी 'मंचकन्यका' मला भेट म्हणून दिली.

गुजरातचे साहित्यिक कलकत्त्यातील व्यापारी

त्यांच्याकडून गुजरातीचे तरुण कथाकार श्री. चंद्रकांत बक्षी यांच्या घरी गेलो. गुजरातीचे आजचे प्रथम श्रेणीचे कथाकार (बक्षी) व सर्वश्रेष्ठ नाटककार (शिवकुमारभाअी) गुजरातेपासून दूर कलकत्त्यात राहात असावेत, आणि व्यापारी म्हणून प्रख्यात असावेत हा योगायोग मला मोठा मजेशीर वाटला. त्यांच्याशी चांगल्या गप्पागोष्टी झाल्या.

दुपारी जोडासांको येथे जाअून गुरुदेव टागोरांचा वडिलार्जित वाडा पाहिला. तेथील टागोर-वस्तुसंग्रहालय फार सुंदर आहे. 'रवींद्र भारती' नावाचे अेक कलाविद्यापीठही त्या वाड्याच्या आवारात नुकतेच सुरू झाले आहे.

शेवटची लढाओी

शिवकुमारभाओींसह हावडा स्टेशनवर पोचलो, तो तेथील तुफान गर्दी पाहून 'होश अुड गये !' हजच्या यात्रेला निघालेले बंगाली मुसलमान जणू अेखाद्या प्रचंड मोहिमेवर चालल्यासारखे दिसत होते. त्यात रेल्वे-कर्मचाऱ्यांची अकार्यक्षमता. शेवटी डब्यावर 'अेलगार' बोलून रिझर्व्हेशनची फळी (बर्थ) मिळवावी लागली. या प्रवासातली ही शेवटची हातघाओीची लढाओी. परंतु अेकदा डब्यात प्रवेश मिळाल्यावर सर्व काही ठीक झाले.

पुणे
१८–२–६८

आज दुपारी येथे सुखरूप येअून पोचलो.

नागपूरच्या स्टेशनवर वामनराव चोरघडे डब्यात आले. त्यांनी आणलेली जोंधळ्याची भाकरी आणि लसणीची चटणी खाअून तृप्तीचा ढेकर दिला तेव्हा कुठे आपण महाराष्ट्रात परत आल्याची खात्री पटली.

मुंबओीला अेक दिवस विश्रांती घेतल्यामुळे थकवा पुष्कळच कमी झाला. परंतु या साऱ्या प्रवासात अितके हाल झाले आहेत, की निदान चार-सहा महिने तरी लांबच्या प्रवासाला जाण्यास माझे मन तयार होणार नाही, असे वाटते.

पण कुणी सांगावे ? प्रवासाची सुरसुरी थोड्याच दिवसात येओीलही. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, हेच खरे !

– समाप्त –



श्रीपाद रघुनाथ जोशी

जन्म २३ जानेवारी १९२०, मुरगूड, जिल्हा कोल्हापूर. १९३८ साली मॅट्रिक. त्यानंतर १९४६ पर्यंत वर्ध्यास विधायक कार्य केले. सध्या पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत अर्थशास्त्र-विषयक साहित्य मराठीत व हिंदीत आणण्याचे काम करीत आहेत. मराठी, हिंदी, गुजराती, अुर्दू, बंगाली, अिंग्रजी या भाषांचे चांगले ज्ञान.

१९४६ पासून स्वतंत्र लेखन-व्यवसायास प्रारंभ. गेल्या पंचवीस वर्षांत सुमारे १२५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांत कथा, कादंबऱ्या, कविता, अनुवाद, निबंध, कोश-वाङ्मय, प्रवासवर्णने अित्यादींचा समावेश आहे. प्रवासवर्णनाची अुल्लेख-नीय पुस्तके अशी : 'माझा देश माझे लोक' (भाग १ व २), 'लोकयात्रा', 'चिनारच्या छायेत', 'तांबडी माती हिरवे माड'.

प्रस्तुतची 'पूर्वांचलाची मुशाफरी' ही प्रवासाची दैनंदिनी भारताच्या पूर्व सीमेवरील आसाम (छे, 'अ-सम') चा प्रदेश-परिचय आणि तेथील लोकजीवन यांचे वाचकांना घरबसल्या दिलचस्प दर्शन घडवील.